पेशवे रोजनिशी

SELECTIONS FROM THE SÂTÂRÂ RÂJÂS

AND

THE PEISHWAS' DIARIES.

III.

BÂLÂJI BÂJIRÂV PEISHWÂ.

Volume I.

PREPARED BY

THE LATE RÂV BAHÂDUR GANESH CHIMNÂJI VÂD, B. A.

NATIVE ASSISTANT TO THE COMMISSIONER, C. D.

Edited under the orders of

THE DECCAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY

POONA

BY

D. B. PÂRASNIS

AND

Published by the Society with the Permission of the

Government of Bombay.

1907.

[*Price 2¼ Rupees.*]

PRINTED AT THE "NIRNAYA-SAGAR" PRESS,
BOMBAY.

अनुक्रमणिका.

बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी.

भाग १ ला.

१ राजकीय महत्वाच्या गोष्टी.

इ. स. १७४०–४१. इहिदे अर्बैन मया व अलफ. मोहरम १.

[१] तेरीख १ रोज चैत्र शुद्ध द्वितीया रविवार रोजीं कसबे देवरी फत्ते जाहाली. आणि आवजी कवडे याचे हवाला केली.

इ. स. १७४०–४१. इहिदे अर्बैन मया व अलफ. जमादिलाखर २७.

[२] फिरंगी याचा तह दरम्यान कपितान इचबर्ड येऊन दुतर्फा तहनामे जाहले. त्याची नक्कल परभारी तुह्मांकडे पाठविली आहे त्यावरून कळेल. दवणें व परगणे नेबर द्यावयाचा करार जाला आहे. त्याप्रमाणें परगणे मजकूर फिरंगी यांचे स्वाधीन करणें. तेथील अमल ते करतील. परगणे मजकुरीं आपला किल्ला आहे, त्याचे पायथ्याला परगणे मजकूरचे गांव असतील ते आपले किल्ल्याकडे ठेवून त्याचा मुबदला दुसरे परगणे यांजकडे दवणेची जमीन वगैरे मुतसील गांव ऐवज मवाफिक नेमून देणें. परगणे मजकूर व दुसरे परगणे यांत मुबदला गांव नेमून द्याल त्यास तुह्मी आपले तर्फेनें एकजरा उपसर्ग न देणें ह्मणोन शंकराजी केशव यांसी पत्र. १

I Political matters.

A. D. 1740-41.

(1) The village of Devri was conquered on this day.

A. D. 1740-41.

(2) A letter to Shankraji Keshav:—Captain Eastbird came to Poona and a treaty has been concluded with him. A copy of the treaty is forwarded to you for information. The treaty stipulates the grant of Dawane and Pargana Nebar to the English. You should make over to them the said province, and it will remain under their rule. There is a Government fort in the said pargana having some villages in the neighbourhood assigned for its expenses. These villages should be retained, and in lieu of them, territory in other pargana should be given &c.

[३] राजश्री स्वामींनीं राजश्री स्वामी करवीरवासी यांचे स्वाधीन ठाणीं व किल्ले करविले त्यावरून रा० व्यंकटराव नारायण यांसी पत्र लेहून पाठवून ठाणीं व किल्ले हवालीं करविले:—१ किल्ले राजहंसगड, १ ठाणें सुपें, १ ठाणें सागें, १ ठाणें आजरे, १ ठाणें सुळकुंड, १ किल्ले मर्दनगड, ठाणें फोंडें. एकूण सात ठाणीं देवविलीं. याखेरीज अलीकडे जाजतीं दुसरीं ठाणीं घेतलीं असतील तीं देखील देवविलीं असेत. येविसीं पत्रें व्यंकटराव नारायण यांसीं; नारो चिमणाजी यांसी ठाणें फोंडें व किल्ले मर्दनगड याविसीं.

इ. स. १७४१–४२.
इसन्ने अर्बैन
मया व अलफ.
रजब ९.

[४] वतनपत्र शंकराजी केशव व धोंडो केशव व बाळाजी केशव व केसो महादेव महादाजी केशव यांचे पुत्र गोत्र अत्रि सूत्र आश्वलायन उपनाम फडके पुरातन वतनदार उपाध्ये मौजे कुर्धे तर्फ पावस प्रांत राजापूर हल्लीं वास्तव्य कसबे पुणें प्रांत मजकूर दिल्हें वतनपत्र ऐसेजे, प्रांत वसई हा मुलूख फिरंगी याजकडे होता त्यास वसई प्रांतें मुलुख सर करावयास तुह्मांस मसलतेस रवाना केलें. तुह्मीं ते प्रांतें फौजसुद्धां जाऊन श्रमसाहास बहुत केला, व तुमचे बंधु महादाजी केशव कसबे माहीमचे कोटास सन समान सलासीन मया व अलफामध्यें मोर्चे दिल्हे होते ते समयीं युद्धप्रसंगांत स्वामीकार्यीं कामास आले, व तुह्मी जीवाभ्य श्रमसाहास करून कितेक कामें काजें करून सेवाधर्म संपादिला. याजकरतां तुमचें चालविणें आवश्यक जाणोन तुह्मांवर कृपाळू होऊन तुह्मांस नूतन वतन परगणे माहीम प्रांत वसई येथील देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण देखील जकायती बंदरें व देहाय परगणे मजकूरचें वतन करार करून दिलें असे.

इ. स. १७४१–४२.
इसन्ने अर्बैन
मया व अलफ.
सवाल १५.

* * * * *

(3) Rajeshri Swâmi (the Râja of Satara) having ordered the following Thânnâs and Forts to be given up to the Swâmi of Karvir (The Kolhâpur Râja), a letter for their surrender is sent to Vyankatrao Nârâyan.

A. D. 1741-42.

1 Fort Râjhansagad. 1 Thânna Supe. 1 Thânna Sâge. 1 Thânna Âjre. 1 Thânna Sulkund. 1 Fort Mardangad. 1 Thânna Fode.

Orders have also been issued for the surrender of any other Thânnâs recently taken.

(4) Shankraji Keshav Fadke and his three brothers, watandar, of Kurdhe of Tarf Pawas in Prant Rajapur, were sent to conquer the province of Bassein from the Feringees. They acted with great valour and did various services to Government. One of the brothers lost his life in a siege which he laid to the fortress of Kasbe Mahim in the year A. D. 1737-38. The Desh Kulkarni and Gav-Kulkarni watans of Pargana Mahim were conferred on the family.

A. D. 1741-42.

एकूण देहे ८४ चौऱ्यासी जिरायत व बागायत व घरपट्टी व ठाण व मोहतर्फा व ताड व माड व भंडारथल देखील तुमार व कोळी मछीमार व तरी उतार वगैरे जराई बट्टापटी बाब व कमावीस व जकायती व बंदरें, जलमार्ग व उभा मार्ग व मीठबंदर व थळभरीत व थळमोड व सिंग सिंगोटी व रेदे व गादीया देखील कुलबाब कुलकानु सरकारी जमाबंदी होईल त्याजवर हक्क रयत निसबत वितपसील:—

नगदी जमाबंदी सरकारी आकार होईल त्यास रयतेनिसबत हक्क दर सदे रुपये दोन प्रमाणें करार केले असेत. घेत जाणें. कलम १.

गल्ला हरजिन्नस सरकारी आकार जमाबंदी होईल त्यास हक्क एक दरखंडी कैली बारुलें मापें ८॥ आदमण रयतेनिसबत करार केला असे. घेत जाणें. कलम १.

वतनसमंधें इनाम गांव मौजे दहीवलें परगणे मजकूर कुलबाब कुलकानु दरोबस्त इनाम दिल्हा असे. अनुभवीत जाणें. कलम १

इनाम आगरवाडीया २ एकूण आकार रुपये ३९ कसबे माहीम भाटपाखाडी ४० मौजे केळवेंभाट आगर दोन राजभाग सरकारी राजभाग पाऊणशें रुपये करार करून इनाम दिल्हे असेत. अनुभवीत जाणें. कलम १

मानपान, टीळा, विडा, व सिरपाव देशमुखाचे मागें करार केला असे. घेत जाणें. कलम १

शेव सबजी व वाणगी देशमुखाचे निमे करार केली असे. घेत जाणें. कलम १

कसबे माहीम येथें सरकारचीं घरें आहेत त्यांपैकीं एक घर देखील आगवाडा व पिछवाडा वतनी घर वाडा दिला असे. कलम १

खासगत तुमचें गलबत बारखडी १९ पंधरासे माहीमाहून वसई प्रांतें गल्ला व जिन्नस व लांकूडफांटे व सिवार आणतील व नेतील त्यास जकायत माफ केली असे. कलम १

परगणे मजकुरीं लग्नें व मुहूर्त होतील त्यास शेला जीवनमवाफिक घ्यावयाचा करार केला असे. जीवनमवाफिक घेत जाणें. कलम १

The perquisites of the watans were as follows:—

1 The watandars should receive from the ryots two percent of the Government revenue in cash and half a Maund for every Khandi of the revenue in kind.

1 They should take rank at festivals below the Deshmukhs (they should receive leaves &c. on festive ceremonies after the Deshmukhs).

1 They should make levies from traders, at half the rate of the Deshmukhs.

1 They shall enjoy exemption from octroi on grain, fuel &c. brought from Mahim to Bassein, upto 1500 Khandis.

खासगत घर १, व चाकरांचीं घरें ९, व बटकींचीं घरें जीं असतील तीं पाल दिल्हीं असेत. कलम १

तेली परगणे मजकुरीं जे गांवीं असतील त्यास दर घाणीयास दरमहा तेल पंधरपेसी वजनी ᵹ१ एक शेर करार करून दिल्हें असे. तेलीयापासून घेत जाणें. कलम १.

परगणे मजकुरीं जे गांवीं चांभार असेल त्यास दर दुकानास सालिना जुतें १ करार करून दिल्हें असे. घेत जाणें. कलम १.

परगणे मजकुरीं सुतार जे गांवीं असतील त्यांस त्याणें १ नांगर करून द्यावयाचा करार करून दिल्हा असे. एक नांगर करून घेत जाणें. कलम १.

खासगत तुमचा गाडा १ रानांत जाऊन सिवार व लांकूडफांटा आणील त्यास जकात माफ केली असे. कलम १.

परगणे मजकुरीं जे गांवीं महार असतील ते गांवचा महार सालिना ८ दिवस राबणुकेस द्यावयाचा करार केला असे. घेत जाणें. कलम १.

परगणे मजकुरीं कुंभार ज्या गांवीं असेल त्या दर गांवास सालिना मडकीं यांची वरंडी १ करार करून दिल्ही असे. घेत जाणें. कलम १.

परगणे मजकुरीं तेली जे गांवीं असतील ते गांवीं दर घाणीयास पेंड सालिना वजन पंधरपेसी ᵹ॥ अदमण करार करून दिल्ही असे. घेत जाणें. कलम १.

परगणे मजकुरीं मोचेकरी यांचीं दुकानें ज्या गांवीं असतील त्यास दरदुकानास जोडा १ करार केला असे. घेत जाणें. कलम १.

परगणे मजकुरीं लग्नें व मुहूर्त होतील त्यास चिठी तुह्मीं लिहून देत जाणें. तेरीख माहालचे फडणीस घालतील. मोर्तब माहालकरी करतील याप्रमाणें करार केला असे. कलम १.

तुह्मीं खासगत घरचे बेगमीस सालिना बटीक १, व घोडें १ व बैल १ व ह्मैस १ व टोणगा १ विकत घेतलींत त्यांस सरकारतर्फेची जकात व सिंगसिंगोटी माफ केली असे. कलम १.

परगणे मजकुरीं तांबोळी जे गांवीं असतील त्यांस दर दुकानास पानें वेलीचीं दर रोज १३ तेरा करार करून दिल्हीं असेत. घेत जाणें. कलम १.

---

1 They should receive a cloth at every marriage ceremony in the Pargana.

1 They shall be entitled to claim service for 8 days from one Mahar of each village in the Pargana.

1 They shall be supplied with earthen pots by the village potters.

1 They shall receive half a Maund of oil-cakes from every oil-press every year.

1 They shall receive every year from the ryots one bundle of loppings for every hundred bundles given to Government.

परगणे मजकुरीं सरकारांत झांप घ्यावयाचा सिरस्ता आहे, त्यास दर सदे सरकार बेरजेस सालिना हक्क रयत निसबत झांप १ एक करार करून दिल्हा असे. घेत जाणें. कलम १.

किरकोळ बाब देशमुखाचे निमे तुह्मांस करार करून दिल्हा असे. घेत जाणें. कलम १.

एकूण तेवीस कलमें सदरहुप्रमाणें सालमजकुरापासून तुह्मांस करार करून दिल्हीं असेत. तरी सदरहुप्रमाणें देशकुळकर्ण व गांवकुळकर्ण परगणे मजकूर येथील उपभोग देखील हक्क व निमे व इनामगांव व आगर वाडीया व मानपान व टीळाविडा सालमजकुरापासून तुह्मीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें करून वतन अनुभवून सुखरूप राहणें. वतन समंधें तुमचे माथां शेरणी कुलबाब कुलकानु करार रुपये १००१ एक हजार एक करार केला असे. सरकारांत वसूल देऊन पावलीयाची हुजत घेणें ह्मणोन पत्रें:—१ मुख्य वतनपत्र नांवाचें, १ देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी प्रांत वसई, १ जमीनदार परगणे मजकूर, १ मोकदम देहाय परगणे मजकूर. इनामतीचीं पत्रें १ गांवचें २ वाडीयाचीं, १ माहीम कसब्यांत मिरासेचा वाडा करून दिल्हा त्याचें पत्र. आठ पत्रें करून दिल्हीं असेत.

इ. स. १७४१–४२.
इसन्ने अर्बैन
मया व अलफ.
सवाल २३.

[५] बेशमी गंगाजी नाईक व बुबाजी नाईक व जनार्दन नाईक बिन मुरारजी नाईक व शिवाजी नाईक व नारायणजी नाईक बिन निंबाजी नाईक महिमानराव कुळी साळोंखी ज्ञात पाठारे पुरातन वास्तव्य कसबे वानरे तर्फ मराळे परगणे साष्टी वतनदार मोकादम मौजे अणजूर तर्फ आटगांव परगणे सायवान प्रांत वसई हे, प्रांत मजकुरींहून तीर्थरूप रा० बाजीराव व तीर्थरूप रा० चिमणाजीपंत आंपा यांचे दर्शनास सातारीयाचे मुक्कामीं सन सलास अशरीन मया व अलफामध्यें येऊन आपली हकीकत विदित केली कीं, आपण पुरातन प्रांत मजकूरचे वतनदार आहों. त्यास वसई प्रांत फिरंगी याकडे आहे. त्याणें देवस्थानें व तीर्थें यांचा व महाराष्ट्रधर्म याचा लोप केला. हिंदु लोक भ्रष्टऊन क्षार केले. आपण पुरातन वतनदार, देशनाडगौडपणाचें

---

1 They shall be entitled to minor perquisites, at half the rate of the Deshmukhs.

A. D. 1741-42.

(5) Gangaji Naik, Bubaji Naik, and Janardan Naik bin Murarji Naik, and Shivaji Naik and Narayanji Naik bin Nimbaji Naik Mahimanrao of the Solonkhe family, by caste Pathare, residents of Wanre Tarf Marale in Pargana Salsette and watandar Patil of Anjur in Tarf Atgaum in Pargana Sayewan of Prant Bassein, came to Satara in A. D. 1722-23 to visit Peishwa Bajirao and his brother Chimnajipant Appa. They informed the Peshwa that the Portuguese had desecrated temples and other sacred places, had put down the Mahratta religion and had polluted the Hindus, and that owing to the discontinuance of their watans, they (Gangaji and others) had left the

वतन होतें त्यास फिरंगी याकडे तो प्रांत जाहलीयापासून वतन चालों देत नाहीं. याजमुळें आपण कुटुंबासहवर्तमान त्या प्रांतांतून येऊन कल्याण प्रांतीं प्रस्तुत राहिलों. वसई प्रांतींची हकीकत व आपलें वृत्त निवेदन करून त्या प्रांतीं साहेबीं मसलत करून, प्रांत मजकूर सर करून देवस्थापना करून, स्वधर्मस्थापना होय ते गोष्टी करावी व आपलें वतन आपणास करून द्यावें. त्या प्रांतींचे कोट किल्ले व जंजीरे वसई व कोट ठाणें या जागांचे लागे, माग व खाडीयांचे उतार व मार्ग वाटांस आपण माहीत आहों. व ठाणें वसईकोटाचे लाग आपले स्वाधीन आहेत ह्मणून. त्यावरून आणजोरकर मजकूर यांसीं तीर्थरूपांनीं आज्ञा केली कीं, तुमचे हातलागे असतील ते हातीं धरून वसईचा व ठाणेंयाचा उताराचा लाग ठीक करणें. त्याजवरून अणजूरकर मजकूर यांणीं हातलाग्ये त्या प्रांतींचे हातीं घेऊन कोट ठाणें साष्टी येथील लाग व तेंच खाडीयाचा उतारा व वसईचे आगरचे खाडीचे लाग केले, तें वर्तमान हुजुर येऊन साल दरसाल निवेदन केलें, त्याजवरून सन सबा सलासीन मया व अलफमध्यें तीर्थरूप रा० आपांनीं मसलहत करून फौज समागमें देऊन रा० शंकराजी केशव व रा० चिमणाजी भिवराऊ फौजसमेत गंगाजी नाईक व शिवाजी नाईक अणजूरकर बराबर देऊन वसईस पुढें रवाना केलें व रा० खंडोजी माणकर व रा० रामचंद्र हरी यांस फौज समागमें देऊन बुबाजी नाईक व मुरारजी नाईक व नारायणजी नाईक अणजूरकर हे तिघे बंधु बराबर देऊन साष्टीची खाडी पार करून फौज नेऊन ठाणेंयाचा कोट हस्तगत तुमचे हातीं लागोन जाला. तीं० कैलासवासी रा० आपा खासा फौजसुद्धां पाठीवर जाऊन प्रांत मजकूरचे गड कोट किल्ले हस्तगत करून प्रांत मजकूर सोडवून स्वराज्य केलें; त्याजमुळें स्वधर्मस्थापना होऊन देवधर्मादिक चालतें जालें. व अणजूरकर यांचा बंधु यांणीं एकनिष्ठपणें जीवाभ्य श्रमसाहास करून सेवाधर्म संपादिला. व मुरारजी नाईक अणजूरकर जंजीरे वसईचे कोटास हल्ला जाहली ते समयीं युद्धप्रसंगांत स्वामीकार्यीं खर्च जाले. त्याजवरून अणजूरकर पांचजण बंधु यांजवरी कृपाळू होऊन तीं० कैलासवासी यांणीं यांसी नूतन वतन करार करून द्यावें ऐसा करार केला. त्याजवरून हाल्लीं अणजूरकर

---

province, and were at that time residing in the province of Kalyan. They further represented that they knew the accesses to the forts of Bassein, Thana and others, the points where the Channels were fordable, and the roads in the country, and requested the Peishwa to lead a campaign against the province, to conquer it, and to establish the Hindu Religion. Gangaji Naik and others were then told to collect their friends and to take steps for facilitating entry into the Post of Thana and Salsette.

They came every year to the Peishwa and reported their progress. In 1836-37 Shankraji Keshav and Chimnaji Bhivrao with their army were sent with Gangaji and Shivaji and reached Bassein. The army of Khandoji Mankar and Ramchandra Hari, was sent with Bubaji, Murarji and Narayanji. It crossed the

मजकूर हुजूर येऊन आपली हकीकत निवेदन केली. त्याजवरून तुह्मांस नूतन वतन देशनाडगौडी ऊर्फ सरपाटीलकी वतन परगणे साष्टी देखील जकायती व तर्फ आटगांव देहे २६ सव्वीस परगणे सायवान पैकीं तर्फ मजकूर देखील जकायती जलमार्ग व उभा मार्ग व बंदरें परगणे मजकूर व तर्फ मजकूर वतन सरपाटिलकी करार करून दिल्हें असे.

इ. स. १७४२–४३. सल्लास अर्बैन मया व अलफ. जमादिलावल २१.

[६] मोकादमानी व रियान देहाय तालुके आजम यार महमदखान रोहिला यासी दिल्हें अभय पत्र ऐसें जे, सालेहाल्लीं माळवा प्रांतें फौजेसहीत छावणी जाहली आहे. या गोष्टीची दहशत तुह्मी खाऊन मुलखाची ज्युत होत नाहीं. याजकरितां खान मशारनिल्हेकडील कारभारी हुजूर येऊन खान मशारनिल्हेचे तर्फेनें करारबंद केला कीं, बाकी पहिली एक लाख रुपये आहेत त्यांपैकीं माहे जमादिलाखर अखेर रुपये ८०००० ऐसी हजार व दसरीयासी द्यावे रुपये २०००० वीसहजार एकूण लाख देऊन साल आयंदेचे मामलीयत सन मजकूरचे रुपये निमे मार्गसीर व निमे चैत्र मासीं आदा करून ऐसा करार केला आहे. त्यावरून खातरेस आणून कौल सादर केला आहे. तरी करारबंदप्रमाणें बाकी व साल हालचे रुपये सरकारांत आदा जाहलीया तुह्मांस कोणे बावें आजार लागणार नाहीं. खातर जमा राखून मुलखाची लावणी करणें. अभय असे.

इ. स. १७४२–४३. सलास अर्बैन मया व अलफ. जिलकाद १४.

[७] कुलाबाकर लोक सन अर्बैनमध्यें अखेर सालीं सरकारांत चाकर जाहले. त्यांणीं सन इहिदेपासून खातें केलीं असतील त्यांचा आकार जो होईल तो मक्तीयांत मजुरा न देणें. खेरीज मक्ता जमा धरणें. कलम १.

---

channel at Salsette, and was able, with the help of Gangaji's friends, to capture the fort of Thana. Chimnaji Appa followed, and the whole territory was conquered, and the Hindu religion was again established. The watan of Nargoundi (that is, Sir Patel) of Pargana Salsette was therefore conferred on the family, above referred to.

A. D. 1742-43.

(6) The army having this year encamped in Prant Malwa, the cultivation of the land was given up by the people through fear. A letter of assurance was therefore issued to village officers, the ryot of taluka Azam Yar Mahomed Khan Rohilla, informing them that if he paid up the past arrears of one lack of Rupees, as also the revenue of the current year, no additional levy would be imposed upon them.

A. D. 1742-43.

(7) This shows that the territory of Kolaba came under the sway of Peishwa, towards the end of San Arbain (1739-40 A. D.)

[८] संस्थान वोडसे प्रतीसिंगराजा याच्या नांवें फारकती लेहून दिल्ही कीं साल मजकूरची खंडणी देखील जहागीर.

इ. स. १७४२–४३.
सलास आर्बा
मया व अलफ.
जिल्हेज २.

रुपये.
४०५००० रोख द्यावे.
४००००० ऐन खंडणी.
५००० बद्दल राजश्री महादाजी अंबाजी.
४०५०००
५०००० जहागीर किल्ले झांशी कमाल जमा.
४५५०००

एकून चार लाख पंचावन हजार रुपये मार्फत मल्हार कृष्ण सरकारांत भरून पावले ह्मणून फारकती लेहून तसलमात मल्हार कृष्ण दिली असे. पत्र १.

रुपयांचा झाडा करून घ्यावा व जहागीर पन्नासा हजारांची घ्यावी आणि फारकती द्यावी ह्मणून मल्हार कृष्ण यांसी सांगितलें असे.

इ. स. १७४३–४४.
आर्बा आर्बैन
मया व आलफ.
मोहरम १०.

[९] गणसेट वल्लद गोपाळसेट सोनार वस्ती कसबे पेण याणें गोंवें प्रांतीं मसलत जाहली ते समयीं श्रमसाहास जीवाभ्य केलें, सबब सोनार मजकुरास पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम भात पड जमीन बिघे ८१० दहा एकतर्फा कसबे पेण पैकीं देऊन इनामपत्रें लिहून दिल्हीं.

इ. स. १७४३–४४.
अर्बा अर्बैन
मया व अलफ.
सवाल १०.

[१०] रा० सेकोजी सावंतराव व नरहरराव जिवाजी व मुकुंदराव साबाजी यांस फौजसुद्धां पटणे प्रांतें रवाना करून सरंजाम खेरीज बाबती व सरदेशमुखी दिल्हा असे बितपसील:—

---

(8) A Jahagir of Fort Jhansi, worth Rs. 50,000 was taken from the Chief of the Saunsthan Wodase. The total contribution of 4 lacs and 55 thousand Rupees including Jahagir was levied.
A. D. 1742-43.

(9) In a political mission regarding the province of Goa, Ganeshet Goldsmith of Kasbe Pen acted with great daring and enterprize. Some land was therefore given to him in Inam.
A. D. 1743-44.

(10) Sekoji Sawantrao, Narharrao Jiwaji and Mukundrao Sakhoji, were sent with army to the province of Patane, with instructions to acquire as much territory beyond the Ganges as possible.
A. D. 1743-44.

प्रांत गढे प्रांत माळवा. १ रेवा दक्षिण-तीर देखील कशी (?) जाहागीर खेरीज स्वराज्य. १ रेवा उत्तरतीर तालुका मुंगाजी सावत परगणे बिल्हेरी जाहागीर व मोकासा. कित्ता महाल बिल्हेरीचे पूर्वेस व दक्षिणेस घाटावर बुंधेले व बघेले यांचे महाल नसीले तर येणेंप्रमाणें जाहागीर व मोकासा. १ परगणे शहोरा, १ परगणा पचेल, १ परगणा उबरीया, परगणा आमोदा १ परगणा कवडीया.

परगणे नीळगड पंचमहाल, सरकार हांडे जाहागीर खेरीज तालुका मकडाई १

सुभापटणेंपैकीं संस्थानें जाहागीर व मोकासा. १ तालुका भोजपुरे १ तालुका सुंदरशा १ तालुका दाऊदनगर.

सुभा प्रयागपैकीं जाहागीर व मोकासा. १ तालुका बिजेपूर व मीरजापूर. १ तालुका काचरजाऊ.

भागीरथी पार उत्तरतीरीं जबरदस्ती पोंहेचेल तेथवर मुलुख सोडवणें जहागीर व मोकासा.

येणेंप्रमाणें सरंजाम दिल्हा असे. कुलबाब कुलकानु आकार होईल त्यापैकीं दरसदे रुपये ३९ बाबती सरदेशमुखीचा ऐवज २ पोतदारी. एकूण सदतीस रुपये दरसदे काढून हुजूरून कमावीसदार पाठविले आहेत त्याजवळ पावता करणें. वरकड ऐवज राहिला तो फौजेवरी गणती घेऊन गणतीबरहुकूम दामाशाईनें वांटून घेत जाणें. साल मजकुरीं मात्र रेवा उत्तरतीर तालुका जुगाजी सावत परगणा बिल्हेरी प्रांत गढे प्रांत माळवा येथील बाबती व सरदेशमुखी दरसदे रुपये ३९ पस्तीसप्रमाणें काढून हुजुरून कमावीसदार पाठविले आहेत त्याजवळ ऐवज पावता करणें. वरकड तालुक्याची बाबती व सरदेशमुखी सालमजकुरीं मात्र तुह्मांस माफ केली असे. पेस्तर सालापासून सदरहुप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणून सरदारांचे नांवें सनद १ व देशमुख देशपांडे परगणे मजकूर व तालुके मजकूर यांस पत्रें सदरहुप्रमाणें कलम. १

[११] सेख दाऊद बिन सेख हसन हरकार साहुकार साकीन कसबे केळशी सुभा दाभोळ हालीं वस्ती ठाणें साष्टी यांणीं, तीर्थरूप कैलासवासी आपांनीं ठाणें साष्टी घेतली ते समयीं हरएक साहित्य व सेवा व कष्ट मेहनत बहुत केली व पुढेंही करावयास उमेदवार व हालींही करीतच आहेत. सबब कृपाळु होऊन मौजे नाणाळे तर्फ तुर्भें प्रांत साष्टी हा गांव इनाम दरोबस्त जिराईत व घरपट्टी व मोहतर्फा व ताड व झाडझाडोरा व कोंबडपट्टी वगैरे कुलबाब कुलकानु खेरीज हक्कदार पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें दिल्हा त्याचीं इनामपत्रें व साहित्यपत्रें दिल्हीं.

इ. स. १७४३–४४.
अर्बा अर्बैन
मया व अलफ.
जिलकाद. ४.

---

(11) A village was given in Inam to Shekh Daud bin Shekh Hasan Parkar, merchant of Kelshi in Subha Dabhol now residing at Salsette in recognition of the services rendered by him to Appa (Chimnaji Appa), at the capture of Salsette.

A. D. 1743-44.

१ साहुकारास भोगवट्यास इनामपत्र.

३ साहित्यपत्रें कीं पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालवणें, प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रति लिहून घेऊन हें पत्र भोगवट्यास साहुकाराजवळ परतोन देणें ह्मणून १ देशमुख देशपांड्ये प्रांत साष्टी, १ देशाधिकारी व देश लेखक वर्तमान भावी सुभा प्रांत साष्टी, १ गांवास (येणेंप्रमाणें ३ पत्रें).

इ. स. १७४४–४५.
खमस अर्बैन
मया व अलफ.
साबान. ८.

[१२] वतनपत्र षरीयतपनाह महमद साले शतारी मांडलेकर हालीं वस्ती बंदर होळीज आगाशी यांणीं अर्ज केला कीं, आपण फिरंगाण प्रांतीं मसलत जाहाली ते समयीं श्रम साहास बहुत केले तर मेहरबान होऊन वसई प्रांतीं व दवण (दमण?) प्रांतीं नूतन काजीपणाचें वतन करून द्यावें ह्मणोन. त्याजवरून मनास आणून मेहरबान होऊन नूतन काजीपणाचें वतन परगणे बितपसील:—

परगणे सायवान प्रांत वसई:—१ तर्फ हवेली सायवान १ तर्फ आगाशी १ तर्फ कामणखाच १ माणीकपूर १ तर्फ आगरवसई १ प्रांत दवण:—१ परगणे माहीम २ परगणे तारापूर (१ तर्फ हवेली तारापूर १ तर्फ चिंचणी) १ परगणे डहाणू १ परगणे संजाण १ परगणे नेबर १ परगणे पवाडी (पहाडी?) १ परगणे खलाडे १ परगणे आसरे.

येणेंप्रमाणें चवदा परगण्यांचें काजीपणाचें वतन नूतन करून दिल्हें असे. तुह्मी पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें काजीपणाचें वतन अनुभवून सुखरूप राहणें. काजीपणाचा हक्क दस्तूर बमोजिब कल्याण भिंवडीप्रमाणें घेत जाणें ह्मणोन वतनपत्र लेहून दिलें असे.

इ. स. १७४४–४५.
खमस अर्बैन
मया व अलफ.
जमादिलावल १७.

[१३] जवारकराकडील बळवंतगड किल्ला सालगुदस्तां सरकारांत घेतला होता तो पाडून टाकिला. त्या खाले जकातीचे घाट १ तळघाट (व) १ बोरघाट (या) दोन घाटांचा जकातीचा अमल तुह्मांकडे सांगितला असे. तरी हरदू घाटांस कमाविसदार पाठवून अंमल इमानें इतबारें चौकसीनें करवणें आणि जो जकातीचा आकार होईल तो सरकारांत पावता करून पावलीयाचीं कबजें घेणें. तेणेंप्रमाणें मजुरा पडेल. ह्मणोन बहीरजी बाळकवडे नामजाद प्रांत कावनई यांस सनद.

A. D. 1744-45.

(12) During a campaign in the Portuguese territory, Sheriyat Panha Mahomed Sale, acted with bravery and enterprize. The watan of Kazi in the 14 Parganas of Prant Bassein was given over to him.

A. D. 1744-45.

(13) The Fort of Balvantgad belonging to the Raja of Jawar was in the preceding year taken by Government. The Fort was dismantled, and Kamavisdars were appointed to collect the Octroi at Borghaut and Talghaut, which had been assigned for its expenses.

[१४] किल्ले सिंदोळा सन तीसामध्यें [इ. स. १७३८-३९] घेतला; ते समयीं चाहुजी गोरे वगैरा कोळी हव्यें होते त्यांस हत्यारें सांपडलीं तीं कोळी घेऊन गेले. किल्ले सुरगडाकडे जमा धरिलीं. शिलकेस वाढतात तीं खर्च लिहावयास आज्ञा करावी ह्मणून विनंती केली. त्यावरून मनास आणतां ते कोळी हजर नाहींत सबब माफी खर्च लिहिणें.

इ. स. १७४४–४५. खमस अर्बैन मया व अलफ. सवाल १७.

९ बंदुका १ सेती १ निमचा, एकूण ११ अकरा हत्यारें माफी खर्च लिहिणें ह्मणोन मशारनिल्हे यांचे नांवें. पत्र १

[१५] तर्फ वाडे प्रांत जवार रा० विक्रम पतंगराव राजे जवार यांणीं सरकारांत दरोबस्त दिली असे त्यापैकीं किल्ले भास्करगडचे तनख्यास देहे ३७ सदतीस पेशजी दिल्हे. हालीं गांव २७ सत्तावीस दिल्हे. बितपसील देहे—१ मौजे गाधले १ मौजे सांदणें बुद्रूक १ मौजे कारोज १ मौजे डाहे १ मौजे हरवसाले १ मौजे बिलेकास खुर्द १ मौजे ठमावे १ मौजे उबराटे १ मौजे मानीवली, मौजे पेठ, मौजे दातसई १ मौजे कासघर १ मौजे देवली १ मौजे सारस वाहाळ १ मौजे सादणें खुर्द १ मौजे वाडले १ मौजे पेढई १ मौजे खेर १ मौजे सासणें १ मौजे नाजे १ मौजे सिरसाळ १ मौजे० १ मौजे० २ इसापत इनामत देशमुख तर्फ मजकूर १ मौजे तिळगांव इनाम १ मौजे काकर इसापत.

इ. स. १७४४–४५. खमस अर्बैन मया व अलफ. जिलकाद. १४.

[१६] किल्ले कावनई येथील वस्तभाव व गल्ला व जिन्नस वगैरे जें असेल तें कुल उतरून घेऊन खालीं किल्ला सैद असकरखान दिंमत नवाब निजामन मुलुक पाठविले आहेत यांचे हवालीं करून पावलीयाची पोंहच घेणें ह्मणून बहीरजी बाळकवडे यांस पत्र १.

इ. स. १७४४–४५. खमस अर्बैन मया व अलफ. जिल्हेज. १५.

---

(14) The Fort of Sindola was taken by Government in San Tisa, (A. D. 1738-39).

A. D. 1744-45.

(15) The whole of the Tarf of Wade in Prant Jawar was surrendered to Government by Vikram Patangrao Raja of Jawar, 27 villages out of the said Tarf, were assigned for the expenses of the Fort of Bhaskargad.

A. D. 1744-45.

(16) Bahiraji Balkawde was ordered to remove all furniture from the Fort of Kawnai, and to hand it over to Sayad Askarkhan in the service of Nizam-ul-Muluk.

A. D. 1744-45.

इ. स. १७४४–४५.
खमस अर्बैन
मया व अलफ.
जिल्हेज. १७.

[१७] रा० फत्तेसिंग बाबा भोसले यांणीं सरकारांत मोकासबाबेचे महाल दिल्हे वितपसील:—१ परगणे हवेली नांदेड १ परगणे वर वळ १ परगणे चितापूर अगर परगणे सगर ·।।· परगणे लातूर निमे.

एकून साडेतीन माहाल सरकारांत दिल्हे त्यांची कमावीस मल्हारराव मुकुंद यास सांगितली असे. इमानें इतबारें वर्तोन अंमल करणें. सदरहू मामल्याचे ऐवजीं तुह्मांपासून रसद रुपये २५००० पंचवीस हजार घेतले. यास व्याज दरमहा दरसदे रुपये १।। दीड प्रमाणें शिरस्ते बमोजिब करार केले असे. जाहले मुदतीचें व्याज व मुदल हिशेब करून माहालचे ऐवजीं उगवून घेणें. तुह्मी रसदेचा भरणा कराल त्याचा जाब मितीवार घेणें. तेणेंप्रमाणें व्याजाचा हिशेब होईल. तुह्मांस मुशाहिरा रसदेस दरसदे रुपये ४ चार प्रमाणें रुपये १००० एकहजार करार केले असेत. परगणे मजकूरचे ऐवजीं घेणें. शिबंदी व प्यादे व स्वार लागतील ते माहाल पाहून गोविंद हरि नेमून देतील ह्मणोन मल्हारराव मुकुंद याचे नांवें सनद. १

इ. स. १७४४-४५
खमस अर्बैन
मया व अलफ.
मोहरम ४.

[१८] सरकार मांडोगण येथील कानगोईपणाचें वतन जेसिंग व माधोराय यांचें आहे. त्यांणीं निमें वतन सरकारांत दिल्हें आहे. तेथील यादो शामराज यास गुमास्तगिरी सांगोन पाठविलें, त्याचीं ताकीदपत्रें परगणे २६. १ परगणे झबुवा १ परगणे जाहालीबोर १ परगणे मानधाता १ परगणे आमझरा १ परगणे बोरखडी १ परगणे हिंदोलाबरा १ परगणे बाम १ परगणे अली १ परगणे बडवा १ परगणे धार १ परगणे नालछा १ परगणे दुगठाण १ परगणे बेटमा १ परगणे बाघोदा १ परगणे कमालपूर १ परगणे धुनगाव १ परगणे हासीलपूर १ परगणे महेसर १ परगणे बडोदागागळी १ परगणे धरमपुरी १ परगणे हवेली मांडवगड १ परगणे लवाणी १ परगणे करंबी १ परगणे मानपूर १ परगणे सीमनखुर्द १ परगणे गोमापूर, जागीरपूर. चौधरी व कानगो यांस पत्रें २६

राणोजी सिंदे यांजकडे माहाल आहेत त्यांस ताकीदपत्रें महाल. १:—१ परगणे दिकठाण

A. D. 1744-45.

(17) Fatesing Baba Bhosale surrendered to Government the Mokasa Amal of the following Mahals.

1 Pargana Haveli Nanded. 1 Pargana Chitapur or Sagar.
1 Pargana Warval. ½ Of Pargana Latur.

A. D. 1744-45.

(18) Half the watan of Kango in Sarkar Mandogana was surrendered to Government by Jaysing and Madhoray. The waten extended over 26 parganas situated in the territories of the Scindia, the Holkar and Yeshwantrao Powar.

१ परगणे आमझरा १ परगणे धुनगांव १ परगणे बडवा १ परगणे जाहालीबोर १ बोरखडी १ बडोदागागली १ मानपूर १ हिंदोळा १ परगणे कमालपूर १ परगणे बाग परगणे मानधाता—

पत्र १

मल्हारजी होळकर याजकडे परगणे आहेत. १ बेटमा १ बसीलपूर १ कोठरा सिंगांणी १ महेसर १ परगणे लारही १ परगणे लवानी—

पत्र १

यशवंतराव पवार यांजकडे परगणे धार वगैरेः—१ धार १ जाहागीरपूर १ हवेली मांडव १ नालछा १ धर्मपुरी. तुकोजी पवार याजकडे परगणे बावोदें पत्र. १

गांव इनाम आहेत त्याचीं गांवांस पत्रें. १

१ मौजे गवळ्या परगणे बाग १ मौजे पिपळे परगणे लवाणी १ मौजे पेपरी परगणे जागीरपूर १ मौजे कनडपूरा परगणे हवेली मांडव १ मौजे हुसंगाबाद परगणे हवेली मांडव १ मौजे नीरपूर परगणे मानपूर १ मौजे पटलावद परगणे धर्मपुरी, मौजे पांजर परगणे हासीलपूर १ मौजे विटावदी परगणे महेसर १ मौजे वडवले परगणे महेसर १ मौजे माडले परगणे धर्मपूर, मौजे बिलोद परगणे बेटमा. १ मौजे झालरोड परगणे धर्मपुरी १ मौजे जामच्या परगणे हवेली मांडवगड १ मौजे जामन्या परगणे बावोदें १ मौजे दहपक परगणे सिंगाणे १ मौजे रायण परगणे दिकठाण १ मौजे मलणगांव परगणे बडोदा १ मौजे लगुर परगणे बडोदा १ मौजे अस्तन्या परगणे बडवा १ मौजे करोद परगणा धुनगाव. पत्र १

मशारनिल्हेचे नांवें सनदा कीं दरोबस्त कानगोईपणाची गुमास्तगिरी सांगितली असे. वतनाचा अंमल इमानें इतबारें करून हक्क रुसुम मानपान कुलबाब कुलकानु अंमल करून निमे जयसिंग माधवराव यास देऊन निमे सरकारांत जमा करणें ह्मणून सनद.

[१९] रोहिल्याकडील कबिले धरले आहेत ते सोडणें ह्मणून पत्रें दिल्हीं.

इ. स. १७४४-४५
खमस अर्बैन
मया व अलफ.
रबिलावल १

१ कमावीसदार मंदोसर १ लक्ष्मण शंकर १ परगणे तिवदाबाग राव बसोद १ परगणे शाहाजापूर राघो विठ्ठल १ परगणे उचोद १ परगणे सुनेरा १ विठ्ठल पाटील दिंमत होळकर १ महतपूर १ सारंगपूर.

---

(19) The families of Rohillas, which were arrested, were ordered to be liberated. Orders to that effect were issued to Kamavisdars of Mandosar, Tiwadabag, Shahajapur &c.

A. D. 1744-45.

इ. स. १७४४-४५
खमस अर्बैन
मया व अलफ.
रबिलावल १.

[२०] फैज महमदखान रोहिले यास तह होतां वीसा हजारांचे गांव देऊं केले ते परगणा सिफरे व दुराहा या परगण्यांत रामचंद्र बल्लाळ यास पत्र देऊन नेमून देविले.

[२१] रा० दादो महादेव व रा० रामचंद्र बल्लाळ कमावीसदार परगणे अष्टें यांस पत्रें कीं रोहिले यास तुह्मांकडून दहाहजारांचे गांव, रामचंद्र बल्लाळ याजकडून पंधराहजारांचे, एकूण पंचवीस हजार रुपयांचे गांव दिल्हे. त्यांच्या सनदा छ २८ रबिलावलीं दिल्या. त्या दिवसापासून त्यांच्या हातास सनदा जात तों पर्यंत वसूल तुह्मांकडे होईल तो त्यास देणें.

इ. स. १७४४-४५
खमस अर्बैन
मया व अलफ.
रबिलावल १.

सदरहु गांवचा वसूल छ ९ सफर पासून छ २८ रबिलावल पर्यंत सरकारांत आला असेल तो त्यास न देणें.

येणेंप्रमाणें दादो महादेव यास सनद. १

[२२] प्रीतीसींग राजे संस्थान वोडसें यांस पत्र कीं संस्थान मजकूरचें राज्य निमें सरकारांत घेतलें आणि निमें तुह्मांस दिलें; आणि करार करून पट्टा लिहून दिल्हा आहे. तरी पट्टेमाफक चालणें. करारांत तफावत न करणें. तुह्मांकडे हिसेबांत सरकारांतून तफावत होणार नाहीं ह्मणून पत्र रांगडे लिहून दिल्हें असे.

इ. स. १७४५-४७
सीत अर्बैन
मया व अलफ.
जमादिलाखर १.

इ. स. १७४६-४७
सबा अर्बैन
मया व अलफ.
जमादिलावल २४.

[२३] गुजारत बापुजी भीमराव याजसमागमें फौज देऊन साष्टी वगैरे प्रांतीं पाठविले होते त्याचे गुजारत खर्चाबद्दल झडती मशारनिल्हे.

---

(20) In the treaty entered into with Faij Mahomed Khan Rohilla, he was promised villages of the value of Rs. 20,000. Ramchandra Ballal was now directed to assign to him villages, of the above value, in Parganas Siphare and Duraha.

A. D. 1744-45.

(21) The territory of the Rohilla having been taken by Government, villages yielding an annual revenue of Rs. 25,000 were assigned to him, and the Kamavisdars of Ashta were ordered to hand over the territory to him.

A. D. 1745-46.

(22) One half of the territory of Pritising, Raja of Samsthan Wodase, was taken by Government, the other half being left with him, and an agreement to that effect was entered into. The Raja was reminded of this agreement, and was desired to act up to its terms.

A. D. 1745-46.

(23) This gives details of expenses incurred by Bapuji Bhimrao, who was sent with an army to Salsette.

A. D. 1746-47.

२९८९॥ जीवाजी ढमढेरे शिलेदार.

२१८४ रोजमरा इस्तकबिल छ ८ जिल्हेज तागाइत छ ८ जमादिलावल रोज दर २१, स्वार ५० पन्नास एकूण आठरोजा रुपये १०४ एकूण.

१८३४ ऐन नगद

३५० भात खंडी १९॥३॥।

१७५ नवे खंडी ८॥। दर ८१

१७५ जुने खंडी १०॥३॥। दर ८१। प्रमाणें

३५० १९॥३॥।

४०५॥ अर्ज बाब ऐन नगद.

२९८९॥

५३९ आवजी ढमढेरे स्वार १०

१५०१३ जीवाजी पांढरे स्वार २००

४७२॥ सिदोजी पांढरे स्वार ९.

१२३१० पागा दिमत संभाजी सिंदे.

२०० पागेस खर्चास मोघम.

१२००० रोजमरा पथक राघो केशव स्वार ४००.

एकूण रोजमरा इस्तकबिल छ० ४ जिल्हेज तागाईत छ० ६ रबिलावल रोजमरे १२ दर आठवडा रुपये १००० एकूण नगद.

११० दीडमाही रोजमरे २ एकूण.

६० राघो केशव दर ३० एकूण.

३२ जासूद असामी ४ दर १६.

१० आफ्तागीरा १ दर ५.

८ दिवट्या १ दर ४ प्रमाणें.

११०

१२३१०

५ महादाजी नाईक निंबाळकर यास १० जिल्हेज स्वार यशवंतगड ताबा मल्हारपंत दिमत दर खड्यास.

९७६१ पागा दिमत मानाजी पायगुडे पथक स्वार २५० एकूण.

१६० जानोजी काळे स्वार ४ एकूण.
८६१॥। पागा दिमत फिरंगोजीचंद स्वार ३९.
४१७९॥ पागा दिमत झलोजी मुटे स्वार २९०.
देखील पागा शिलेदार.
१३०० बापुजी भीमराऊ नकद.
१३२॥ त्रिंबक कृष्ण नकद.
४१ चोपदार असामी ३.
६२ खास बारदार असामी ४.
२१ रुस्तुमखान भालदार.
१६ हसन फरास दिमत फरासखाना.
११॥ पदाजी सभगीर दिवठ्या.
१९ एसाजी गुंजाल मोहतोपदार.
२० ढाल्ये असामी २ दिमत पागा हुजूर.
१०० जासूद जथेहाय असामी ६.
२१ उष्टरखाना निसबत बडेखान सारवान.
असामी २ यांस रोजमरा.
१०१।= कित्ता पागार हुजूर तुळजा भाऊ १.
३११८=। उष्टरखाना निसबत बडेखान.
१७८-। तेवज खर्च.
२९॥≡॥ रोषनाई तेल वजन पक्के ८२।२॥ एकूण.
१६ पोस्तखर्च शिमग्यास देणें.
२।।।= दप्तरखर्च खरेदी कागद.
७८- फरासखाना जाजम वगैरे केलें त्यास लागवड लागला तो.
॥·। कित्ता उष्टरखाना उंटाचे सलीते शिवावयाबद्दल सुतळी पक्के ८८१॥ एकूण निसबत बडेखान.
·। · सिमग्याचे खेळाबद्दल रंगास हळद आणिली वजन पक्के ८८१ दर ८८४ प्रमाणें.
३।।। व्याज खर्च गुजारत यादोबा नाईक सराफ.
११९ खरेदी कागद गुजारत साहुकार खाते १०.
३३६१ ताबा बापुजी भीमराऊ शिलक राहिली ते.

९१६१४.

[२४] लक्षुमणजी वल्लद पिराजी पाटील मोकदम मौजे माणकेश्वर परगणे भुलासाकर पराडा यास अभयपत्र लिहून दिल्हें कीं, तुह्मीं सातारीयाचे मुकामीं येऊन हकीकत जाहीर केली कीं, मौजे मजकूरचे मोकदमी दरोबस्त आपली आहे; त्यास तेथें सैद आरब जाहागीरदार तेथें आहेत, त्यांणीं व आपले बिरादर भाऊबंद यांणीं रा० सुलतानजीराव निंबाळकर यांसी सामील करून आपणावरी नानाप्रकारें कसाले करून परागंदा केलें, याजकरितां साहेबीं त्याचें पारिपत्य करून वतनावरी स्थापना करावी. आपली सगळी मोकदमी आहे त्यापैकीं निमे मोकदमी वडीलपण साहेबांस स्वसंतोषें दिल्ही असे; याजप्रमाणें घेऊन जाहागीरदारास व बीरादरास ठिकाणें ठेवावें ह्मणोन. त्याजवरून तुह्मांपासून निमे मोकदमी वडीलपण सरकारांत लिहून घेतली आहे. जाहागीरदाराचें व तुमच्या बिरादराचें पारिपत्य करूं आणि पांच वर्षे पर्यंत निमे मोकदमीचा अंमल करावा. पांच वर्षे जाहालीयावरी तुह्मी निमे मोकदमी सोडवावयाबद्दल कबूल केले मुकरार रुपये ५००० पांचहजार ते सदरहू रुपये घेऊन तुमचे निमे मोकदमीचे खरीदखत लिहून घेतलें आहे, तें तुमचे तुह्मांस देऊं. सदरहु रुपयांचा कबूलकतबा अलाहिदा घेतला असे. तोही देऊं. मुदतीस रुपये सरकारच्या गुमास्तीयाचे न द्याल तर निमे मोकदमीसी तुह्मांस संबंध नाहीं. गांवांत जो आकार होईल त्यांत जाहागीरदार मोकासीयाचा ऐवज वजा करून बाकी ऐवज राहील त्यांत शिबंदी द्यावयाची वजा करून, जो ऐवज राहील त्यापैकीं तिजाई ऐवज नरहर रघुनाथ कुळकर्णी मौजे मजकूर याचा वजा करून, बाकी हिस्से दोन राहतील त्यांत निमे तुह्मांस देऊन निमे आह्मी घेत जाऊं; येणेंप्रमाणें तुमचें चालऊं. अभय असे ह्मणोन कौल लिहून दिल्हा असे.

इ. स. १७४६।४७
सबा अर्बैन
मया व अलफ.
रजब १३.

[२५] बाबले कामत यास पत्र कीं दक्षिणप्रांतीं समुद्रांत सरकारचा अंमल चालत नाहीं तरी तुह्मीं आरमार सरकारचें करून सरकारचा पावणीचा अंमल चालता करून दक्षिण प्रांतांतील तरांडी वसईस येत तें करणें. तुह्मीं साहेब काम चालतें करून हुजूर दर्शनास येणें. तुमचे मातबरीप्रमाणें बहुमान केला जाईल व पावणीचा ऐवज जमा होईल त्यापैकीं निमे सरकार वगैरे यास खर्चाकारणें निमे सरकारांत जमा करणें ह्मणून मशारनिल्हेस पत्र १.

इ. स. १७४६।४७
सबा अर्बैन
मया व अलफ
सवाल १७.

---

(24) Laxman wallad Piraji Patel of Mankeshwar in Pargana Bhulasakar Parada, was deprived of watan by the Arab Jahagirdar of village and Sultanjirao Nimbalkar, and asked the assistance of the Peshwa. He offered to surrender half the watan to Government on condition that it would be restored to him after 5 years on payment of Rs. 5000. The offer was accepted.

A. D. 1746-47.

तुह्मी साहुकार घेऊन याल त्याजपासून जकात व कोलावण सरकारचे शिरस्ते बमोजिब घेतली जाईल; जाजती उपसर्ग लागणार नाहीं. ऐसें पत्रें.

[२६] बेशमी शरीयतपन्हा शेख दाऊद बिन शेख हसन हरकार साकीन कसबे केळसी सुभा परगणे दाभोळ हल्लीं वस्ती कसबे ठाणे प्रांत साष्टी तर्फ मजकूर यासी वतनपत्र दिल्हें ऐसेजे. तुह्मी हुजूर शाहुनगर नजीक किल्ले सातारा येथील मुकामीं येऊन अर्ज केला कीं, कैलासवासी राऊसाहेब व आपासाहेब यांणीं फिरंगाण प्रांतीं मसलत केली ते समयीं आपण श्रम साहास कष्ट मेहनत बहुत केली आहे, तरी साहेबीं मेहरबान होऊन परगणे साष्टी व प्रांत बेलापूर व परगणे उरण येथील काजीपणाचें वतन नूतन करून द्यावें ह्मणोन. त्यावरून पूर्वीं फिरंगाण प्रांतीं मसलत केली ते समयीं तुह्मीं श्रम साहास व कष्ट मेहनत बहुत केली हें जाणोन तुह्मांवर मेहेरबान होऊन काजीपणाचें वतन नूतन करार करून दिल्हें असे. बितपसील:—

इ. स. १७४६।४७.
सबा अर्बैन
मया व अलफ.
जिल्हेज २१.

प्रांत साष्टी १ तर्फ ठाणे १ तर्फ घोडबंदर १ तर्फ धारावी १ तर्फ मालाड १ तर्फ मराळे १ कसबे वानरें १ तर्फ तुरबे १ तर्फ आटगांव पैकीं सायवान.

प्रांत बेलापूर १ तर्फ पंचनंद १ तर्फ खेरणें.

परगणे उरण.

एकूण अकरा तर्फांचे काजीपणाचें वतन नूतन तुह्मांस करार करून दिल्हें असे. तरी काजीपणाची खिजमत शरीयत प्रमाणें चालवून काजीपणाचा हक्क शिरस्तेप्रमाणें घेऊन तुह्मी व तुमची अवलाद अफलाद काजीपणाचें वतन अनुभवून सुखरूप राहणें ह्मणोन वतनपत्र दिल्हें असे. येविसीं साहित्यपत्रें.

---

(25) Bable Kamat was informed that the portion of the Sea, adjoining the Southern Country was not under the jurisdiction of Government, and that he should therefore prepare a fleet, grant passes of protection and see that ships from the Southern Country sailed up to Bassein.

A. D. 1746-47.

Bable was told that if he accomplished this object, his services would be duly recognized

(26) Shek Daud bin Shek Hasan Pârkar, of Kelsi, now residing at Thânnâ was granted the Watan of Kázi in Prânt Salsette, Belapur and Uran, for his exertion and enterprize during the campaign made by the former Peishwa and Appásaheb in the territory of the Portuguese.

The officers of the Mahals were directed to allow the grantee to issue permits for marriages among Mahomedans in future. Such permits were hitherto issued in these Mahals by Government.

२ देशाधिकारी व देशलेखक वर्तमान भावी यांस.

१ कित्ता (१ प्रांत साष्टी १ परगणे उरण)

१ कित्ता (१ तर्फ पंचनंद १ तर्फ खैरण)

१ देशमुख देशपांडीये यांस.

१ प्रांत साष्टी १ प्रांत बेलापूर १ परगणे उरण.

३ मोकादम यांस पत्रें.

१ परगणे उरण १ कित्ता (१ तर्फ पंचनंद १ तर्फ खैरण)

१ प्रांत साष्टी.

२ कित्ता पत्रें कीं काजीपणाचें वतन सरकारांत होतें याजमुळें सुभ्याची चिठी देत होते. हालीं काजीपणाचें वतन यास दिल्हें असे याची चिठी जे निका लागेल वसईच्या काजीपणाचेच दंड्याप्रमाणें यांचें चालवणें. यास काजीपणाचें वतन दिल्हें आहे. निकाचे वगैरे कामास तुह्मीं मुजाहम न होणें ह्मणोन पत्रें.

१ त्रिंबक विनायक यास प्रांत बेलापुराविसीं.

१ रामाजी माहादेव नामजाद प्रांत साष्टी यास.

[२७] रा० लक्ष्मण शंकर याचें नावें पत्र लेहून दिल्हें कीं जैतपूरचा किल्ला घेऊन तुमचे स्वाधीन केला होता. त्यास बुंधेलीयाचा आमचा तह जाहला याजकरितां किल्ला राजे जगतराज यासी देविला असे. तरी आपलें ठाणे उठवून किल्ला त्याचे हवाला करणें ह्मणून पत्र १

इ. स. १७४६-४७.
सबा अर्बैन
मया व अलफ.
जिल्हेज १३.

[२८] नारो शंकर यास पत्र कीं परगणे येरछ तालुका राजे सभासिंग व राजे जगतराज यांकडील गांव सालमजकुरीं तिजाई मुलुख घेतला त्या वांटणींत गांव आले आहेत. ऐशास राजे सभासिंग यांजकडील गांवची कमावीस राजश्री गोविंद बल्लाळ करतील. व राजे जगतराज याजकडील गांवची कमावीस राजश्री लक्ष्मण शंकर करतील. गांव बितपसीलः—

इ. स. १७४६-४७.
सबा अर्बैन
मया व अलफ.
मोहरम १.

---

(27) The Fort of Jaitapur was taken and was given over to the management of Laxman Shankar. A treaty having been concluded between the Peshwa and Bundele, &c. orders were issued for the transfer of the Fort to Jagatraj.

A. D. 1746-47.

(28) A third portion of the territory of Raja Sabhasing and Raja Jagatraj, comprising certain villages in Pargana Erachh, was taken by Government this year.

A. D. 1746-47.

निसवत गोविंद बल्लाळ दिमत सभासिंग. कित्ता गांव.

१ मौजे कटरा खालसा. ४ देवढीदाखल गांव (१ छपार १ पथवेडी १ खिरिया १ निवैला) ३ निसवत रावगोपाळसिंग (१ सीहा १ करगवा १ गुदाहो) २ दिवाण हिंदूसिंग (१ बरधळ १ पुरा) २ दिवाण सकरासिंग (१ गोंती १ आडोल) ४ कुवर उमेदासिंग (१ ताकेड १ लहपरी १ नकेला १ अंतरसुमा) २ दिवाणखाननू (१ करीगवा १ गातो) ९ निसवत जाफरखान (१ बिलहटी १ गोरा १ तीसरा १ देडिरा सारंगा १ जुजारपुरा) २६ निसबत जागीरदार (१ डिकोली १ सेमरा १ लराउडो १ सिंगार १ मुबराई १ बिलसेरी १ पीपरी १ फतेपूरगाव १ गेदो १ खिरीया १ ढेरा १ कबुला १ खलार १ खंडेजी १ साईपुरा १ मेढुका १ बाजीपूर १ कासीपूर १ जोरा १ ननोली १ भरसुडा १ गोगल १ पधरा) ४ निसबत दुरुगसिंग पवार (१ पंडारिगढी १ पहाडपुरा १ सिमरीया १ मोनेसे) ८ दिवाण पंचामसिंग (१ सिकंदरा १ पनाहरी १ पेवारखा १ मंडरा १ जरीहा १ डिगीसा परेछा १ दताउली) ७॥ दिवाण महकुमसिंग (१ बरेडा १ बबई १ सनो ॥ चिरगवा १ ग्यारई १ सलेमधुई १ सुखापुरा १ काईला) ३ हंसराज बक्षी (१ खलाल १ देवरा १ भदरवारो) येरछ कसब्याची जकात रुपये ४९०० आहे. तो अंमल तुह्मी करणें, गोविंदपंताकडे न देणें. ७ निसबत सवाईराऊ (लभेरो १ धेवारा १ पटा १ बिलहटी १ हरदुवा १ इकसक १ जवरा) २ कुवर लछीमनसिंग (१ असावोक १ टीहरका) ३ राव हरीसींग (१ कडीगांव १ कुदेया १ खरहला) २ निसबत कुवर माखनडी (१ जखेरा १ बिरगावो) १६ निसबत राव लछमनसिंग (२ सुव १ परीछा १ सीज झीरीया १ इगुही १ करीता १ सीसा १ ढेरी ढेरा १ धनोरा पाल चांद लुवा १ चचाउली १ बोधरा १ छटसेरी १ गडरोली १ ग्वारजी, १६ जमीदार निसबत राव चंद्रभान गुरसराई (१ गुर सराई १ मंडोरी १ बछेहो १ नगरा १ अलमपुरा १ बरमपुरा १ मठपुरा १ अजनेरी १ बरोरा १ हल्हरोळी १ हसाधरी १ खिदरपुरा १ आडजरा १ छिरोरा १ मल्हट १ डुडी) १ मौजे भुजोघ निसबत दिवाण बिसनासिंग. ९ निसबत राव इंद्रजीत (१ एरा १ मंडोरा १ तीघरां १ इमलीया १ बारोदा १ पुरा १ बरेछ १ खिरीया १ बारोदा खुर्द, ४ निसबत उदोसिंग (१ बेहोना १ कोळीया १ कुंडा १ बारोदा) गांव सुमार १३१॥.

निसबत लक्ष्मण शंकर दिमत जगतराज गांव.

१ मौजे कवजी १ पुलहरा १ दासजो १ ठाणे गडबाई १ निबवली १ सतऊपुरा १ दखनेसर १ कुरोटा १ अस्ण १ परसोह १ घवोली १ गारेज १ जबुजा १ धुरेया. गांव सुमार १४. तेरीज—१३१॥ निसबत गोविंद बल्लाळ.

१४ निसबत लक्ष्मण शंकर.

१४९॥

एकूण एकशें साडे पंचेचाळीस गांवाचे वांटें तुह्मी न जाणें. सदरहु गांवची कमावीस मशारनिल्हे करतील ह्मणून नारोशंकर याच्या नांवाची सनद.

इ. स. १७४६–४७. सबा अर्बैन मया व आलफ मोहरम ३.

[२९] कौलनामा लिखिदयो सीध श्रीमहाराज धी राजश्री महाराजा श्री हीमती सीद्ध जुदेव कौं श्रीमंत राजश्री मुख्य प्रधान श्रीबाळाजी बाजीरावजीनें अपार राजश्री मलारजी होलकर वा राजश्री जयाजी सिंदे वा राजश्री रामचंद्र बाबाके मारफातसौं करार आधोराज मुलक भदावरकौ बाट देनौको ठहरो सो हमकौ महजुरहै. तीस बमोजीब मारफात राजश्री पंडीत नारो शंकरके हीसा बाट करी दयो मालसाईर वा सब बाबनसुधा तीसरो हुकुमकाहुकौ न रहै. जो कोउ खरकसा मुलकमै करे तौ सीरकारतै तुमारा गौरख समानो करैगें कोउकाहु बातसो मुजाहीम न हुहै. और गढीकोट जीमी बीघा बीस्वा जागा बमुजीब तनखा बराबर माफीक करार बाट देना. आधो तुमकौ दयो आधो राज्य सरकारमे देना. मीती माहा सुदी ९ सन १८०३.

कौलनामा लिखिदयो श्री महाराजश्री राव इंद्रजीत जुदेवकौ श्रीमंत राजश्री मुख्य प्रधान श्री बाळाजी बाजीरावजीनै अपार राजश्री मलारजी होलकर वा राजश्री जयाजी सिंदे वा राजेश्री रामचंद्र बाबा जुने मारफात पंडीत श्री नारो शंकरके आगे हमसैं तुमारे तरफसे कोउ वातको तफावत पऱ्योहा तो सोअव यकला सान्नयो ज्या भाती आगे तैं एकला सख्योहार चलो आयो है ताइभात अवचलो जाय. करहराको कीलो वा कसबो कसबो कराहरा माल साईर सुधी तुमपर राखो ताकोन जरानो करार करो सो सरकारमे देना ऐर परगने मजकुरके गांव वोडसेके तरवा तुमारे तरफ माफीक पटेके चले आये हैं. तीन सीवाय बाकी परंगना करहरा माल सायर सुधा गांव बाट लेना. दोइ हीसे सरकारमे रहे है येक हीसाके गाव तुमको दये और तुमारे राज्यकी खंडी मारफात दीवान रघुवंसके ठहरी बमोजीब पठेके सीवाय येरछके गाव पटे बमोजीब खंडीके रुपया दैऐ जाइ वो मीती माहा सुदी ९ सन १८०३.

मराठी तरजुमा.

कौलनामा लिहून दिल्हा सिध श्री महाराजाधिराज श्री महाराजा श्री हिमतीसिद्धजुदेव यांस श्रीमंत राजश्री मुख्य प्रधान श्री बाळाजी बाजीराव यांणीं अपार राजश्री मल्हारजी होळकर व राजश्री जयाजी सिंदे व रा० रामचंद्र बाबा यांचे मार्फत करार कीं अर्ध राज्य भदावरचा मुलुख वांटून देणेचें ठरलें तें आह्मांस जाहीर झालें. त्याप्रमाणें रा० पंडित नारोशंकर यांचे मार्फत वांटून दिलें. माल साइर व सर्व बाबीसुद्धां तिसरे कोणाचाही हुकूम नाहीं. जर कोणी मुलकावर

A. D. 1746-47.

(29) These Sanads are in Hindusthani language and record agreements entered into with the Peshwa, by Maharaja Himati Sidh Ju Deo and Rao Indrajit Ju Deo, in regard to the division of the territory of Bhandawar.

लढाई तंटा करील तर सरकारांतून सांभाळ होईल. कोणच्याही प्रकारची काळजी करूं नये. आणि गढी-कोट जिमी-बिघा बिस्वा-जागा तनखा वगैरे बराबर वांटून द्यावा. अर्धा तुह्मांस दिल्हा; आणि अर्धराज्य सरकारांत द्यावा. मिती माघ शुद्ध ९ सन १८०३

कौलनामा लिहून दिल्हा श्री महाराज राजश्री इंद्रजीतजुदेव यास श्रीमंत राजश्री मुख्य प्रधान श्रीबाळाजी बाजीराव यांणीं अपार राजश्री मल्हारजी होळकर व रा० जयाजी सिंदे व रा० रामचंद्र बाबा यांचे मार्फत पंडित श्री नारोशंकर यांचे पुढें आह्मी तुमच्या तर्फेनें कोणच्या गोष्टीची तफावत पडेल तर एकटे झाल्यावर ज्या रीतिभाती व व्यवहार पूर्वींपासून चालत आल्या आहेत तशाच चालतील. करहराचा किल्ला व कसबा करहरा माल साईर सुद्धां तुह्मांकडे ठेवा, त्याचा नजराणा करार केला तो सरकारांत द्यावा; आणि परगणे मजकूरचे गांव वोडसे केतर व तुमचे मार्फत माफक पटेनें चालत आले आहेत ते तीन शिवाय बाकी परगणा करहरा माल साइर सुद्धां गांव वांटून घ्यावे. दोन हिस्से सरकारांत राहिले आहेत. एक हिशाचे गांव तुह्मांस दिले. आणि आमचे राज्याची खंडणी दिवाण रघुवंस याचे मार्फत ठरली त्याप्रमाणें पटे शिवाय येरछचे गांव पटेप्रमाणें खंडणीचे रुपये जाऊन दिल्हेची मिती माघ शु॥ ९ सन १८०३

इ. स. १७४६-४७.
सबा अबैन
मया व अलफ.
मोहरम ४.

[३०] देणें राणी सीताजी दतीयेकर यासी मिठाईबद्दल गांव परगणे येरछ दतीयेकरापासून येरछ परगणे याचे गांव सरकारांत घेतले त्यांपैकीं दिल्हे गांव १ मौजे बारनावो १ मौजे बारोदा १ मौजे पुलीया १ मौजे पाडरी.

पत्रें

१ नारोशंकर याचें नांवें सनद कीं चार गांव राणीकडे चालवीत जाणें ह्मणून सनद.
१ राणीच्या नांवें सनद चौ गांवची.

इ. स. १७४६-४७.
सबा अबैन
मया व अलफ.
मोहरम १४.

[३१] परगणे उचेबरा व परगणे पथरट व परगणे सोहावा व कोटी येथील तिसरा हिसा बुंधेलीयापासून सरकारांत घेतला आहे. तेथील कमावीस रामराव नरसिंह यासी सांगितली असे. परगणे मजकूरची नेमणूक व राऊत चाकरीचे यासी नेमणूक.

---

(30) Out of the villages in Pargana Erachh taken from the Datiyekar,
A. D. 1746-47. 4 were given to Sitaji Ranee of Datiya, as a present.

A. D. 1746-47. (31) A third portion of Pargana Uchebara Patharat, Sohawa and Koti was taken from the Bundheles.

स्वार शिलेदार नेमणूक दरमाहे रुपये	कारकून सालिना नेमणूक रुपये.
१२० शंक्राजी गोजदेव	३०० शंक्राजी गोजदेव परगणे उचेबरा.
३।= थोर ९ दर ।=	३०० बनाजी सोनदेव परगणे पथरट.
॥= लहान ५ दर ८=	
४ एकमाही.	
९० बनाजी सोनदेव	३०० कासी येसाजी परगणे सोहावा.
२॥= थोर ७ दर ।=	
।= लहान ३ दर ८=	३०० चिंतो कासी परगणे कोटी.
३ एकमाही.	१२००
७८॥ कासी येसाजी	
२। थोर ६ दर ।=	
।= लहान ३ दर ८=	
२॥= एकमाही.	
२६। चिंतो कासी	
·॥· थोर २ दर ।=	
८= लहान	
॥=	
३१५	

येणेंप्रमाणें दरमाहे तीनसें पंधरा व सालिना रुपये बाराशें प्रमाणें चाकरी घेऊन देत जाणें ह्मणून रामराव नरसिंह याचें नांवें सनद. १

इ. स. १७४७-४८.
समान अबैन
मया व अलफ.
रविलावल २.

[३२] किल्ले हरिश्चंद्र येथील जागीरीचे गांव मोगलाईत किल्ला होता तेव्हां गांवही मोगलाईत होते. हालीं किल्ले मजकूर स्वराज्यांत आला, सबब गांव किल्ले मजकुराकडे जागीर दिले. गांवगन्ना परगणे कोतूळ:—

(32) The fort of Harischandragad, which belonged to the Moguls, came into the possession of Government. Villages were assigned for its support.

A. D. 1747-48.

१ मौजे पिंपळगांव १ मौजे मोगरस १ मौजे आबीटाखिंड १ मौजे बोरी १ मौजे चास १ मौजे पिसेवाडी १ मौजे भालेवाडी १ मौजे जांबुत खुर्द १ मौजे जांबुत बुद्रुक १ मौजे केळी १ मौजे खडकी १ मौजे चांदसुरज १ मौजे माणीक वोझर १ मौजे वकुशेत १ मौजे शिंगणवाडी १ मौजे ल्व्हाळी १ मौजे कुरुसवाडी १ मौजे फौडस १ मौजे सिंदे १ मौजे चिंचवणें.

वीस गांवचा वसूल किल्ले मजकुराकडे सुरळीत देणें, आबाद गांवची खंडणी कर्णाजी शिंदे नामजाद किल्ले मजकूर याचे विद्यमानें लावणें आणि वसूल किल्ले मजकुराकडे सुरळीत देणें. गैर आबादी गांव आहेत तेथील आबादानी करून वसूल किल्ले मजकुराकडे देत जाणें ह्मणून लिहिलें असें पत्र १.

इ. स. १७४८-४९
तिसा अर्बैन
मया व अलफ.
जमादिलाखर २८.

[३३] तालुका बखतसिंग व कालु पटेल भिलोल किल्ले सोनगड व मांडवगड यांणीं हुजूर येऊन नालशाचे मुकामीं येऊन अर्ज केला कीं परगणे नालसे येथील गांव वगैरे बितपसील. कित्ता सनद पेशकस रुपये १५० मौजे बागडी, ७५ मौजे सारेपूर एकूण दोन गांव सवा दोनशें रुपयांचे रा० यशवंतराव पवार याजकडोन आपणाकडे चालत होते. हालीं परगणे मजकूर सरकारांत जाला आहे तरी मेहेरबान होऊन सदरहु गांव पूर्ववत प्रमाणें करार करून द्यावे ह्मणोन मनास आणून पवाराकडोन गांव चालत होते हा अर्थ व भिलोल मजकूर सरकारचे कामाचे जाणून सदरील दोन गांव करार करून दिल्हे असेत, तरी सवा दोनशें रुपये सरकारांत वसूल घेऊन गांव हरदुजणाकडे चालवणें, आणि चाकरी घेत जाणें. कोठें चोरी मारी जाली तरी हरदु जणांनीं जाब करून द्यावा. चोरीचा जाब करून न देत तरी गांव फिराऊन घेतले जातील ह्मणून.

कित्ता सनद मौजे सादराबाद परगणे जाहागीरपूर हा गांव मोकासा रा० यशवंतराव पवार याजकडून आपणाकडे चालत होता त्यास हालीं परगणे मजकूर सरकारांत जाला आहे तरी मेहरबान होऊन पूर्ववताप्रमाणें करार करून द्यावा ह्मणोन. त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे तरी मौजे मजकूर पवाराकडून चालत आलें असेल त्याप्रमाणें मनास आणून त्या बमोजिब वाजवी पैका घेऊन गांव इजारा पहिला होता त्याप्रमाणें भिलोल मजकुराकडे चालवणें ह्मणून कमावीसदार.—१

A. D. 1748-49.

(33) The Pargana of Nalse and the forts of Songad, Mandavgad, were taken by Government from Yeshwantrao Powar. The villages of Bagadi and Sarepur of the said pargana, were granted by the Powar to Bakatsing and Kalu Patil. These and some lands and Haks were ordered to be continued to these 2 persons, subject to an annual payment of Rs. 225 to Government. These two persons were to be answerable for all thefts.

रा० यशवंतराव पवार यांणीं शेताच्या व गांव मोकासेच्या सनदा दिल्ह्या आहेत, त्याप्रमाणें मेहरबान होऊन सरकारांतून चालवावें ह्मणून, त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी सन समान अर्बैन या वर्षामागें शेतें व मोकासे चालत आले असतील त्याची चौकशी करून सुदामतप्रमाणें चालवणें आणि भिलोल मजकुरापासून सेवा चाकरी घेत जाणें.

कित्ता सनद कीं किल्ले मजकूरचे गिर्दनवाईस चौक्या येणेंप्रमाणें आहेत बितपसीलः—

१ मौजे पनाले परगणे नालसे येथील बिलोची आंबे याजवळ चौकी.

१ मौजे कुडा परगणे नालसे.

१ मौजे जमसी घुमटाजवळ चौकी नालसे व मांडवगड यामध्यें.

१ हलाबाद तलाव येथील चौकी.

याप्रमाणें चार चौक्या आहेत त्यास दर चौकीस दर बैलास कवडी दुकंडाप्रमाणें राजश्री यशवंतराव पवार याचे अंमलांत घेऊन रखवाली करीत होतों त्याप्रमाणें करार करून दिल्हे पाहिजे. त्यावरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी पेशजी पवाराच्या अंमलांत चालत आलें असेल तें मनास आणून त्याप्रमाणें भिलोल मजकुराकडे चालवणें आणि याजपासून चाकरी घेत जाणें.

[३४] रामाजी महादेव यास सनद कीं किल्ले माणिकगड रा० मानाजी आंगरे वजारतमाहा यांचा पेशजी सरकारांत घेतला होता तो हालीं त्यांचा त्यांस देविला असे. राजश्री स्वामीकडील बहिरो हरी व हुजरे व देवढीकडील केसो महादेव व हुजरे यांजबरोबर सरकारचे नारायण बापुजी व खासबारदार पाठविले आहेत. यांचे गुजारतीनें मशारनिल्हेचे हवालीं किल्ला करून पावलीयाचें कबज रा० मानाजी आंगरे वजारतमाहा यांचें घेऊन हुजूर पाठवणें ह्मणून सनद—१.

इ. स. १७४८–४९.
तिसा अर्बैन
मया व अलफ.
साबान ९.

[३५] किल्ले गडगडा सरकारांत घेतला आहे तो मीरजा बाकर याचे स्वाधीन करणें. शिवाजी बाबाजी व सदाशीव कानो जमेनीस पाठविले आहेत यांचे मारफतीनें स्वाधीन करून पावलीयाचें कबज घेणें ह्मणोन नारायण बापुजी यास सनद सादर केली असे—१.

इ. स. १७४८–४९.
तिसा अर्बैन
मया व अलफ.
जिलकाद २.

---

(34) The fort of Manikgad, belonging to Manaji Angria, which had formerly been taken by Government, was restored to him.

A. D. 1748-49.

(35) The fort of Gadgada, which had been taken by Government, was ordered to be handed to Mirja Bakar.

A. D. 1748-49.

[३६] मोतीलाल वल्लद हिमतराय चौधरी परगणा पलाणी याणीं हुजूर येऊन विदित केलें कीं परगणे मजकूरचा चौधरीपणा पुस्त दर पुस्त आपला आपण करीत आलों. ऐसें असतां आपले बापानीं खवासीण ठेविली होती तिजपासून खानजया जाला. त्याणीं मौजे निंबईछ परगणे मजकूर हा बळाविला आहे, आपलें ऐकत नाहीं, तरी तो गांव खालीं करून देववावा; आपण सरकारांत दोन हजार रुपये देऊं, ह्मणून विदित केलें. त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी तुह्मी शें दोनशें राऊत मौजे मजकुरीं पाठवून खानजयास बाहेर काढून, मोतीलाल याचे हवाले करून, याजपासून दोन हजार रुपये घेऊन, गांव त्याचे हवालीं करणें. जरी दोन हजारांहून विशेष जीव आढळला तरी जेथवरी साधतील तेथवरी घेऊन हुजूर पाठवावे ह्मणून लक्ष्मण शंकर यास पत्र—१.

इ. स. १७४८–४९. तिसा अर्बैन मया व अलफ. जिलकाद २५.

[३७] हशमतुल्ला बाकर चाकर सरकार यास साल गुदस्ता तर्फ वनखल प्रांत कल्याण येथें राहावयास गांव दिल्हे १ मौजे मासगांव १ मौजे आहिवली १ मौजे विसावे–सदरहु तीन गांव माणिकगडानजीक दिल्हे होते; त्यास साल मजकुरीं किल्ले माणिकगड आंगऱ्याकडे दिल्हा सबब सरकारचे चाकरमान्याचे कबिले किल्ल्यानजीक ठेवावयाचे कार्याचे नाहींत. याजकरितां चाकरमाने लोकांकडून दूर करून सदरील तीन गांव पाटिलाकडे करार केले असेत ह्मणोन पत्रें:—१ त्रिंबक विनायक यास १ आपाजी हरी यास १ हशम चाकर सरकार यास.

इ. स. १७४८–४९. तिसा अर्बैन मया व अलफ. रबिलावल १६.

[३८] हरि विठ्ठल दिमत मेघःशाम बापुजी याचें पत्र आलें, त्यांत मजकूर येणेंप्रमाणें:— बासवाडेकर आह्मांसमागमें होते. तेथील मामलत मध्येंच बुडते. त्यास उज्जनीहून यशवंतराव पवार दरकूच चाकरीस चालिला तेथून आह्मीं रा० बावास पत्र लिहिलें जे, बासवाडेकराविशीं आज्ञा काय? त्यास हा मराठा बेमान हरयेकविसीं खराबींत आणून याची मस्ती उतरावी ही गोष्ट रा० बावास अवश्यकच आहे, त्याजवरून आह्मांस त्यांनीं चिठी पाठविली

इ. स. १७४८–४९. तिसा अर्बैन मया व अलफ. जमादिलावल १६.

---

(36) Motilal Walad Himatroy, Chowdhari of Palani, represented that Khan Jya, the son of his father's mistress, had usurped the village of Nimbaichh, and agreed to pay Rs. 2000 if it were restored to him. Orders were therefore issued to Laxman Shankar to depute one or two hundred troopers to the village, and to hand it over to Motilal. Laxman Shankar was further told that if Motilal was found to be able to pay more than Rs. 2000, as much more money as could be obtained, should be levied from him.

A. D. 1748-49.

(37) The fort of Manikgad was this year given to the Angria. Three villages assigned for the residence of some soldiers from Kolaba who had accepted service under Government, being in the vicinity of the fort, were taken back from them and handed over to the Patils.

A. D. 1748-49.

जे, बासवाडेकर पुण्यास पाठवून देणें. यंदांची मामलत सरकारांत लागेल. हे रडत बसतील. पुढील पुढें पहातच आहों. बासवाड्यास एका ब्राह्मणाचें कृत्य, तेथें हा मराठा इतका बखेडा करून बसला; यास्तव ते मामलत खालीं पडल्यानें सहजच फजीत होतील. तें पत्र आजीच आलें. त्यास यशवंतराव गेल्यावर आह्मी डिगेजवळी चार मुकाम केले आणि रतलामचे कमावीसदार रा० त्र्यंबक मल्हार निसबत रा० बाबा यासी आणून त्याचे विद्यमानें बासवाड्याची मामलत विलेस लाविली. पहिला पवारानें २९००० पंचवीस हजार वसूल घेतला आहे तो खेरीज करून येणेंप्रमाणें करार केला. बितपसील रुपये:—

मामलत सालमजकूर देखील बाकी रुपये.

१३००० बाकी साल गुदस्त सन-समान खंडणी रुपये

३९००० बाकी

४९००० खंडणी सन तिसा साल मजकुरबद्दल पट्टा स्वामीचा.

९८०००

आह्मांस पथकसुद्धां बासवाड्यास नेलें, सबब रोजमरा एक माहान, पडल्या घोड्याचा ऐवज करार रुपये.

१०००० रोजमरा एक माही करार.

४००० पडल्या घोड्याबाबत करार ऐवज अजमास.

१४०००

एकूण बहात्तर हजार करारपैकीं बासवाडेकराच्या वाकेबाद मामलतीनिमित्यें यशवंतरावांनीं धरून आणल्या आहेत त्या सुटेत तों तहकूब ठेवावे रुपये २४००० चोवीस हजार. बाकी अठेचाळीस हजार रुपये ज्येष्ठ अखेरपर्यंत दो वायद्यांनीं द्यावे. येणेंप्रमाणें त्र्यंबक मल्हार यांणीं निशा करून घेतली. आणि बासवाडेकर याचे हवाला केले. पट्टा त्यास करून दिल्हा. पवाराचा काडीमात्र उपसर्ग लागों देणार नाहीं ऐसी त्याची निशा करून पैका उभा केला. चोवीस हजार वाकेचे माथा ऐवज तहकूब राहिला. त्यास वाकेबाद जावरांत आहेत. त्याजवर स्वारी केल्यानें हस्तगत होऊन चोवीस हजार रुपये रोखच हातास येतील. परंतु यशवंतराव चाकरीस गेला, किंवा आणखी कोणीकडे गेला हें ठीक कळेल, व रा० बावास हें वर्तमान लिहिलें आहे, त्यांची आज्ञा येईल त्याप्रमाणें वाकेविसीं वर्तणूक करूं. चार महिने पवाराचा पाय बासवाड्यांत नसल्यावर हा पैका हातास लागेल. बासवाडेकरावर यंदा सक्ती फार जाहली. मुलुख अगदीं लुटला. गांवगन्ना कुळें धरून यशवंतरायांनीं खंडणी छत्तीस हजार परभारीं केली. पैकीं वीस पंचवीस हजार पैका त्याचे हातास आला. बाकी राहिला ऐवज त्याजनिमित्य वाके आहेत. सोडवाव्या. कदाचित आमचे हातें वाके न सुटल्या तर वाके सोडवावयास पैका पडेल तो चोवीस हजारांपैकीं मजुरा देऊन राहिला ऐवज घ्यावा. येणेंप्रमाणें बोली आहे. त्यास

राजश्री बावाची आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. सेवेसी श्रुत होय. बासवांडेकरास एक अभयपत्र आल्यानें त्याची खातरजमा होईल. येविसी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. कदाचित पवाराकडे मामलत देणें पडली तरी पैका दिल्यानें ते रजावंदच आहेत. आजपर्यंत बासवाड्याचे एकमुठी चाळीस पन्नास हजार रुपये कोणेही सालांत घेतले नाहींत. लुटून मारून हातास बेमानीनें येईल तितकें घ्यावें, परंतु सुरळीत मामलत उगविली नाहीं; आणि अतःपर बासवाडेकराचा त्याचा बनाव बसत नाहीं. तेही दो महिन्या सेवेसी येतील. सेवेसी श्रुत होय ह्मणून पत्र पाठविलें तें बार करून ठेविलें असे.

इ. स. १७४९–५०.
खमसेन
मया व अलफ.
जमादिलाखर २५.

[३९] रामाजी बापुजी यांस पत्र कीं नारो खंडेराव याचीं गुरें किल्ले जीवधनीकडे चारणीस होतीं, त्यास जीवधन मोगलास दिली ते समयीं लोक किल्ल्यावरून उतरले. त्यांणीं किल्ल्यानजीक गांवचीं गुरें धरून चावडेस आणिलीं. त्यामध्यें नारो खंडेराव याचीं गुरें २ गाई १ ह्मैस तीन सर आलीं आहेत. तीं फिरोन देवावीं ह्मणोन रा० हरी दामोदर याणीं विनंती केली. त्यावरून सनद सादर केली आहे. तर नारो खंडेराव याचीं सदरहु गुरें आलीं असलीं तर चौकसी करून देणें ह्मणून सनद १.

इ. स. १७४९–५०.
खमसेन
मया व अलफ.
जमादिलावल १४.

[४०] कसबे सावरेगांव समत परांडे हा गांव मोंगलाईकडून रा० नारो तुकदेव यास आहे. त्यास कित्येक लोकांचा उपसर्ग लागतो. तरी मौजे मजकुरची रखवाली शंभर रुपये आपले सरकारांत घ्यावे ह्मणोन विनंती केली. त्यावरून हें पत्र सादर केलें असे. तरी कसबे मजकुरची रखवाली करून गांवास उपसर्ग न लागे तें करणें, आणि रुपये १०० एकशें रखवालीचे घेऊन आपले हिशेबीं जमा करणें ह्मणून बहिरो राम कमावीसदार परगणे करकंब यासी सनद १.

A. D. 1748-49.

(38) A letter from Hari Withal, in the service of Meghasham Bapuji, informing the Peshwa that he led an army in Banswara and farmed out the Mamlat of the territory for Rs. 72000; that Yeshwantrao Powar had much devastated the territory, had levied Rs. 24000 from the ryots, and had carried off some people as hostages for the payment of an additional sum of Rs. 12000; that the hostages were in Jawara, and that their release would be effected if an attack was led against the province; that he had written to Rajeshri Bawa and that he would act according to his instructions.

A. D. 1749-50.

(39.) The fort of Jiwadhan was given to the Mogals.

A. D. 1749-50.

(40.) Naro Tookdeo represented that the village of Sawaregaum in Samat Paranda, which was granted to him by the Mogals, was frequently molested, and prayed that if Government would under-

[४१] प्रांत जुन्नर येथें सालमजकुरीं दमाजी गाईकवाड याचे दंग्यामुळें शिबंदी खर्च जाजती लागला, तो मझरा द्यावयाची आज्ञा करावी ह्मणोन रा० हरी दामोदर यांणीं विनंती केली. त्याजवरून मनास आणतां गाईकवाडाच्या धामधुमीकरतां शिबंदीखर्च जाजती लागला यास्तव सालमजकुरचा एक साल जाजती शिबंदी खर्च मझरा रुपयेः—

इ. स. १७५०–५१.
इहिदे खमसेन
मया व अलफ.
रजब ९.

२९७॥ सुभा निसबत शिबंदी.
१३४ ठाणें चाकण गुजारत गोपाळ भास्कर.

३९१॥ एकूण तीनशें साडे एक्याणव रुपये सालमजकुरीं खर्च लिहिणें. मझरा असेत ह्मणोन सनद १.

[४२] शंकराजी केशव प्रांत वसई यास पत्र कीं माणकोजी वडोळकर कासार याणें हुजूर येऊन नाजुक कामाचा मजकूर विदित केला कीं रणसोड शेणवी वगैरे यांनीं कबूल केलें आहे कीं कार्य करून देतों; आणि आमचा सरंजाम ठीक करून द्यावा. त्यावरून कासार मजकूर याचें वर्तमान रणसोड शेणवी याचे बोलीचें वर्तमान मनास आणून त्याचे मुद्दे कबूल केले

इ. स. १७५०–५१.
इहदे खमसेन
मया व अलफ.
साबान १३.

बितपसीलः—

रणसोड शेणवी यास इनाम द्यावें १ गांव मोकासा, १ पालखी, १ कडें सोन्याचें एक, नक्त रुपये पांच हजार ५०००.

---

take its protection, he would pay Rs. 100 to Government for the duty. The Kamavisdar of Karkamb was therefore directed to protect the village from disturbance, and to levy Rs. 100.

(41) Additional expenses on account of Sibandi have this year been incurred for Junnar in consequence of the inroads of Damaji Gaikwad. The following additioual amounts have therefore been sanctioned for the current year:—

A. D. 1751-52.

Rs. 257–8 Sibandis at the Subha.
134–0 Post Chakan.

391–8

(42) A sanad issued to Shankraji Keshav of Prant Bassein—Mankoji Kasar of Wadle, having come to the Peishwa stated that Ransod Shenvi and others had agreed to carry out a certain political plan on condition of proper saranjam grants being made to them. Hav-

A. D. 1750-51.

मनवेल दुबर दरवाजकरी यास इनाम १ गांव मोकासा, १ कडें सोन्याचें एक, नक्त रुपये पांच हजार ५०००.

अंतोन सोज दरवाजकरी यास इनाम १ कडें सोन्याचें नक्त रुपये पांच हजार ५००० १ गांव मोकासा.

येणेंप्रमाणें करार केला आहे. त्यास हें राजकारण कसें काय आहे, त्याची चौकसी करून करावेंसें तुमच्या विचारास आलें, तर तूर्त शें दोनशें रुपये खर्चास लागले तर देणें. याखेरीज राजकारणाकडील माणूस येत जाईल, त्यास पोटास लागेल तें देत जाणें. हें काम भाद्रपदमासीं करावें लागतें ह्मणोन कासार मजकुरानें सांगितलें; त्यास कासार मजकूर तुह्मांकडे पाठविला आहे. याचें वर्तमान मनास आणून तुमचे विचारें करावेंसें आलें तर हुजूर लेहून पाठविणें. उपरांत आज्ञा करणें ते केली जाईल. ह्मणोन सनद १.

रसानगी करारी याद.

[४३] दिमत रा० चिमणाजी पंडित सचीव यांस सनदा लेहून दिल्या रसानगी बरहुकूम

इ. स. १७५०–५१.
इहदे खमसेन मया व अलफ.
रमजान १.

याद किल्ले सरकारांत घेतले आहेत ते मशाररनिल्हेचे स्वाधीन करून कबजें घेणें ह्मणून सनदा सादर ३. किल्ले तुंग याविसीं. १ हवालदार व कारकून यांस. १ नारो रामचंद्र यास. १ नारो केशव यास. २ किल्ले तिकोना याविसीं. १ वाघोजी सिंदे नाईक किल्ले मजकूर यांस. १ नारो भगवंत यास.

---

ing considered the statement of the said Kasar and that of Ransod Shenvi the following has been agreed upon, viz:—

Inams to be granted to Ransod Shenvi.
1 Village in Mokasa.
1 Palanquin.
1 Gold Bangle.
Ready cash Rupees 5,000, five thousand.

Inams to be granted to Mr. Manvel De Bar, the gate-keeper.
1 Village in Mokasa.
1 Gold Bangle.
Ready cash Rupees 5,000 five thousand.

Inams to be granted to Anton De Souza, the gate keeper.
1 Gold Bangle. Ready cash Rupees 5,000 five thousand.
1 Village in Mokasa.

The above has been agreed upon; you should enquire into this affair, and pay, for the present, Rupees one or two hundred for expenses, if necessary. The aforesaid Mankoji states that the business in view is to be performed in the month Bhadrapad. He has been sent to you and if his statement be proved satis-

मशारनिल्हेकडील कमावीसदारास रुजू होऊन अंमल सुरळीत देणें ह्मणून जमीदारांस सनदा सादर.

१ तर्फ पोनमावळपैकीं गांव आपाजी बाबूराव याजकडे होते ते सालमजकुरीं दूर करून पंडित मशारनिल्हेकडे दिल्हे असे ह्मणून.

१ जिल्हे किल्ले तुंग व किल्ले तिकोना येथील बेगमीस दिल्हे.

१ परगणे शिरवळ येथील खालशाचा अंमल रामाजी यादव याजकडे होता तो दूर करून मशारनिल्हेकडे अंमल दिल्हा असे ह्मणोन.

एकून सात सनदा लिहून दिल्ह्या असेत. दोही किल्ल्यांविसीं हवालदाराचे नांवें हातरोखा व तर्फ पोनमावळ येथील गांवाविसीं जमीदाराचें नावें हातरोखा राजश्री स्वामींचा आला होता ते रा० सचीव पंताचे हवाला केले. त्याच्या नकला दप्तरीं ठेविल्या असेत.

---

factory, a report regarding the same should be submitted to government, when final orders would be issued.

A. D. 1750-51. (43.) The following Sanads were issued in favour of Chimnaji Pandit Sachiv.

Sanads directing that the forts taken possession of, should be committed to the charge of the said Pandit, whose receipts for the same to be taken, viz:—

3 For the Fort of Tung.
- 1 to the Havaldar and Karkun.
- 1 to Naro Ramchandra.
- 1 to Naro Keshav.

3

2 For the fort Tikona.
- 1 to Waghoji Naik Sinde for the said fort.
- 1 Naro Bhagwant.

2

5

To the District Hereditary officers enjoining them to obey and pay the Government shares of the revenues, to the Kamavisdars on the part of the said Pandit.

1 The villages in Tarf Paun Mawal, which had been held by Appaji Baburao, have been resumed this year from him and transferred to the said Pandit.

The Zillhe (shares) of the revenues are assigned for the support of the Forts Tung and Tikona.

1 The Government shares of the villages of Pargana Shirwal which had been held by Ramji Yadav have been resumed from him and transferred to the said Pandit.

2

In all, seven sanads are granted. The orders, which are written in the handwriting of the Raja of Satara and received in the name of Havildar's respecting

[४४] किल्ले तिकोना येथील दारूगोळी, तोफा वगैरे जिन्नस किल्ले विसापुरास नेला आहे. त्यांत हरी बल्लाळ दिमत आपाजी बाबुराव यांची बटीक किल्ल्यावर होती तिजला नेली आहे ह्मणून विदित जाहलें. त्यास बटीक व तिचा पोर ऐसी दोघे हरी बल्लाळ यांचे स्वाधीन करणें. बाकी दागिने व जिन्नस राहिला त्यापैकीं शिशाच्या विटा मोजदादीशिवाय सांपडल्या आहेत त्या ठेऊन, बाकी जिन्नस तिकोन्यापैकीं राहील तो रा० चिमणाजी पंडित सचीव याजकडील माणसें येतील त्यांचे पदरीं घालणें. पावल्याची पोहोंच घेणें ह्मणून नारो भगवंत यास सनद १.

इ. स. १७५०–५१.
इहदे खमसेन
मया व अलफ.
सवाल १७.

[४५] सरकार हांडीया पैकीं परगणे हुसंगाबाद जागीर व बाबती व सरदेशमुखी देखील जकातीखेरीज मुकासा परगणा १, परगणे सिवणी निमे जागीर देखील जकाती खेरीज बाबती व सरदेशमुखी व मुकासा करून परगणा ॥. एकूण दीढ परगणा रोहिल्याकडे आहे तो तुह्मांस सरंजाम देऊन आज्ञा केली आहे कीं, तुह्मीं राजकारण अथवा कजीया करून रोहिल्याकडील अंमलास तंबी पोहोंचवून ठाणीं असतील तीं हस्तगत करून सरकारचा अंमल बसवणें. व ठाणीं हस्तगत होऊन

इ. स. १७५०–५१.
इहिदे खमसेन
मया व अलफ.
जिलकाद २९.

---

the two Forts and those in the name of the Hereditary District officers respecting the villages in Tarf Paun Mawal, have been made over to the said Pant Sachiv and their copies have been kept on the record.

A. D. 1750-51. (44) A Sanad to Naro Bhagwant to the following effect:—

It has been reported to Government that when removing ammunition, cannon, and other articles from Fort Tikona to Fort Visapur, a female servant of Hari Ballal, who is in the employ of Appaji Baburao, was also taken away from the Fort. It is therefore ordered that the servant and her son, should be made over to Hari Ballal. Excepting the plates of lead, found in excess of the recorded stock, all articles at the Tikona Fort should be handed over to Chimnaji Pandit Sachiv's men who would come there for the purpose. A receipt for the same should be taken.

(45) The following 1½ Parganas in Sarkar Handiya are in the possession of the Rohillas:—

A. D. 1750-51.

1 The Pargana of Husangabad Jagir Babti Sirdeshmukhi including Jakat and Mokasa.

½ The Pargana of Siwani half Jagir, including Jakat and excluding Babti Sirdeshmukhi and Mokasa.

This has been given over to you in Saranjam, you should on some political pretext invade the country of the Rohilas, conquer his posts and bring them under

सरकारचा अंमल बसे तोपर्यंत तुह्मी आपली शिबंदी ठेऊन कामकाज करणें. ठाणीं हस्तगत हो-ऊन सरकारचा अंमल बसलीयावरी ठाण्यास वगैरे शिबंदी लागेल ती लाऊन बाकी राहिल्या ऐवजावर राऊत चांगले असामी १०० शंभर बाळगून हुजूर चाकरी करीत जाणें. याप्रमाणें करार केला असे. राऊतास रोजमरा व ठाणीं वगैरे सोडवावयास शिबंदी पडेल ते तुह्मांस सरकारांतून देणार नाहीं. तुह्मीं कष्ट मेहनत हर तर्दुद करून अंमल बसवून आबादानी करणें ह्मणून रामचंद्र बल्लाळ यास सनद १. येविसीं जमीदारांस पत्रें १ परगणे हुसंगाबाद १ परगणे सिवणी.

इ. स. १७५०–५१.
इहदे खमसेन
मया व अलफ.
जिल्हेज ६.

[४६] बाळाजी नारायण उपनांव भुसकुटे गोत्र गार्ग्य सूत्र आश्वलायन याणीं कसबे पुणीयाचे मुकामीं येऊन विनंती केली कीं, तीर्थरूप पनाजी वामन भुसकुटे आपले चुलते याणीं पंतसचीव कैलासवासी यांचे वेळेस किल्ले सुरगड येथील राजकारण करून किल्ला हस्तगत केला. त्याजवरी शामलानें वेढा घालून बसला. चार महिने पनाजी वामन याणीं किल्ला भांडविला. परंतु सरकारची मदत पोंचली नाहीं. फिरोन सिद्दीनें किल्ला घेतला. पनाजी मजकूर यास कबिलेसुद्धां दस्त करून नेलें होतें. पनाजीस सहकुटुंब गोणत्यांत घाह्लन समुद्रांत बुडविलें. त्याचे संतानपैकीं एक आपण मात्र सुटोन आलों. ते समयीं पंताजीपंत याचे विद्यमानें विनंती केली. ते समयीं पंतसचीव याणीं पौन मावळ येथें आपणास वतनहक्क दरगांवास रुपया १ व गल्ला कैली ८१ एक मण व तूप मापी ८१ शेर याप्रमाणें करून दिल्हे. त्याचा भोगवटा कांहीं दिवस चालिला. प्रस्तुत आपण उदरपूर्तीमुळें सेवेचे उद्देशें देसीं गेलों, त्या तागाईत चालत नाहीं. ऐसीयास सांप्रत रा० चिमणाजी नारायण सचीव येथें आले आहेत; स्वामींनीं कृपाळु होऊन पूर्ववत् प्रमाणें मशारनिल्हेच्या सनदा करून देवाव्या; आणि सरकारचीं वतनपत्रें करून देऊन वतन चाले

---

the sway of Government. Till this can be done, you should maintain a Shibandi of your own. After the subjugation of the Country, you should maintain such force as may be necessary for the protection of the posts, you should also keep up a body of 100 efficient Rauts (horsemen) and serve the Huzur.

A Sanad to Ramchandra Ballal Bhuskute.

A. L. 1750-51.

(46) Balaji Narayen Bhuskute of the Gargya Gotra, Sutra Ashwalayan, having come to Poona, made the following request:—

My uncle Panaji Waman Bhuskute, managed to obtain the surrender of the Fort of Surgad, during the life of the late Sachiva. The Shamal (Siddi) laid seige to it. But he (Panaji) received no succour from Government. The Siddi retook the Fort, carried Panaji and his family prisoners and having put them in a sack threw them into the sea. Of his relations he (that is Balaji Narayen) alone, escaped and having made a request to the Pant Sachiva

तें करावें ह्मणून. त्यावरून पूर्वील मजकूर मनास आणिला; त्यास, रा० पंतीं सांगितलें व दाखला मनास आणितां तुमच्या वडीलांनीं श्रमसाहास केलें, आणि स्वामिकार्यामुळें खर्च जाहले; हें जाणून रा० चिमणाजी नारायण सचीव याणीं वतनपत्रें करून दिल्हीं आहेत. हालीं सरकारांतून वतनी हक्क करार करून तुह्मांस दिल्हा असे, तरी तर्फ पौनमावळ येथील गांवगन्ना दरगांवास नक्त रुपये १ व गल्ला कैली ८१ मण व तूप मापी ८८१ शेर येणें प्रमाणें तुह्मीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें वतन अनुभवून सुखरूप राहणें ह्मणून वतनपत्र १.

येविसीं पत्रें १ मुकदम तर्फ मजकूर यास सनद १, देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी तर्फ मजकूर यांस पत्र १, देशमुख व देशपांडे तर्फ मजकूर यांस पत्र.

[४७] खोंडराणी व भगडराव संस्थान माखले सरकार गावेल सुभे वराड याणीं आपले तर्फेनें कुळगुरु वेदशास्त्रसंपन्न राजश्री वेंकटभट यास हुजूर पाठविलें. त्याणें तुमचें वर्तमान विदित केलें कीं, संस्थान मजकुरचा राजा सेरबाहादर मृत्यु पावला. त्याचा लेक उदेकरण लहान होता. त्यासमयीं मुगुटराव कमजात याणें त्यास मारून तुह्मांस राज्यभ्रष्ट करून आपण राज्य करतो; तरी स्वामींनीं कृपाळु होऊन त्याचें पारिपत्य करून आह्मांस राज्यावर बसवावें ह्मणजे आह्मी

इ. स. १७५०–५१.
इहिदे खमसेन मया व अलफ.
मोहरम १३.

---

through Pantaji Pant, was granted a Watan Hakka, authorising him to levy from each village in Pawan Mawal Re. 1 in cash, and grain one Maund Kaili, and Ghee 1 sheer. The Hakka was for some time enjoyed; but it has been discontinued, since he went abroad in search of employment. Sachiva Chimnaji Narayan is now here and the Peshawa may graciously be pleased to have Sanads issued by the Sachiva as before; and to order the issue of the Watan Patras by Government and thus to continue the Watan. On this request the previous circumstances were taken into consideration, as also the communications made by the Pant and the old records were consulted. Your ancestor did acts of great daring and enterprize and lost his life in the service of the State. Sachiva therefore granted Watan Patras and the Hak is now conferred upon you by Government.

(47) A Sanad to Khond Rani and Bhagad Rao of Sansthan Makhle, Sirkar Gowel in Subha Berar. Your family priest Venkatbhat, whom you sent to the Huzur on your behalf, stated that Sir Bahadur Raja of the Sansthan having died, Mukutrao of low birth, killed the Raja's young son Udekaran, drove you out of the kingdom, and was now ruling the country. The priest therefore prayed that if the Peshwa were pleased to punish the said Mukutrao and restore the kingdom to you, you would surrender half of your Sansthan. Taking into consideration the fact that you are the lawful descendents of the late ruler, while Mukutrao is illegitimate, and that notwithstanding he has driven you out of the kingdom and is ruling himself, the Peshwa has been pleased

A. D. 1750-51.

आपले संस्थान मजकुरचें निमें राज्य देऊं. त्यावरून मनास आणतां तुह्मी असल असोन तुह्मांस राज्यभ्रष्ट करून कमजात मुगुटराव राज्य करितो हें जाणोन, तुह्मांवर कृपाळु होऊन, रा० रामचंद्र बल्लाळ यास तुमचें निमें राज्य देऊन तुह्मांस राज्यावर बसवावयाची आज्ञा केली असे. तरी हे मुगुटराव कमजात याचें पारिपत्य करून तुह्मांस राज्यीं बसवितील. तुह्मीं राज्यीं बसलीयावर निमें राज्य तुह्मीं खाणें, निमें राज्य मशारनिल्हे खातील. हक्क पैसा उभयतां मिळोन देत जाणें. व संस्थान मजकूर येथील सरमंडलोईपण व सरकानगोपणाचें नवीन वतन रामचंद्र बल्लाळ यास करून दिल्हें असे. वतनसंबंधें हक्क ऐनजमा कुलबाब खेरीज सरदेशमुखी व हक्कदार करून दोनही वतनें मिळोन दरसदे रयत निसबतीनें रुपये ४ चार प्रमाणें व कानुकायदे व मानपान विडा सिरपाव व मोहतर्फा खुमजाद तफरीक व तहबाजारी व सायेर रहदारी व भेट व फुरोई वगैरे कानु कायदे, सरकार हांडिया सुभे खानदेश येथील सरमंडलोईपण व सरकानगोपणाचें वतन मशारनिल्हेचें आहे त्याप्रमाणें संस्थान मजकुरचें वतन करून दिल्हें असे. तरी तुह्मीं यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें वतन चालविणें ह्मणोन सनद १.

[४८] मौजे बावर्डे तर्फ बेल्हे प्रांत जुन्नर येथील मोंगलाईचा अंमल जप्त करून रा० भुलोजी ढमढेरे याजकडे अंमल देविला असे, तर मशारनिल्हेसी रुजू होऊन मोंगलाईचा अंमल सुरळीत देणें; ह्मणोन मोकदमास सनद.

इ. स. १७५०–५१.
इहदे खमसेन मया व अलफ.
सफर ७.

जप्तीचा ऐवज सरकारांत पावता करावा ह्मणोन लिहिलें असे.

याशिवाय मोंगलाचे परगणे जप्त केले तपसीलः—

१ परगणे कर्डे रांजणगांव १ परगणे गांडापूर १ परगणे अंतूर १ परगणे खंडाळें १ परगणे येतन १ कसबा टाकळे १ तर्फ मानूर २ सरकार नंदुरबार (१ परगणे नंदुरबार १ परगणे सुलतानपूर) १ परगणे वैजापूर १ परगणे नेवासें १ परगणे सुलतानपूर १ परगणे कुदाबाद १ परगणे वाळुंज १ परगणे खानापूर १ परगणे जांबखेड १४ सरकार बागलाण पैकीं १ परगणे तिळवण १ परगणे कारोळी हमयेबोज १ तर्फ लोनासी १ परगणे पीपले १ परगणे हातगड १ परगणे सांडस १ परगणे पिसाळे १ कसबे चौपाळे १ परगणे ऊनबई १ परगणे जैतापूर १ परगणे वारसे १ परगणे पिंपळनेर १ कसबे पानीवडे १ परगणे उमरपाटे—

to direct Ramchandra Ballal (Bhuskute) to restore the kingdom to you on condition of your surrendering half of it to him. Ramchandra Ballal would punish the illegitimate Mukutrao and place you on the throne. You should then enjoy half the kingdom, the other half being enjoyed by the above named person.

(48) The Monglai Amal (belonging to the Nizam) of certain Parganas was attached by the Peshwa, and persons were sent to manage it.

A. D. 1750-51.

७ सरकार आशेरपैकीं—१ परगणे थाळनेर १ परगणे ललीग ऊर्फ धुळें १ परगणे डागरी १ परगणे अमलनेर १ परगणे सेंदुरणी १ परगणे सोनगीर १ परगणे आंबे—६ सरकार आशेरपैकीं—परगणे जामनेर १ परगणे वरणगांव १ परगणे बोदवड १ परगणे नसीराबाद १ परगणे सावदें १ परगणे चोपडें—१ परगणे नेर सरकार नंदुरबार २ परगणे उत्राणपैकीं गांव—१ मौजे भातखेड १ मौजे पारोळें—१ परगणे पैठण १ परगणे आंबड १ परगणे राजणी १ परगणे देऊळघाट १ परगणे सिंदखेड १ परगणे जाफराबाद १ परगणे चिखली १ परगणे बाऊरवाडी १ परगणे परतुर १ परगणे आंधेगाव १ परगणे जालनापूर १ परगणे एकमुणी १ परगणे खेडीले १ परगणे सावळी १ परगणे धावड १ परगणे चांडोल १ परगणे सेवगांव १ परगणे सेंदुरवांदे १ परगणे संगमनेर खेरीज तर्फ देपूर व तर्फ बेलापूर दोनी तर्फा खेरीज तर्फ राहुरी करून १ परगणे चांदवड १ परगणे नासिक खेरीज साकुर १ परगणे धाड १ परगणे आंबडापूर १ परगणे भोकर्दन १ परगणे दाभाडी १ परगणे दिंडोरी १ परगणे वण १ परगणे कुंभारी १ परगणे सिन्नर १ परगणे आकोले १ परगणे कोतुल १ परगणे धांदर-फळ १ परगणे त्रिंबक १ कसबे वावी संस्थान संगमनेर १ परगणे जैनाबाद १ परगणे रावेर-पाल तर्फ खेरीज करून बाकी १ परगणे जामोद. ६ सरकार गाळणाः—१ परगणे गाळणा १ परगणे लोहोनेर १ परगणे वखारी १ परगणे ठोकुरपाळे १ परगणे चिखलवाहाळ १ परगणे वाकडे—कसबे पुणतांबे संस्थान संगमनेर १ कसबे राहातें संस्थान संगमनेर १ परगणे एदलाबाद १ परगणे नागांव १ परगणे पाचोरे ४ सरकार दोलताबाद—१ परगणे चाळीसगांव १ परगणे माणीकपूल १ परगणे मेहुणबारे १ परगणे झोडगें—९ सरकार आशेर १ परगणे बाबळ १ परगणे नाडगांव १ परगणे उत्राण १ परगणे ह्मसवे १ परगणे येरंडोल १ परगणे जलोद सरकार आशेर १ परगणे झामरे संस्थान नंदुरबार १ मौजे लोबारी प्रांत बोरनेर १ परगणे रायपूर प्रांत बागलाण १ परगणे निंबाईत एकून १०८.

इ. स. १७५०–५१.
इहदे समसेन
मया व अलफ.
सफर.

[४९] या महिन्यांत मोंगलाईकडील मुलूख बराच जप्त राव यांनीं केला आहे.

या महिन्यांत हिंदु अगर मुसलमान यांना जीं इनामें व देवस्थानें मोंगलांनीं दिलीं होतीं तीं ज्याचीं त्याजकडे पेशव्यांनीं कायम ठेवल्याबद्दल उदाहरणें. × × × × × × × × × × × ×

---

(49) Different parts of the Mogal territory were attached in this month by the Peshwa. The Inams and Dewasthans granted to Hindus and Mahomedans in this tract by the Mogals were ordered to be continued as before.

A. D. 1750-51.

इ. स. १७५०–५१.
इहदे खमसेन
मया व अलफ.
रबिलावल ५.

[५०] रामाजी मल्हार यास कीं, मोंगलाई अंमल सोडणें व मोंगलाई ठाणीं मोंगलांकडे देणें ह्मणोन.

१ कसबे पुणतांबे १ कसबे राहाते १ कसबे वावी ७ तर्फ कोल्हारगांव एकूण ठाणीं दहा येविसीं.

इ. स. १७५०–५१.
इहदे खमसेन
मया व अलफ.
रबिलावल ६.

[५१] मोंगलाई सरदाराकडे वगैरे याजकडे जागीर होती त्याची जप्ती सरकारांतून केली होती, ते हालीं जप्ती उठविली; त्याविसीं अमलदारांस ताकीदपत्रें दिल्हीं.

१ माणको बल्लाळ यास कीं, मौजे अणगेर तर्फ रांजणगांव व्यंकटराव हरकारे याजकडे आहे त्याविसीं.

१ नारो बाबाजी कमावीसदार पारनेर यास कीं खोजे हमिदखान याजकडे गांव परगणे मजकुरचे.—१ करडी १ निंबळक १ डोंगरगण याविसीं.

१ राघो गोविंद यास कीं, तुरुकतानखान याचे जागीरचे गांव परगणे नेवासें १ रूपपूर १ कुडगांव १ आकली १ गुणग १ बखतापूर १ बाभुळखेड १ हिंगोणी १ कांगोणी १ बडाळे १ वरखडे १ खरवडी—यांविसीं पत्र.

१ गोपाळ त्रिंबक यास कीं जागीर तुरुकतानखान याची गांवगन्ना परगणे चांभारगोंदे—१ कसबे मजकूर १ मकरंदपूर १ देऊळगांव १ बाळवंडी १ पारगांव १ मडवडगांव १ वेळू १ गणेगांव १ जलालपूर १ कसबे खडे १ भांबोरे १ कात्रज १ उंबरली १ सिंदे १ हलीकुवडगाव १ जरीगांव—यांविसीं.

---

(50) A letter to Ramaji Malhar to relinquish the Moglai Amals, and to restore the stations of the Mogals to them.

A. D. 1750-51.

1 Kasba Puntambe.
1 Kasba Rahate.
1 Kasba Wawi.
7 Villages in Tarf Kolhar.

10

(51) The Jahagirs of certain Sirdars of the Nizam which were attached were released from attachment. Letters to that effect were addressed to the officers of Government.

A. D. 1750-51.

१ भगवंतराव राम यास कीं तुरुकतानखान याजकडील जागीरीचें गांवाविसीं.

२० परगणे पोडदेडीवगांव—१ सावेडी १ गुपीत वडगांव १ नालेगांव १ चाहुराने खुर्द १ पिंपळगांव गर्भा १ महलोरी १ शेतु १ मरसुदानगर १ शाहापूर १ टाकळी १ नागापूर १ चास १ फर्याबाद १ चाहुराने बुद्रुक १ न्यामतवाडी १ कापूरवाडी १ बलायवाडी-वरुळा १ निंब्रोडी १ बेल्हेगांव १ कोल्हेवाडी १२ परगणे कडेवळीत—१ पेडगांव १ टाकळी १ तानु १ बोरडी १ आरवी १ कवठे १ शेडगांव १ हलडगांव १ बोलवाडी १ सिद्धटेक १ अनज्ञुन १ बाबुर्डी.

१८ परगणे चांभारगोंदे—गोपाळ त्रिंबक याच्या पत्राप्रमाणें, याविसीं पत्र.

१ नरहर लक्ष्मणराव यांस पत्र १ रामाजी मल्हार यास १ भगवंतराव राम यास १ बाबुराव हरी यास १ जीवाजी महादेव यास १ राघो गोविंद यास १.

१ कित्ता रामाजी मल्हार यास—१ परगणे आकोले १ परगणे नासिक १ परगणे कोतुळ १ धांदरफळ १ परगणे वण १ परगणे चांदवड १ परगणे दिंडोरी १ परगणे सिन्नर १ परगणे कुंभारी—पत्र १. शिवराम नरसी याजकडे मौजे इनामगांव तर्फ रांजणगांव मोंगलाईतून आहे त्यास तेथील जप्ती तुह्मी केली आहे ती उठविणें. आजपावेतों वसूल जाला तो जाला, याउपरी जप्ती उठवणें, वसुलाचा तगादा न लावणें. ह्मणोन ताकीदपत्र माणको बल्लाळ यास १.

१ राघो गोविंद यास परगणे गांडापुराविसी.

४ कित्ता राघो गोविंद यास पत्रें.

१ मौजे दहीगांव परगणे वैजापूर जागीर शेख मीरखान १ मौजे हणवतगांव परगणे वैजापूर जागीर मीरमुर्तुजास.

१ मौजे भालगांव व मौजे सेसगांव परगणे नेवास जागीर मीर असदुल्लाखान.

१ परगणे वाळुंज जागीर सरकार आली कडील.

१ माधवराव कदम यास पत्र कीं मौजे आवलाटी व उरळगांव परगणे कर्डे जागीर सैद हमीदखान.

१ जीवाजी पवार यास कीं मौजे हिंगणी परगणे कर्डे जागीर सैद हमीदखान.

१ घनसेट कर्जे यास कीं गांव परगणे कर्डे जागीर शेख हमीद खान—मौजे कोरेगांव १ मौजे भराडी १ मौजे भागडी.

१ गोपाळ त्रिंबक दिंमत जयाजी सिंदे यास मौजे बाळवंडी परगणे कर्डे जागीर सैद हमीदखान.

१ बाबुराव हरी यास कीं ठाणेदार मोंगलाकडील याचीं ठाणीं याचे हवाला करणें ह्मणोन. संगमनेर, वावी, पुणतांबे येथील गढीया विट्ठल सुंदर याचे हवाला करणें ह्मणोन.

२ हरी दामोदर यास पत्रें— १ कित्ता पत्र, २ गांव तर्फ बाल्हे जागीर सेख हुसेन (१ पळसपूर १ कवठे) २ गांव तर्फ भोयर जागीर जैसिंग (१ सावरगांव १ सवगडदुर्या).

१ कित्ता पत्र गांव परगणे कर्डे येथील जागीर सैद मीरखान (१ मौजे घारगांव १ मौजे खामोडी).

१ माणको बल्लाळ यास कीं मौजे आलेगांव वगैरे हिस्से परगणे मजकूर जागीर मिरजा खान २ त्रिंबक विनायक यास—१ किल्ले कर्नाळा व किल्ले गारबा येथील जागीरीचे गांवाविसी.
१ कित्ता पत्र किल्ले कर्नाळा येथील जागीरीचे गांवाविसीं.
१ हरी दामोदर यास पत्र कीं मौजे सिंदोडी तर्फ वावरद जांबली परगणे जुन्नर जागीर हस्त जालीखान.
१ रामाजी मल्हार यास कीं मौजे तळवड व वराडी व पाटोदें जागीर हस्तजालीखान.

इ. स. १७५०–५१.
इहदे खमसेन
मया व अलफ.
जमादिलावल ११.

[५२] सलाबतजंग याचा आमचा सलुखा जाहला; बऱ्हाणपुरच्या सुभ्याकडून तीन लाख रुपये सरकारांत देविले आहेत; त्याची निशा करून घेऊन त्या प्रांतींची मोंगलाई अंमलाची जप्ती उठवणें. ठाणीं घेतलीं असतील तीं मोंगलाचीं मोंगलाकडे देणें ह्मणोन अमलदारांस ताकीदपत्रें १ महीपतराव कवडे यास १ मानाजी निकम यास.

गोपाळ केशव यास ताकीदपत्र कीं संस्थान नांदेड व माहूर येथील मोंगलाई जप्ती उठविणें ह्मणोन पत्र १.

इ. स. १७५०–५१.
इहदे खमसेन
मया व अलफ.
सावान ९.

[५३] दुर्जनसिंग राजे संस्थान मांडवी याचे नांवें सनद कीं, संस्थान मजकूर पहिल्यापासून तुमची जागा, तुह्मी सर्व प्रकारें आमचे ठायीं एकनिष्ठ, यास्तव गायकवाडांनीं तुमचा अकस केला; यास्तव बहुत दिवस तुह्मी हुजूर सेवेंत राहिलां. हालीं श्रीकृपेनें गुजराथ सरकारांत जाली. तुह्मी सर्व प्रकारें एकनिष्ठ जाणून संस्थान मजकुरचे राज्यावर पूर्वस्थळीं तुमची स्थापना केली असे. तरी सर्व प्रकारें एकनिष्ठेनें सेवा करून राज्य अनुभवून सुखरूप राहणें, एकनिष्ठेनें सेवा करावी. तेणेंकरून सर्व उत्तम आहे. ह्मणून मशारनिल्हे याचे नांवें रसानगी यादी सनद १.

---

(52) An agreement has been concluded between the Government and Salabat Jang, and it is settled that the Subha of Berhanpur should pay to the Government three lacs of Rupees. You should take security for the amount, and release from attachment the Moglai Amals in that province. The posts that may have been taken from the Mogals should be restored to them. Letters to the above effect to the following officers.

1 Mahipatrao Kaude.

1 Manaji Nikam.

2

इ. स. १७५०–५१. इहदे खमसेन मया व अलफ. सफर २३.

[५४] सदाशिव खंडेराव याचे नांवें सनद कीं, इब्रामखान पठाण याणीं सरकारांत विदित केलें कीं, रासीन किल्ला सरकारांत घेऊन देतों ह्मणोन. त्यावरून पठाण मजकूर याजबरोबर तुह्मांस रवाना करून येणेंप्रमाणें तुह्मांस आज्ञा:— रासीन किल्यावर लोक आहेत, त्याची तलब कांहीं राहिली असेल त्यास किल्ला सरकारांत सर जाल्यावर किल्याच्या लोकांची तलब व मातबर लोक असतील त्यांस बहुमान द्यावयाविसीं तुह्मांस आज्ञा केली आहे. तर कसोसीकरितां निदान पांच सात हजार रुपये पावेतों देविले असेत. किल्ला फत्ते होऊन सरकारांत आल्यावर सदरहु रुपये पावेतों करणें आणि कबजा घेणें, तेणेंप्रमाणें तुह्मांस मजुरा पडतील. कलम १.

इ. स. १७५१–५२. इसन्ने खमसेन मया व अलफ. जमादिलावल २२.

[५५] खंडोबा गोसावी देहुकर याजकडे मौजे येलवाडी तर्फ चाकण हा गांव दरोबस्त मुकासा आहे. त्यास तेथील सरपाटीलकी व सरदेशमुखी रा॰ यशवंतराव दाभाडे सेनापति याजकडे आहे. त्याणीं आपले तर्फेनें गोसावी याजकडे दिल्हा आहे. त्यास हालीं सरकारांत दाभाडे याजकडील सरंजामाची जप्ती जाली त्याबद्दल तुह्मी या गांवचे सरपाटीलकीचा व सरदेशमुखीचा अंमल बंद केला आहे ह्मणोन कळलें. ऐसीयास गोसावी याजकडे पेशजीपासून सरपाटीलकी व सरदेशमुखी चालत आल्याप्रमाणें पुढें चालवणें; तुह्मीं खलेल न करणें ह्मणून हरी दामोदर यास सनद १.

A. D. 1751-52.

(53) A Sanad to Durjansing Raja of Sansthan Mandvi to the following effect:—The Sansthan of Mandvi was originally yours. You were in every way loyal to our cause. This made the Gaikwar your enemy, and you therefore took service under the Huzur and continued in that capacity for a long time. The province of Guzrath has, however, now by the grace of God, been vested in the Government and with due regard to your loyalty, Government is pleased to re-instate you in your former kingdom.

A. D. 1751-52.

(54) A Sanad to Sadashiv Khanderao. Ibram Khan Pathan has promised to get the Fort of Rasin for Government. You are directed to accompany the Pathan. In case the fort is taken, you should manage the Jahagir attached to it, pay the arrears that may be due to the employees, and treat, with due respect, all persons of influence in the fort.

A. D. 1751-52.

(55) Refers to the attachment of the Saranjam of Yeshwantrao Dabhare Senapati.

[५६] बहीरजी थोरात व शिवाजी थोरात याची फौज राजश्री जयसिंग गायकवाड या समागमें देऊन तुह्मांकडे पाठविले आहेत. तरी जयसिंग गायकवाड यास तुह्मांजवळ पोहोंचवून देतील. ते समयीं तुह्मीं आपले हवाला करून घेऊन यास पोंहच लेहून देणें; आणि यास हुजूर पाठवून देणें. सदरहु पथकास रोजमरा पंधरवडा हुजूर दिल्हा आहे. पुढें दिवसगत लागली तरी रोजमरा आठवडा येणेंप्रमाणें:—रुपये.

इ. स. १७५१–५२. इसने खमसेन मया व अलफ. साबान २१.

५०५ कृष्णाजी थोरात स्वार २००.

२६५ बहिरजी थोरात स्वार १००.

———

७७० एकूण सातसें सत्तर रुपये तीनसें राऊतांस छ० ८ रमजानीं देणें. त्यापुढें दिवसगत लागलीयास शिरस्तेप्रमाणें रोजमरा देणें; ह्मणून विठ्ठल शिवदेव यास सनद सादर.

[५७] रामचंद्र बल्लाळ उपनाम भुसकुटे गोत्र गार्ग्य सूत्र आश्वलायन यासी. शके १६७३ प्रजापति नाम संवत्सरे. सरकार हांडीया प्रांत नेमाड सुभे खानदेश हा जागा बहुत दिवस जाहले, भिलाच्या उपसर्गामुळें उजाड पडिला; झाडी वसली; बहुत खराबा झाला. याजकरितां तुह्मांस पेशजी आबादानीविसीं आज्ञा केली होती, त्याजवरून तुह्मीं श्रम साहास करून सरकार मजकूरची आबादानी केली; आणि पुणीयाचे मुक्कामीं हुजूर येऊन विनंती केली कीं, आह्मी स्वामींचे

इ. स. १७५१–५२. इसने खमसेन मया व अलफ. जिलकाद १.

---

(56) A Sanad to Vithal Shivdeo to the following effect:—Jaysing Gaikwad is sent to you with the army of Bahirji Thorat and Shiwaji Thorat. The army will hand over to you Jaysing Gaikwad, whom you should take into your custody. A written acknowledgement about him should be given.

A. D. 1751-52.

(57) A Sanad issued to Ramchandra Ballal Bhuskute of Gargya Gotra Sutra Ashwalayan in the year Sake 1673 the name of the year being Prajapati (A. D. 1751). The Sarkar Handia in Prant Nemar of the Khandesh District was, owing to the inroads of the Bheels, lying waste and desolate and was overgrown with forest. You were, therefore, formerly ordered to take steps for populating the tract in question. This, by dint of personal exertion and enterprize, you have been able to effect. You have now come to Poona and request that in consideration of your long services and your large family, a new Watan may be given to you. Considering that you are an old servant of Government, capable of performing any duty entrusted to you, and that you have hitherto served faithfully and are ready to do so in future, Government

A. D. 1751-52.

पुरातन सेवक, कुटुंबवत्सल, कुटुंबाचा योगक्षेम चालावा लागतो; याजकरितां नूतन वतन करून दिल्हें पाहिजे. त्यावरून मनास आणितां तुह्मीं पुरातन सेवक, कामाकाजाचे माणूस, एकनिष्ठपणें सेवा केली व पुढें ही करावयासी उमेद्वार. ऐसें जाणून तुह्मांवरी कृपाळू होऊन सरकार मजकूर रेवा दक्षिणतीर येथील सरमंडलोईपणाचें व सरकानगोपणाचें नूतन वतन तुह्मांस करार करून दिल्हें असे.

[९८] रामचंद्र बल्लाळ उपनाम भुसकुटे गोत्र गार्ग्य सूत्र आश्वलायन यास शके १६७३ प्रजापति नाम संवत्सरे सरकार बिजागड प्रांत नेमाड सुभे खानदेश हा जागा बहुत दिवस जाले भिलांच्या उपसर्गामुळें उजाड पडिला, झाडी वसली, बहुत खराब जाहला. याजकरितां पेशजी तुह्मांस आबादानीविसीं आज्ञा केली होती; त्यावरून तुह्मीं श्रम साहास करून सरकार मजकूरची आबादानी केली. आणि पुणीयाचे मुक्कामीं हुजूर येऊन विनंती केली कीं, आह्मी स्वामींचे पुरातन सेवक, कुटुंबवत्सल, कुटुंबाचा योग क्षेम चालावा लागतो, याजकरितां नूतन वतन करून दिल्हें पाहिजे ह्मणून. त्याजवरून मनास आणितां तुह्मी पुरातन सेवक, काम काजाचे माणूस, एकनिष्ठपणें सेवा केली व पुढेंही करावयासी उमेदवार, ऐसें जाणून तुह्मांवर कृपाळू होऊन सरकार मजकूरचें सरमंडलोईपणाचें नूतन वतन करार करून दिल्हें असे.

इ. स. १७५१–५२.
इसने खमसेन
मया व अलफ.
जिलकाद १.

[९९] नारायणराव व्यंकटेश यास सनद कीं, ठाणें नसेरीचें सरकारांत घेतलें आहे तें हालीं राजश्री स्वामी करवीरवासी महाराज यांजकडे देविलें आहे. तरी त्याजकडील भला माणूस येईल त्याचे हवाला ठाणें करणें. सरकारांत घेतल्यापासून खर्चवेंच जाहला असेल तो उमगून वेऊन ठाणें हवाला करणें; ह्मणोन सनद. रसानगी यादी १.

इ. स. १७५२–५३.
सलास खमसेन
मया व अलफ.
रजब २९.

---

is pleased to bestow on you a new Watan of SarMandaloi and SarKango of the above tract to the south of the Rewa.

(58) A similar Watan was also granted in regard to the Sarkar Bijagad in Prant Nemar which is also described as lying waste through the ravages of the Bheels.

A. D. 1751-52.

(59) A Sanad to Narayanrao Venktesh. The Thana (post) of Naseri which had been taken by Government, is ordered to be handed over to the Maharaj of Karwir. You should make it over to any trusted person deputed by him for the purpose.

A. D. 1752-53.

[६०] नारो बल्लाळ यास सनद कीं, परगणे नंदुरबार प्रांत खानदेश येथील मोंगलाईचा अंमल साल मजकुरीं सरकारांत आला. त्यास परगणे मजकुरची कमावीस देखील जकाती तुह्मांस सांगितली असे; तरी परगणे मजकुरचा अंमल इमानें इतबारें करणें. परगणे मजकुरचे ऐवजीं तुह्मांपासून रसद रुपये ६०००० साठ हजार करार केले असेत. यासीं व्याज दरमहा दरसदे रुपये १ एकोत्रा प्रमाणें शिरस्तेप्रमाणें करार केलें असे. व्याजसुद्धां माहालचे ऐवजीं उगवून घेणें. सदरहु रसद सरकारांत जमा होईल त्याप्रमाणें व्याजास मित्या लागतील. रसदेच्या ऐवजास मुशाहिरा दरसदे रुपये ३ तीन प्रमाणें करार केला असे. महालचे ऐवजीं उगवून घेणें. रसदेचा ऐवज माहालीं उगविला नाहीं तरी सरकारांतून व्याजसुद्धां दिला जाईल ह्मणून सनद १.

इ. स. १७५२–५३.
सलास खमसेन
मया व अलफ.
जिलकाद १०.

[६१] दाभाडे याजकडील सरंजाम जप्त केला होता तो हालीं मोकळा करून ताकीदपत्रें दिल्हीं.

इ. स. १७५२–५३.
सलास खमसेन
मया व अलफ.
जिलकाद २५.

[६२] भगवंतराव राम यास पत्र कीं, मौजे भिंगार व मौजे शेडी व मौजे चास तर्फ नगर हवेली हे तीन गांव गाजुद्दीन खान याणीं सरकारांत दिल्हे आहेत; परंतु कवीजंग याची जागीर आहे यास्तव रद्‌बदलीमुळें मोंगलाई अंमल सोडला असे, तुह्मीं मुजाहिम न होणें ह्मणून सनद १.

इ. स. १७५२–५३.
सलास खमसेन
मया व अलफ.
रबिलावल ७.

[६३] श्रीपतराव बापुजी यास सनद कीं, शामजी हरी यासी राघो शंकर कोतवाल शहर अमदाबाद येथें कोतवालीचे लिहिण्याचे कामकाजास पाठविले आहेत. तरी मशारनिल्हेचे हातें कोतवालीकडे लिहिण्याचें कामकाज घेऊन वेतन पेस्तर साल आर्बांपासून रुपये ३०० तीनशें करार केले असेत; पावीत जाणें ह्मणोन सनद १.

इ. स. १७५२-५३.
सलास खमसेन
मया व अलफ.
जमादिलाखर ६.

---

(60) The Moglai Amal of Pargana Nandurbar and other Mahals in Khandesha came into the possession of the Peshwa in this year.

A. D. 1752-53.

(61) The Saranjam of Trimbakrao Dabhade, which was under attachment, was released.

A. D. 1752-53.

(62) A letter to Bhagwantrao Ram. Gajudin Khan has given over Mauze Bhingar, Shedi, and Chas in Taraf Nagar Haveli to Government. Their Moglai Amal being held in Jahagir by Kawijung was however continued to him.

A. D. 1752-53.

श्रीपतराव बापुजी यास सनद कीं राघो शंकर यास शहर अमदाबाद येथील कोतवाली सांगितली असे. तरी मशारनिल्हेचे हातें कोतवालीचें कामकाज घेऊन वेतन पेस्तर साल आर्बापासून रुपये,

६०० खुद्द मशारनिल्हे.

२०० शागीर्द पेशा देखील आफ्तागीरा माणसें ६.

---

७०० एकूण सातशें रुपये करार केले असेत. पेस्तर सालापासून पावीत जाणें ह्मणून सनद १.

श्रीपतराव बापुजी यास सनद कीं, जीवाजी बाबुराव, बाबुराव माणकेश्वर यांचे पुत्र, निसबत विठ्ठल शिवदेव, यांस अमदाबाद शहर देखील भद्रा येथील कारखान्याचे कामकाज सांगोन पाठविले आहेत. तरी यांचे हातें कारखान्याच्या बाबती असतील त्यांचें कामकाज घेऊन वेतन पेस्तरसाल आर्बापासून रुपये १५० दीडशें करार केले असेत; पेस्तरसालापासून पावीत जाणें ह्मणोन सनद १.

श्रीपतराव बापुजी यास सनद कीं, परगणे अमदाबाद दसकुरई व शहर अमदाबाद येथील मजमु कृष्णाजी गोविंद यास सांगून पाठविले आहेत. तर यांचे हातें शहरचे मजमूचें प्रयोजन घेत जाणें. दसकुरईचे मजमूचें प्रयोजन जो कमावीसदार होईल तो घेत जाईल. यास वेतन सालिना पेस्तर सालापासून देखील आफ्तागीरा रुपये ३५० साडे तीनशें करार केले असेत; पावीत जाणें ह्मणोन सनद १.

रसानगी चिठी.

रघुनाथ हरी टकले यास सनद कीं, शहर कसबे अमदाबाद येथील अंमल सायर कलमें:—

१ गल्ला तहसील १ मंड्यातकुल १ शहरगंज १ गंज बहिरामपुरा १ घीकांटा १ सबज मंडई १ रुई मंडई १ गुड मंडई १ सारखेज मंडई १ नखारा मंडई १ नाकेसायर बाब राबदा वगैरे दरोबस्त सायेर.—येणेंप्रमाणें सायर बाब अकरा ताल्लुके यांची कमावीस तुह्मांस सांगितली असे. तरी इमानें इतबारें वर्तोन अंमल चौकसीनें करणें. आणि ऐवज जमा करून सरकारांत पावता करून पावल्याचे जाब घेणें; तेणेंप्रमाणें मजुरा पडतील. ह्मणोन सनद १.

रसानगी यादी.

वनशेट कर्जे यास सनद कीं, शहर अमदाबाद येथील कोठीपारसा व मण्याराकोठी व मोतस बाबाहाछापा याची कमावीस तुह्मांस सांगितली असे. तरी इमानें इतबारें वर्तोन अंमल चौकसीनें करणें. ऐवज जमा करून सरकारांत पावता करणें आणि पावल्याचे जाब घेणें. तेणेंप्रमाणें मजुरा

---

(63) The province of Ahmedabad having at this time come under the sway of the Peshwa, orders regarding the appointment of officers, the farms of revenue, and the confirmation of Warshasan and Inams were issued.

A. D. 1752-53.

पडतील. सदरहु कलमाचा कानु जाबता आलाहिदा करार करून दिल्हा असे; तेणेंप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणून सनद १.

रसानगी चिठी.

निजामुदीन खान काजी शहर अमदाबाद याणीं हुजूर येऊन जाहीर केलें कीं, प्रांत गुजराथ येथें जागीरीचा ऐवज आपणास पादशाहींतून दाम १९९४१३७ एकोणीस लक्ष चवऱ्याणव हजार एकशें सततीस दाम इनाम करून दिल्हे. त्याचे पातशाही फर्मान आहेत. परंतु सुभा अमदाबाद याणीं सदरहु ऐवजीं मुकरार रुपये २००० दोन हजार करार करून पोतांतून पावत आले आहेत. त्यास हालीं अंमल सरकारांत जाहला, याकरतां सुदामत चालत आल्याप्रमाणें करार करून देविले पाहिजे ह्मणून. त्यांस प्रांत मजकुरचा निमे अंमल रा. दमाजी गायकवाड समशेर बाहादर याजकडे बाकी निमे सरकारांत आहे. त्यास सुदामत दोन हजार पैकीं निमे रुपये १००० एक हजार सरकारतर्फेनें करार करून हें पत्र तुह्मांस लिहिलें असे; तरी सुदामत सुभ्याचे पोतांतून हजार पावत आले असले, तरी, चौकसी करून मनास आणून सुदामत पैकीं निमे सदरहुप्रमाणें एक हजार रुपये देत जाणें. ह्मणून पत्र श्रीपतराव बापुजी यास सनद १.

रसानगी चिठी.

कमावीसदार व लेखक वर्तमान भावी परगणे हवेली अमदाबाद यास सनद कीं, निजामुदीनखान काजी शहर कसबे मजकूर, याणीं हुजूर येऊन जाहीर केलें कीं, परगणे मजकुरीं पेशजीपासून मोंगलाईंत व गायकवाड यांच्या अमलांत वजीफा इनाम जमीन ७५ बिघे गांवगंना गांव १ मौजे व्याच १ मौजे नांदेज येणेंप्रमाणें पाऊणशें बिघे जमीन व गांव दोन चालत आले आहेत व बादशाही फरमान व सुभ्याचीं पत्रें व गायकवाडाचीं पत्रें आहेत हीं मनास आणून हालीं अंमल सरकारांत जाहला, याजकरितां सुदामत चाललीयाप्रमाणें करार करून दिल्हे पाहिजे ह्मणून; व सदरहु प्रमाणें पत्रें आणून दाखविलीं. त्यास परगणे मजकुरचा निमे अंमल सरकारांत आहे त्यास सुदामत पैकीं सरकार तर्फेनें करार गांवगंना जमीन बिघे ७५ पैकीं निमे बिघे सुमार ३७॥ गांव सरकारचे वांट्यांत दोनी आहेत १ मौजे व्याच १ मौजे नांदेज. (एकूण) साडे सततीस बिघे जमीन व दोन गांव करार करून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी पेशजीपासून चालत आले असेल त्याची चौकशी करून, मनास आणून, काजी मशारनिल्हे याजकडे सुदामतपैकीं सदरहुप्रमाणें साडे सततीस बिघे जमीन व दोन गांव इनाम चालवणें. प्रती वर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रती लेहून घेऊन अस्सल पत्र भोगवट्यास काजीजवळ परतोन देणें. ह्मणोन सनद. १ रसानगी यादी.

[६४] दिपाजीराव येरुणकर नामजाद व कारकून किल्ले राजमाची यास सनद कीं, शाहानवाजखान याजकडील जगन्नाथ किल्ले मजकुरीं ठेविले होते, त्यास हालीं सोडून द्यावयाची आज्ञा केली असे; सोडून देणें. ह्मणून सनद १.

इ. स. १७५२–५३.
सलास खमसेन
मया व अलफ.
जमादिलाखर २०.

[६५] श्रीपतराव बापुजी यास पत्र कीं, दमाजी गायकवाड समशेर बाहादर याजकडे शहर अमदाबाद येथील दरवाजे रायपूर व जमालपूर दोनी देवीले आहेत. मशारनिल्हे कडील कारकून येईल त्याचे स्वाधीन करणें. तेथील बंदोबस्त चौकी पाहरा रसानगी परवानगी करतील; तुह्मीं तेथें दखलगीरी न करणें; ह्मणोन पत्र १.

इ. स. १७५२–५३.
सलास खमसेन
मया व अलफ.
जमादिलाखर १५.

[६६] रामाजी माहादेव नामजाद प्रांत साष्टी यास पत्र कीं, किल्ले सुंदरगड सरकारांत घेतला होता तो राजश्री पंतप्रतिनिधी यांचा याजकडे हालीं देविला असे. तरी पंत मशारनिल्हे कडील किल्ला स्वाधीन करून घ्यावयास येतील त्याचे हवाला करून कबज घेऊन हुजूर पाठविणें ह्मणोन सनद १ सादर.

इ. स. १७५३–५४.
अर्बा खमसेन
मया व अलफ.
सावान १४.

[६७] रा० मल्हारजी होळकर यास किल्ले चांदवड व किल्ले इंद्राई येथील हवाला सांगितला असे. तरी यांचे तर्फेनें किल्ले मजकुरीं मुतालीक येतील त्यांचे हातें हवाल्याचें प्रयोजन घेऊन हे व तुह्मीं एकामतें राहून, काम कारभार करीत जाणें. आलंग नौबत चौकी पाहरा खबरदारीनें करीत जाणें. यास जामीन हुजूर घेतला असे. यास सालिना मोईन रुपये:—

इ. स. १७४४–४५.
अर्बा खमसेन
मया व अलफ.
रमजान ९.

---

(64) A Sanad to Dipajirao Yerunkar the officer in charge of fort Rajmachi and the Karkun Jagannath, Shahanwaj Khan's man who has been confined in the fort, is ordered to be set at liberty. Release him.

A. D. 1752-53.

(65) The charge of the two gates Raypur and Jamalpur, of Ahmedabad city, is entrusted to Damaji Gaikwad Samsher Bahadur. You should hand them over to the care of his Karkoon that may be deputed for the purpose. The arrangements in regard to watch passports &c. will be made by him; you need not concern yourself with the matter.

A. D. 1752-53.

(66) Sundergad belonging to the Pratinidhi was restored to him.

A. D. 1753-54.

६००० किल्ले चांदवड.

९००० ऐन तैनात कबील्याचे बेगमीस वगैरे खासगी खर्च पोरगें देखील पडीले पान मिळोन.

१००० पालखीची तैनात.

———

६०००

४००० किल्ले इंब्राई.

३००० तैनात सदरहु प्रमाणें

१००० पालखी.

———

४०००

———

१००००

येणेंप्रमाणें दहा हजार रुपये करार केले असेत; पावीत जाणें. याखेरीज अडीसेरी असामी, १० किल्ले चांदवड १० किल्ले इंब्राई. (एकूण २०).

वीस असामींस तैनात शिवाय लोकांचे शिरस्तेप्रमाणें अडीसेरी करार केली असे, पावीत जाणें. म्हणोन सेनाधारी व सेनालेखक यांचे नांवें सनदा २.

रसानगी यादी.

सदरहु जामीन घेतला म्हणून सनदेंत शिरस्ते प्रमाणें लिहिलें असे; परंतु येथें जामीन कोणीं घेतला नाहीं.

इ. स. १७५३–५४.
अर्बा खमसेन
मया व अलफ.
जिलकाद ४.

[६८] नबाब सलाबतजंग याचा तह जाहला त्याचीं पत्रें रसानगी यादीः—

हवालदार व कारकून किल्लेहाय यांचे नावें सनदा कीं, किल्ले मोंगलाकडील सरकारांत घेतले होते ते हालीं नबाब सलाबतजंग याजकडे देवीले, १ किल्ले इंद्राई १ किल्ले राजदेहर १ किल्ले

---

(67) The management of the forts of Chandwad and Imbrai was entrusted to Malharji Holkar.
A. D. 1753-54.

(68) Sanads to the Hawaldars and Karkoons of the following forts to the effect, that the forts in question which were taken from the Mogals are now to be handed over to Nawab Salabatjung:—
A. D. 1753-54.

1 Fort Indrai. 1 Fort Rawala.

मार्कंडा १ किल्ले कनेरा १ किल्ले कांचना १ किल्ले ज्वाळा १ किल्ले रवाला १ किल्ले हणवत्या १ किल्ले देहर १ किल्ले पेमगीरी १ किल्ले सोनगड १ किल्ले अन्चला. येणेंप्रमाणें बारा किल्ले नबाबाकडे देविले असेत. तरी नबाब याजकडील किल्लेदार येतील त्याचे हवाले किल्ले करून कबजें घेणें ह्मणोन सनदा १२.

इ. स. १७५३–५४. अर्बा खमसेन मया व अलफ. जिल्हेज २२.

[६९] अंताजी माणकेश्वर पथक सहवर्तमान चारहजार फौजेनिसीं हस्तनापुरास आहेत, त्यास चार हजार फौजेची बेगमी नालबंदी व रोजमुरा करार करून ऐवज देणें. मशारनिल्हेस वकिलाकडे नालबंदीची वरात दिली होती तो ऐवज पावला नाहीं ह्मणोन मशारनिल्हेनीं सांगितलें. त्यास वकीलाकडील ऐवज पावला नसीला तर मनास आणून दुसरे जागा ऐवज नेमून देणें. वकीलाकडे ऐवज करार जाला तर त्याजकडून देवणें. ह्मणोन चिरंजीव रा० दादा यास पत्र १.

इ. स. १७५३–५४. अर्बा खमसेन मया व अलफ. मोहरम १०.

[७०] नारो आपाजी यास सनद कीं, सलाबतजंग याजकडील पेमगीर किल्ला सरकारांत घेतला आहे. तो हालीं त्यास द्यावयाचा करार केला असे. तरी किल्ल्यावर जकीरा असेल तो कुल उतरून नबाबाकडील किल्लेदार येईल त्याचे हवालीं किल्ला करणें; कबज घेणें ह्मणोन सनद १.

इ. स. १७५३–५४. अर्बा खमसेन मया व अलफ. मोहरम २३.

[७१] करारनामा खानआजम मीर महंमद सफीबेगखां प्रांत शेरपूर महाल बितपसील:—१ परगणे भदलावद १ परगणे लोहरवडा १ परगणे खेलचीपूर १ परगणे अलणपूर. एकूण माहाल चार येथील करार या प्रमाणें जाहला असे. तपसील:—

---

1 Fort Rajdehar.
1 Do. Markundeo.
1 Do. Kanera.
1 Do. Kanchana.
1 Do. Jawala.
1 Fort Hanwantgad.
1 Do. Dehar.
1 Do. Pemgiri.
1 Do. Songad.
1 Do. Anchala.

You should hand over the forts to the officers deputed by the Nawab and take their receipt.

A. D. 1753-54.

(69) Antaji Mankeshwar was at Delhi with 4000 men. Raghoba Dada was requested to arrange to supply him with money.

A. D. 1753-54.

(70) A Sanad to Naro Appaji. Fort Pemgiri belonging to Salabat Jung had been taken by Government. It is ordered that it should now be restored to him.

दरोबस्त चार माहाल अंमल देखील माल व सायरी व फौजदारी व फुरोही व नाकेदारी व जरीबाना व नजराणा व तलबाना वगैरे कुलबाब पडिले पान जो आकार होईल त्यापैकीं निमे सरकारांत कमावीसदार येतील त्याजकडे द्यावा; निमे खान मशारनिल्हेकडे द्यावा. त्यांत जागीरदार वगैरे मोगलाईकडील अंमलदार असतील त्याजला खान मशारनिल्हेनीं समजवावें. जे कोणी अमलांत खलेल करतील त्यांस सरकारचे कमाविसदारांनीं व खान मशारनिल्हेकडील कमाविसदारांनीं तंबी पोंहचवावी. आपल्या हिश्शाप्रमाणें जमावाचा खर्च दोहींकडे समजावा. चार परगणे यांत ठाणीं आहेत त्यांची वांटणी येणेंप्रमाणें:—

सरकारांत ठाणीं	खान मशारनिल्हेकडे
१ मौजे सुरवळ.	१ कसबे खिलचीपूर.
१ मौजे आवण.	१ कसबे लोहरवाडा.
१ कसबे अळणपूर.	१ कसबे शेरपूरा.

येणेंप्रमाणें तीन ठाणीं सरकारांत व तीन ठाणीं खान मशारनिल्हेकडे करार केलीं असेत. याशिवाय मौजे कुडेरा परगणे भदलावद येथील ठाणें समाईक; दोहींकडील शेडे दोन उभे करावे. दरोबस्त चहु माहालचीं ठाणीं देखील निमेनिम पडिलें पान वांटून घ्यावें. कसबे शेरपूर येथील अंमल दरोबस्त मशारनिल्हेकडे दिल्हा असे. येणेंप्रमाणें करारनामा लेहून दिल्हा असे १.

---

(71) 1 Pargana Bhadalwad. 1 Pargana Loharwada.
1 Do. Khelchipur. 1 Do. Alanpur.

Out of the whole revenue including octroi and other cesses that may be realized, one half should be paid to the Kamavisdar of Government, and the other half should be paid to the Khan. The Khan should manage to satisfy the claims of the holders of Jahagir and Amals, granted by the Mogals, from his portion of the revenue. The Kamavisdar of Government and the Kamavisdar of the Khan, should co-operate in putting down persons who may create disturbance in the province. The expenses of keeping up an army should be borne by both the parties. The posts shall be divided as under.

To be kept by Government.	To be kept by Khan.
1 Mauze Surwal.	1 Kasbe Khelchipur.
1 Do. Awan.	1 Do. Loharwara.
1 Kasba Alanpur.	1 Do. Sirpur.
3	3

[७२] कृष्णाजी केशव यास पत्र कीं, परगणे अकबराबादखुर्द हा परगणा रा० मल्हारजी होळकर व रा० जयाजी शिंदे याजकडील वाटणींत दिल्हा असे. तरी तुह्मीं परगणे मजकुरीं दखलगिरी न करणें. सदरहू परगणा मशारनिल्हेचे कमावीसदाराचे हवालीं करणें. साल मजकुरीं तुह्मीं वसूल घेतला असेल तो मशारनिल्हे उभयता सरदार यांजकडे परतोन देणें; ह्मणोन सनद १.

इ. स. १७५३–५४.
अर्बा खमसेन
मया व अलफ.
जमादिलावल ९.

[७३] लखोजी बोध्ये यास पत्र कीं, दुर्गवाले याजकडील वकील तहास आला; तह करून येथून रा० शंकराजी राम यास घेऊन गेले आहेत; कराराप्रमाणें पैका घेऊन व हत्ती नजरेचा ऐसे घेऊन दावणगिरेयास येतील; आणि तुह्मांस लेहून पाठवतील त्याप्रमाणें ठाणें आणजीचे दुर्गवाले याचे हवाला करणें. आणि ठाणें पावल्याचें कबज घेऊन तुह्मी व वरकड फौज देखील गाडदी सुद्धां उठोन येणें. दुसरे सनदेचा उज्र न करणें. पैका व हत्ती आला ह्मणजे उठोन येणें. ठाणें यांत दारू शिसें असेल तें घेऊन येणें; ह्मणोन लिहिलें असे.

इ. स. १७५३–५४.
अर्बा खमसेन
मया व अलफ.
जमादिलाखर १४.

[७४] जखापा देसाई परगणे तेरदल याजपासून ठाणें तेरदल सरकारांत घेतलें सबब देसाई मजकूर याचीं कलमें येणेंप्रमाणें चालवावीं. याचा करार विद्यमान नारायण व्यंकटेश:—

इ. स. १७५३–५४.
अर्बा खमसेन
मया व अलफ.
रबीलाखर २०.

इनाम गांव परगणे मजकूर पैकीं आहेत, १ हलीहिंगली १ हनगडी १ तकथडी १ मुगुलगोड १ हरगिरी. एकूण पांच गांव पुरातन असतील ते चालवावे.

देसाई मजकूर याचे भाऊबंद सरकारांत येऊन फिर्याद देतील त्याचा मजकूर गैरवाजवी असेल तो होणार नाहीं; वाजवी असेल तें होईल.

---

(72) In the division of territory that was made Pargana Akbarbad was given to Malharji Holkar and Jayaji Sinde.

A. D. 1753-54.

(73) A Letter to Lakoji Bodye. The ambassador of the Durga chief having come here, a treaty has been concluded with him. He will come to the province, and will get with him certain amount in cash and one elephant, to be presented as Nazar, and will write to you of his arrival. You should make over to him the post of Anji, and after taking a receipt for the same, you should withdraw your force, including the Gardis, and come to Poona.

A. D. 1753-54.

(74) The post of Terdal was taken from Jakhappa Desai of the Pargana. The Inam villages and Haks held by him were continued to him.

A. D. 1753-54.

देसाई याची वस्तभाव व प्यादे याचा हिसाब ठाणें मजकुरीं असेल तीं सोडून द्यावीं १.

ठाणें मजकुरीं आपले निसबतीचे कारकून आहेत त्याच्या असाम्या करार करून द्याव्या; तुह्मी हुजूर आलीयावर आज्ञा करणें ते केली जाईल.

देसाई मजकूर याचा हक्क लवाजमा परगणे मजकुरीं असेल तो पेशजीपासून चालत आल्याप्रमाणें चालेल.

एकूण कलमें पांच करार केलीं असेत. सदरहूप्रमाणें पाहून चालविला जाईल ह्मणोन देण्याची याद करार करून शिक्का करून दिल्ही असे.

इ. स. १७५३–५४. अर्बा खमसेन मया व अलफ. रजब २०.

[७५] बाजी बल्लाळ फडणीस परगणे सिहोर व परगणे दुराहा यास पत्र कीं, खान वालाशान फैज महमदखान रोहिले याचे मुलुकाची वाटणी पेशजी सन खमस अर्बैनांत होऊन तह जाहला ते समयीं रदबदलीमुळें सरकारांतून खान मजकूर यास गांव दिल्हे आहेत; त्यांपैकीं परगणे सिहोर व परगणे दुराहा पैकीं गांव दिल्हे आहेत त्याच्या सनदा आहेत, त्याप्रमाणें खान मजकूर याजकडे चालत आहेत त्याप्रमाणें सुरळीत चालों देणें. कोणे गोष्टीविशीं मुजाहिम न होणें ह्मणोन सनद १.

इ. स. १७५३–५४. अर्बा खमसेन मया व अलफ. रजब २९.

इ. स. १७४५–४६. सीत अर्बैन मया व अलफ. सवाल ८.

[१९९] मिस्त्र सेजेल कोसलर इंग्रज मुंबईकर यांस भात मुडे २०० दोनशें वाजवी पाडाप्रमाणें देविले असे. देणें. जो पैका होईल तो घेणें. ह्मणोन जगन्नाथ दामोदर कमाविसदार परगणे बेलापूर यांस पत्र १.

इ. स. १७६१–६२ इसन्ने सीतेन मया व अलफ. जमादिलाखर १६.

[२००] दरबार खर्च रुपये ८ छ० २२ रोज रामाजी यादव वकील दिमत इंग्रेज मुंबईकर यांजकडील येथें होते, त्यांस समाधान नाहीं सबब फिरोन माघारे जातात; सबब बेगारचे माणसास रसानगी चिटी रुपये.

(ब.) इतर.

[२०१] जो-पेसील बुतज फिरंगी राजश्री स्वामीपासीं होता तो मुंबईस जात आहे; त्याज जवळ घोडें आहे, त्यास दररोज हरभरे किंवा उडीद कैली ८८॥। पाऊण पायली याप्रमाणें फिरंगी मुंबईहून फिरोन येई तों पावेतों पेणेस ठेऊन घेऊन देत जाणें. ह्मणोन आपाजी कृष्ण हवालदार तालुके पेण पंच महाल यांस पत्र १.

इ. स. १७४२–४३. सलास अर्बैन मया व अलफ. सवाल १८.

१९. लहान लहान संस्थानें.

[२०२] खंडणी तालुका निसबत यारमहमदखान रोहिले तीसाला इस्तकबील सालमजकूर तागाईत सन सलास बेरीज रुपये. सालमजकूर सन इहिदे रुपये:— २१६००० बरहुकूम साल गुदस्त जबानी मोहनलाल (१२८००० कित्ता, ८५००० भेलसें, ३००० खर्च महाल मजकूर.)

इ. स. १७४०–४१. इहिदे अर्बैन मया व अलफ. जिलकाद २४.

---

(198) A letter to Vishwanath Narayen of Belapur. Captain Eastbird and 2 Europeans are going from here to Bombay. You should provide them with ships belonging to Government or to private traders, whichever may be available, for their journey to Bombay.

A. D. 1740-41.

(199) A letter to the Kamavisdar of Belapur directing him to give rice measuring 200 Mudhes to Mr. Segel, Councillor of the English Government at Bombay and to receive from him its price at the proper rate.

A. D. 1745-46.

(200) Ramji Yadav, was agent of the English of Bombay, at the Poona Court.

A. D. 1761-62.

(201) A Ferangee (Portuguese), who was with the Raja, was going to Bombay. Orders were issued for keeping his horse at Pen, and for feeding the animal till his return.

A. D. 1742-43.

सन इसन्ने बरहुकूम साल गुदस्तां २४००००:—यासी मुदती. १२०००० कार्तिकअखेर, १२०००० चैत्रअखेर.

२४००० जाजती सालमजकुरीं गुदस्ताचे बेरजेवर. सन सलास बरहुकूम साल गुदस्त रुपये २४००००. यासी मुदती:—१२०००० कार्तिकअखेर, १२०००० चैत्रअखेर.

येणेंप्रमाणें तीसाला दरसाल दोन लक्ष चाळीस हजारप्रमाणें खंडणी करार केली असे. सदरहुप्रमाणें तीसाला द्यावे. पेशजी तहनामा तीर्थरूप रा० कैलासवासी राव यांणीं तीसाला करून दिल्हा आहे. त्यांत साल गुदस्तां सन अर्बैनची बेरीज जी असेल ती व खर्चाचे तीन हजार यांजवरी दरसाल चोवीस हजार रुपयेप्रमाणें जाजती तीन सालें द्यावें. प्रांत माळवा व सरकार हांडे वगैरे सरकारचे तालुक्यांत कांहीं उपद्रव न द्यावा. साल मजकुरची खंडणी रुपये २४०००० ऐन सालमजकूर, ६९४१४ साल गुदस्ताची बाकी, एकूण ३०९४१४ तीन लक्ष नऊ हजार चारशें चौदा रुपयांच्या मुदती इस्तकबिल छ २९ जिलकाद. ६९४१४ तारीख छ ३ जिल्हेज द्यावे, १२०००० तारीख छ ११ जिल्हेज द्यावे, १२०००० तारीख छ २९ मोहरम द्यावे. सदरहुप्रमाणें सालमजकुरीं द्यावे. पेस्तर दुसाला मुदतीप्रमाणें द्यावे.

या खेरीज उदेपूरचे मजमूचे दरसाल द्यावे रुपये २०० दोनशें.

[२०३] संस्थान दतिया राजा इंद्रजीत यांसी फारखती लेहून दिल्ही कीं, खंडणी साल मजकुरीं खेरीज जहागीर रुपये ४०१००० एकूण चार लाख एक हजार भरून पावलों ह्मणून फारखती लेहून दिल्ही असे. फारखती तसलमात मल्हार कृष्ण रुपये वसूल होतील तेव्हां फारखती द्यावी ह्मणून सांगितलें असे.

इ. स. १७४२–४३. सलास अर्बैन मया व अलफ. जिल्हेज २.

[२०४] संस्थान चंदेरी निसबत राजे मानसिंह खंडणी साल मजकूरची करार ७०००० करार केले; त्यापैकीं घाटीवरचे गांव सरकारांत घेतले, त्याचा वसुली आकार होईल तो वजा देऊन बाकी ऐवज घ्यावा ह्मणून खंडणीपत्र राजाचे नांवें लिहून दिल्हें. घाटीवरचे गांव घेतले त्यांपैकीं राजाकडे ठेविले १ रामनगर १ इमलीया २ सराई १ सिधपूर १ गडरोळी १ फतीयाबाद लंग येणेंप्रमाणें वजा करून बाकी घाटीवरचे गांव सरकारांत घेतले असेत.

इ. स. १७४४–४५. खमस अर्बैन मया व अलफ. रबिलावल १०.

---

15. MINOR STATES.

(202) The contribution to be levied from the province under Yar Mahomed Khan Rohilla, was fixed for 3 years, at Rs. 2,40,000 a year, or Rs. 24,000 more per year than the amount fixed by Bajirao during the last 3 years, and he was directed not to molest the territory of Malwa and Sarkar Hande.

A. D. 1740-41.

(203) A contribution of 4 lacs and one thousand Rs. was levied from Raja Indrajit of Sansthan Datiya.

A. D. 1742-43.

[२०५] राजे सभासिंग व राजे जगतराज यांजपासून कबुलायती लिहून घेतल्या कीं, तुमचा आमचा भाऊपणा पहिल्यापासून होता; आतां विशेष जाहला; ह्मणून आपले राज्यांत हिस्सा शेंकडा रुपये २५ पंचवीस दिल्हे असेत. गांवगन्ना शेकडा पंचवीस रुपये तुह्मीं घेणें; पाऊणशें रुपये आह्मीं घेऊं; ह्मणून उभयता राजांच्या कबुलायती २ घेतल्या. मिति हिंदुस्थानी आषाढ वद्य ४, दक्षिणी ज्येष्ठ व॥ ४ करार सन १८०२.

इ. स. १७४५–४६.
सीत अर्बैन
मया व अलफ.
जमादिलाखर १.

[२०६] कसबे संबळगड राजा गोपाळसिंग करोलीकर यांसी दिल्हा असे. कसबे संबळगड ठाकूर धीरतसिंग यांस पत्र कीं तुह्मीं किल्ला गोपाळसिंग यांस देणें आणि तुह्मीं जलालपुरांत राहणें. जलालगड तुह्मांस राहण्यासी दिल्हा असे तरी तेथें राहणें आणि किल्ले संबळगड गोपाळसिंग यांचे हवाला करणें ह्मणून पत्र मशारनिल्हेच्या नांवचें दिल्हें असे.

इ. स. १७४६–४७.
सबा अर्बैन
मया व अलफ.
रमजान ३०.

[२०७] परगणे सेवढा तालुका राजा प्रीतीसिंग येथील दुसाला रुपये भरून पावले, सन खमस व सन सीत दोहीं सालचे रुपये कबुलायतीप्रमाणें भरून पावले ह्मणून फारखती लेहून दिल्ही असे.

इ. स. १७४६–४७.
सबा अर्बैन
मया व अलफ.
मोहरम १९.

[२०८] बाबत नजर रा० माधोसिंग सवाई जयसिंग यांचे कनिष्ठ पुत्र रा० सवाईईश्वरसिंग यांजकडून चार महाल देविले. १ परगणे टोंक १ परगणे तोडा. १ परगणे मालपुरा देखील फागीचे गांव दरोबस्त १ नेवाईचा मुक्काम बारवाडा, एकूण चार महाल भाऊपणाचा हिस्सा द्यावयाचा करार केला; सबब नजर करार रुपये १०००००० . सदरहू रुपयांची निशा रा०

इ. स. १७४७–४८.
समान अर्बैन
मया व अलफ.
जमादिलावल १२.

---

(204) The tribute to be levied from Mansinh Raja of Sansthan Chanderi was fixed at Rs. 70,000. The Raja was asked to remit the amount after deducting from it, the assessment of the villages above the ghauts; surrendered to Government. Of the villages above the ghauts, Ramnagar, Imlia, Sarai, Sidhpur, Gadroli, and Fatiyabad were left with the Raja.
A. D. 1744-45.

(205) Agreements were taken from Raja Sambhasing and Raja Jagatraj promising to surrender to the Peshwa a quarter of their revenue in consideration of the brotherly relation which had long existed between them and the Peshwa.
A. D. 1745-46.

(206) Dhiratsing Thakur of Kasba Sambalgad, was ordered to hand over the village to Raja Gopalsing of Karoli, and to reside in Jalalpur.
A. D. 1746-47.

(207) Contribution was received from Pargana Sevadha under Rana Priti Sing.
A. D. 1746-47.

मल्हारजी होळकर यांणीं करून पत्र लेहून दिल्हें असे. सदरहु रुपयांचे वायदे करार रुपये ३००००० इस्तकबिल वैशाख शुद्ध पंचमी तागाईत श्रावण शुद्ध १ प्रतिपदा शके १६७०. ३००००० इस्तकबिल श्रावण वद्य ७ तागाईत कार्तिक शुद्ध प्रतिपदा १६७०. २००००० पौषमास शुद्धअखेर शके १६७०. २००००० वैशाख शुद्ध प्रतिपदा शके १६७१. एकूण १०००००० दहा लक्ष रुपयांचें निशापत्र लेहून दिल्हें आहे कीं, सदरहू महालांत दरोबस्त अंमल करून द्यावा व ठाणीं गढीया कोट जे असतील ते खालीं करून द्यावे. मशारनिल्हेचा अंमल सुरळीत बसलीयावर सदरहु नजराणीयाचा ऐवज आह्मीं उगवून देऊं. वायद्याप्रमाणें पावतें करून कराराप्रमाणें जागा खालीं करून द्यावी. याप्रमाणें करार करून मल्हारजी होळकर यांचा कागद लेहून घेतला असे.

वरील गोष्टीच्या दुसऱ्या दिवशीं सवाई जयसिंग यांजकडून तीन लाख रुपये पेशवेसरकारकरितां व २५ हजार रुपये महादाजी अंबाजी यांजकरितां नजर ह्मणून घेण्याचा करार केला.

[२०९] शंकराजी केशव नामजाद प्रांत वसई यांस पत्र कीं रा० विक्रम पतंगराव जवारकर यांजकडे अंताजी रुद्र यांचे रुपये १००० एक हजार येणें आहेत. त्यास हुजूरून पत्र लिहिलें आहे. तर त्यांजकडे तुह्मीं पाठवून हजार रुपये वसूल घेणें. त्यापैकीं चौथाई रुपये २५० अडीचशें सरकारांत घेणें. बाकी साडेसातसें मशारनिल्हेस देणें. ह्मणोन पत्र १.

इ. स. १७४७–४८. समान अर्बैन मया व अलफ. मोहरम २४.

[२१०] हरी कृष्ण कमावीसदार परगणें नासिक यांस पत्र कीं छटु सदीवाळ यांणीं विदित केलें कीं, रामदेव राणा संस्थान रामनगर यांजकडे जमाव सुद्धां चाकरी केली, त्यास आपली तलब रुपये एक हजार व खरेदी कापड आपणं शंभर रुपयांस दिल्हें एकूण एकशें रुपये राहिले आहेत ते देत नाहीं; व रुद्राजी विश्वनाथ दिमत विक्रम पतंगराव यांजकडे चाकरी आठ म-

इ. स. १७४८–४९. तीसा अर्बैन मया व अलफ जमादिलावल २७.

---

(208) It was agreed that Government should obtain for Madhosing, Sawai Jaysing's youngest son, the four Mahals of Pargana Tonk Pargana Tod, Pargana Malpura including the Fagi villages, and Barwada, as his share, from Sawai Ishwar Sing, and that he, Madhosing, should pay to Government a nazar of 10 lacs of Rupees. Malharji Holkar stood security for the amount.

A. D. 1747-48.

On the next date, Rs. 3 lacs for the Peshwa, and Rs. 25,000 for Mahadaji Ambaji, were agreed to be levied, as a present from Sawai Ishwarsing.

(209) Vikram Patangrao owed a debt of Rs. 10001 to Antaji Rudra. Shankarji Keshav of Prant Bassein was ordered to recover the amount and to credit a fourth of it to Government.

A. D. 1746-47.

(210) Chhatu Sadiwal represented that Ramdeo, Rana of Ramnagar, owed him Rs. 1000 on account of wages for service done, and Rs. 100 on account of cloth furnished. Hari Krishna Kamavisdar of

A. D. 1748-49.

हिने केली त्यास त्याजकडे तलब शंभर रुपये व आपल्यावर तुफान घेऊन गुन्हेगारी शंभर रुपये घेतले व तरवार वगैरे वस्तभाव घेतली आहे ती देवावी. त्यावरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी सदरहूप्रमाणें मनास आणून याचा वाजवी पैका त्याजकडे असेल तो उगवून घेऊन सरकारची चौथाई घेऊन हुजूर पाठवणें. बाकी तीन तक्षिमा याच्या यास देणें ह्मणोन पत्र १.

इ. स. १७४८–४९. तीसा अबैन मया व अलफ. रविलावल २९.

[२११] संस्थान सेवढा निसबत राजा बिजेबहादर याजकडे करार केले रुपये १०००१ खंडणी बदल सालगुदस्त मार्फत शेख रोशनअल्ली व खेमचंद वकील सन १८०९, ७९००० नजर साल मजकूर बाबत टिळा राज्य सेवढा बरहुकूम कबुलायत, एकूण १७९००१.

इ. स. १७४९–५०. खमसेन मया व अलफ. जमादिलाखर १९.

[२१२] नारोशंकर कमावीसदार यांस पत्र कीं, राव भोज दिमत राजा वोडसेकर यांचीं मुलें माणसें सावकारांनीं दहा हजार रुपयांबद्दल अटकावून ठेविलीं आहेत ह्मणोन मशारनिल्हेंनीं विदित केलें, तरी राऊ भोज पदरचे आहेत यांजवर नजर देऊन हें पत्र तुह्मांस सादर केलें असे. तरी राजा वोढसेकर यांसी सांगोन कांहीं ऐवज त्यांजकडून देववणें व कांहीं तुह्मीं देऊन मशारनिल्हेचीं मुलें माणसें सोडऊन देणें ह्मणोन सनद १.

इ. स. १७४९–५०. खमसेन मया व अलफ. सवाल १५.

[२१३] घाट कासारे येथील जकात जवारकरानें सरकारांत दिल्ही त्याचा अंमल पेशजीं रा० बहिरजी बाळकवडे यांस सांगितला होता, तो दूर करून हालीं जकात तुह्मांकडे दिल्ही असे. तरी जकातीचा अंमल पेशजीच्या शिरस्तेप्रमाणें तुह्मीं करणें. आकार होईल तो सरकारांत जमा करीत जाणें. ह्मणोन शंकराजी केशव प्रांत वसई यांस पाठविले रूबरू सनद १.

१ बहिरजी बाळकवडे यांस पत्र कीं, सदरहु जकात तुह्मांकडे होती ते दूर करून शंकराजी केशव यांस कमावीस सांगितली असे. याचे तर्फेनें कमावीसदार अंमल करील त्यास करूं देणें ह्मणोन.

Pargana Nasik was directed to make inquiries, and to recover the amount due, taking one-fourth of it for Government.

A. D. 1748-49.

(211) A tribute of Rupees 175001 was imposed on Raja Bije Bahadur of Sansthan Sewadha.

A. D. 1749-50.

(212) Rao Bhoj in the service of the Raja of Wodse, owed a debt of Rupees 10000. The creditor therefore kept the Rao's family under restraint. Orders were issued for the clearance of the debt partly by the Raja of Wodse and partly by Government, and for the release of the family in question.

A. D. 1749-50.

(213) The right of levying Octroi in the Kasara Ghaut, was transferred to the Peshwa by Vikram Patangrao, Raja of Jawar.

१ पाणसारे घाट मजकूर यास पत्र कीं जकातीचा कानूकायदा सुदामतप्रमाणें यांस सांगोन वर्तणें ह्मणोन.

१ क्षष्णशा संस्थान जवार यांसी पत्र कीं, जकातीचा अंमल मशारनिल्हेकडे देणें खळखळ न करणें ह्मणोन.

इ. स. १७५०-५१. इहिदे खमसेन मया व अलफ. सावान ५.

[२१४] संस्थान बुंदी निसबत राव राजा उदेसिंग यांजकडे पेशजी स्वारीमध्यें दहा लक्ष रुपये करार केले. त्यांपैकीं सन तीसांत वसूल सरकारांत जाहला रुपये २००००० दोन लक्ष, बाकी रुपये ८००००० आठ लक्ष राहिले. त्यांपैकीं तुह्मां उभयतांस रुपये ३००००० तीन लक्ष देविले आहेत. निमेनिम प्रमाणें वांटून घेणें. बाकी पांच लक्ष राहिले ते सरकारांत पावते करणें. आठ लक्ष रुपयांचा वसूल जसजसा येत जाईल त्याची वांटणी दामाशाई बमोजिब होईल त्याप्रमाणें तीन लक्षांवर वांटणी बसेल तो ऐवज तुह्मीं उभयतां घेणें. पांच लक्ष रुपयांवर वांटणी बसेल तो ऐवज सरकारांत पावता करून जाब घेणें ह्मणोन रा० मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे यांचे नांवें सनद १.

इ. स. १७५०-५१. इहिदे खमसेन मया व अलफ. सवाल ६.

[२१५] राजा अमरसिंग आहरवाला याचा सरंजाम कदीम होता तो करार करून दिल्हा सबब नजरेचा ऐवज रा० भाऊंनीं करार केला. साल दरसाल द्यावे याप्रमाणें करार बरहुकूम कतबा रुपये १५००, तपसील (१२०० ऐन सरकारांत द्यावे, ३०० दलपतराय कायत दिमत मजकूर यास बक्षीस सालदरसाल द्यावे. एकूण १५००). सदरहु दीड हजार रुपयांचा कतबा मोघम लेहून घेतला आहे. परंतु सदरहु प्रमाणें तीनशें रुपये दलपतराय यास द्यावयाचे करार केले आहेत ते अमरसिंग राजा यास कळों देऊं नये. परवानगी रूबरू.

A. D. 1750-51.

(214) A sanad issued to Malharji Holkar, and Jayaji Sinde, Rao Raje Uddesing in charge of Sansthan Bundi, agreed during the last invasion to pay Rs. (10,00,000) ten lacs, of this sum Rs. (200,000) two lacs were received in the year A. D. 1748-49, and the balance of Rs. (800,000) eight lacs, has yet to be recovered. Out of this balance Rupees (300,000,) are granted to you in equal proportion. The remaining amount of Rs. (500,000) five lacs should be remitted to Government.

A. D. 1750-51.

(215) The old saranjam of Raja Amarsing Aharwala having been conferred on him, Rajeshri Bhau fixed the Amount of Nazar to be annually levied at Rs. 1500, as per agreement.

Details.

1200 To be taken by Government.

300 To be given annually as reward to Dalpatray in the service of the above person.

इ. स. १७५३–५४. सलास खमसेन मया व अलफ. रजब १२.

[२१६] रंगापा नाईक संस्थान कनकगिरी यांस जाब दिल्हा कीं तुमच्या संस्थानाची खंडणी रुपये ९००० पैकीं वसूल रुपये ८००० आठ हजार सरकारांत पावले. बाकी हजार रुपये राहिले ते नारायणराव व्यंकटेश यांस देविले असेत. देऊन कबज घेणें. याउपरी तुह्मांस जाजती उपसर्ग लागणार नाहीं ह्मणोन कौल दिल्हा असे. रसानगी यादी.

इ. स. १७५२–५३. सलास खमसेन मया व अलफ. रविलाखर ९.

[२१७] समत हरपनहळ्ळीं येथील सोमशेखर नाईक याचे नावें कौल लेहून दिल्हा कीं, खासा स्वारी या प्रांतीं जाली, सबब तुमच्या संस्थानाची खंडणी खेरीज मसाला रुपये १००००१ एक लाख एक रुपया करार केला असे. याचा वसूल सरकारांत देऊन कबज घेणें. ह्मणोन कौल लेहून पाठविला असे १.

इ. स. १७५२–५३. सलास खमसेन मया व अलफ. जमादिलावल ११.

[२१८] समत श्रीरंगपटण येथील संस्थानिकास सनदा लेहून दिल्या कीं खासा स्वारी फौजेसहवर्तमान या प्रांतीं जाली. त्यास पूर्वीं कैलासवासी तीर्थरूप आले होते त्या समयींचा संस्थानासंबंधीचा कांहीं किंत चित्तामध्यें होता, तो दूर करून संस्थान मजकूरची खंडणी देखील सालाबाद बाकीसुद्धां बेरीज रुपये २२००००० बावीस लक्ष करार केले असेत. पावते करणें. या उपरी साल मजकुरीं आमच्या राज्यांतील कोणी सरदार व फौज येऊन संस्थान मजकुरास उपसर्ग लागणार नाहीं. तुह्मीं आपली निशा असों द्यावी ह्मणोन सनदाः—१ राजे जगदेव याचे नांवें; १ देवराज दलवाई याचे नांवें.

The agreement for Rs. 1500 is in general terms and is silent as to the reward of Rs. 300 promised to Dalpatray. The amount should however be paid and this should be kept secret from Raja Amarsing.

A. D. 1752-53.

(216) A tribute of Rs. 9000 was received from Rangappa Naik of Sansthan Kanakgiri.

A. D. 1752-53.

(217) A Kaul to Som-shekhar Naik of Samat Harpanhali. The Peshwa having come to your province in person, the tribute to be levied from the Sansthan (exclusive of fines) is fixed at Rs. 100001.

A. D. 1749-50.

(218) Sanads issued to Raja Jagdeo and Deoraj Dalwai of the Sansthaniks of Samat Shrirang-pattan. The Peshwa with his army came in person to the province. The province was also on a former occasion visited by the late Peshwa. The Sansthan by its conduct at the time incurred the displeasure of Government. The displeasure has now been removed, and the amount of tribute payable by the Sansthan, including past years arrears, is fixed at 22 Lacs of Rupees. The amount should be remitted. No officer of the Government or his army will trouble the Sansthan in the current year. You may rest assured.

इ. स. १७५३–५४. अर्बा खमसेन मया व अलफ. जिलकाद ११.

[२१९] स्वारी कर्नाटक येथील खंडणीपैकीं साल गुदस्तां स्वारीहून सातारीयाचे साहुकारावर हुंड्या पाठविल्या होत्या. त्याप्रमाणें सावकाराकडील ऐवज वसूल आला. सबब ज्या सावकारांनीं हुंड्या लेहून दिल्या होत्या त्यांस कबजें लेहून दिल्हीं. रुपये:—

९००९०० संमत श्रीरंगपट्टण येथील खंडणीपैकीं हुंड्या पाठविल्या त्यांचीं कबजें लेहून दिल्हीं, (७००७०० भुकणजी हरीदत्त याजवर हुंड्या होत्या त्यास कबजें; [१००१०० श्रीधरजी दाजी यास. १००१०० जगन्नाथदास द्वारकादास व गिरधरदास यांस. १००१०० अण्णाजी गोविंद मार्फत भगवानदास गोवर्धनदास; ३९६०० रोख. ६०५०० हुंडी. १००१०० वेंकाजी लिंगोजी व सदाशिव वेंकाजी यांस. १००१०० भगवानदास गोवर्धनदास. १००१०० वृंदावनदास रघुदास यास. १००१०० बाळकृष्णदास जीवनदास. एकूण ७००७००.] १००१०० वल्लभसुंदरदास यास. १००१०० भुकणाजी काशीदास यास. एकूण ९००९००).

१००००० संस्थान बिदनूर पैकीं हुंड्या आल्या त्यास कबजें लेहून दिल्हीं; (५०००० विश्वनाथदास काशीदास यास, ५०००० वल्लभ सुंदरदास यास, एकूण १०००००.)

१००९००. येणेंप्रमाणें अकरा कबजें दहा लक्ष नवशा रुपयांचीं सावकारांस लेहून दिल्हीं. याखेरीज सावकारांस कागद माघारे दिल्हे:—

हुंड्या सदरहू ऐवजाच्या होत्या त्यास ज्या सावकारांवर होत्या त्यांस माघाऱ्या दिल्या हुंड्या पत्रें ११. त्रिवर्ग सावकारांचा कागद सरकारांत लेहून घेतला होता कीं, हुंड्यांचा ऐवज बाकी राहिला तो साबान अखेर देऊं. पुण्यास ऐवज देऊं त्यास दर हजारीं हुंडणावळ रुपये ४ चार प्रमाणें सरकारांतून घेऊं. साबान अखेर ऐवज पावला तरी सावकारी व्याज देऊं ह्मणून कागद लिहून घेतला होता तो माघारीं दिला. हुंड्यांच्या पेटा श्रीरंगपट्टणच्या हुंड्यांच्या होत्या त्या माघाऱ्या दिल्या पेटा पत्रें ९.

इ. स. १७५३–५४. अर्बा खमसेन मया व अलफ. रबिलाखर ८.

[२२०] प्रीतीसिंग राजे धारवाडकर यांस चाकर ठेवून तुह्मांकडे पाठविले आहेत. स्वार देखील कारकून ७५ पाऊणशें, यांस तैनात सेत दर राऊती रुपये ३३७५० यांचा तपसील:—

नक्त तीन हिस्से रुपये २५३१२॥ कापड चौथाई चौपटीनें वजाबट्टा

---

(219) A tribute of 10 lacs of Rupees was levied from Shrirangpattam. Bills for the amount were taken in the names of 10 bankers at Sattara.

A. D. 1753-54.

(220) A Sanad to Govind Ballal of Prant Bundelkhand, Pritising Raje of Dharwar(?) is taken in the employ of Government, and is sent to you. He is to maintain 75 horse-men (including Karkoons) and is to be paid Rs. 33756 at Rs. 450 for each horseman.

A. D. 1753-54.

दरसदे तीस ८४३७॥ आख २१०९ प्रमाणें रुपये ७५९३॥। बाकी निवळ रुपये १७७१८॥।. येणेंप्रमाणें तैनात करार करून तुह्मांकडे पाठविले असेत. यांजपासून बारमाही चाकरी पाऊणशें राऊतांनिसीं घेऊन, हजीरी गैरहजीरी मनास आणून, गैरहजीरी वजा करून हजीरीप्रमाणें कबज करून, प्रांत बुंदेलखंड येथील ऐवजीं ऐवज पावता करणें ह्मणोन गोविंद बल्लाळ प्रांत बुंदेलखंड यांचे नांवें सनद १. रसानगी तैनात जाबिता.

इ. स. १७५३–५४.
अर्बा खमसेन
मया व अलफ.
रबिलाखर २९.

[२२१] रामचंद्र बल्लाळ भुस्कुटे, गोत्र गार्ग्य, सूत्र आश्वलायन, यांणीं, सन इहिदे खमसेनामध्यें मकडाईची राणी अंमल सुरळीत न देई सबब बिघाड जाहला ते समयीं तुह्मीं मर्दुमकी करून लढाई केली आणि राणी ब्रिजकुंवर इजपासून ताल्लुके मजकूरपैकीं परगणे चार तपें सतरा एकूण देहे चारशें साडेएकुणचाळीस घेतले बितपसील:—

परगणें चारवे बिछेले, १ तपें चारवें ४६. बिछेले १ तपें बिछेले ३८. १ तपें बरूड २६. १ तपें बोरी १९. १ तपें हरसूब २०. १ तपें जदगाव ८. १ तपें नांदगाव २१. १ तपें खालवा २४. १ तपें कोठडा निमे २६.

परगणें मुदलास देहे, १ परगणें मुदलास ९. १ परगणें टेंभुर्णी १२. १ परगणें चौकी १७.

कालीभीत मकडाईपैकीं फुटगांव (१ गडहवेली ३९. १ ताल्लुका डोडागा ३८. १ कालीभीत पैकीं ३२॥. १ तर्फ बोरकुंड ३७. १ फुटगांव तन्हाव्या (१ मौजे न्हव्या १ मौजे घोघड्या)).

एकूण परगणें चार, तपें सतरा, एकूण देहे चारसें साडेएकुणचाळीस सरकारचे वांटणीस घेतले; सरकारचा अंमल सरकारांत लाविला; आणि वतनदारीचा हक्क रुसूम तुह्मीं घेतला. त्यास गोंडाचा हक्क रुसूम कितेक गोष्टींचा वाजवी गैरवाजवी आहे. हुजूर विदित जाहलें त्यास सरकारचा अंमल सरकारांत लागला. तुह्मीं श्रम साहास करून मुल्लक सोडविला, तुमचें चालवणें अवश्यक जाणून तुह्मावरी कृपाळु होऊन सदरहु परगणें चार तपें सतरा एकूण देहे चारसें साडेएकूणचाळीस येथील वतन मंडलोईपण व कानगोईपण दोन्हीं वतनें करून दिल्हीं. वतनसंबंधीं हक्क लवाजिमे करार करून दिल्हे बीतपसील:—

नेमाड प्रांतींचे हरदे व जलोदे वगैरे बिज्यागड सरकार नेमाड प्रांतींचे मंडलोईपणाचा व कानगोपणाचा हक्क दरसदे आहे त्याप्रमाणें तुह्मांस करार करून दिल्हा असे. सदरहुप्रमाणें तुह्मीं घेत जाणें. कलम १.

सायर जकात बाजार सेव शिंगोटी वगैरे देशरीतीचे जमीदार घेत असतील त्याप्रमाणें तुह्मीं दोन्हीं वतनें घेत जाणें. कलम १.

A. D. 1753-54.

(221) A Sanad to Ramchandra Ballal Bhuskute of Gotra Gargya, sutra Ashwalayan. In Ehide Khamsen (A. D. 1750–51), when a dispute arose between Government and the Rani of Makdai, owing to the default of the latter in paying the amal due to Government, you led

दफ्तर शिरस्ता तुह्मीं लिहीत जाणें. तुमार, वासिलात, कबुलात, मुचलका, कागदपत्र होईल त्याजवरी शिक्का दस्कत तुह्मीं करीत जाणें. कलम १.

इनाम गांव जमीन जिराईतीची पेस्तर आज्ञा करून सनद सादर होईल त्याप्रमाणें नेमून घेणें. कलम १.

भेटी गांवगन्ना दुसरे मंडलोई व कानगो परगण्यांतील घेत असतील त्याप्रमाणें तुह्मीं घेत जाणें. कलम १

मानपान विडा शिरपाव तुह्मीं आधीं घेत जावा. मग पाटील निसबत रयत देवीत जाणें. कलम १.

राखी, श्राद्धपट्टी, दसरा, दिवाळी, शिमगा, फुरोईचा हिस्सा देशरीतीप्रमाणें दोन्हीं वतनांचा करार करून दिल्हा असे; त्याप्रमाणें तुह्मीं घेत जाणें. कलम १.

माहार, चांभार, तेली, कलाल वगैरे खुद्द जातीवर हक्क दस्तुर देशरीतीचे जमीदार घेत असतील, त्याप्रमाणें करार करून दिल्हा असे. त्याप्रमाणें तुह्मी दोन्हीं वतनांचा घेत जाणें. कलम १.

एकूण कलमें आठ करार करून मंडलोईपण कानगोपण दोन्हीं वतनें करार करून दिल्हीं असेत. लिहिल्याप्रमाणें तुह्मीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवून सुखरूप राहणें ह्मणून पत्र १. शके १६७५ श्रीमुखनाम संवत्सरे माघ वद्य ११ सन इहिदे.

[२२२] रामाजी बापुजी यांस जोरावरसिंग व उदेसिंग संस्थान वासदे यांचा कजीया लागला आहे सबब संस्थानचें राज्य जप्त करावयास पाठविले आहेत, तरी मशारनिल्हेबरोबर हशमी लोक असामी १२९ सवाशें त्यांमध्यें बरकंदाज व हशमी कारकून सबनीस देणें. लोकांस एक रोजमरा देऊन रवानगी करणें. पुढें रोजमरेयाचा जाबता रामाजी बापुजी यांजकडे लेहून पाठवणें. त्याप्रमाणें मशारनिल्हे रोजमरा देत जातील ह्मणोन पत्रें. १ शंकराजी केशव यांजकडून हशमी लोक असामी १०० एकशें देणें ह्मणून. १ बहिरजी बाळकवडे यांजकडून हशमी लोक २९ पंचवीस येविसीं पत्र.

इ. स. १७५३–५४.
अर्बा खमसेन
मया व अलफ.
जमादिलाखर १६.

---

the attack on the Rani's forces with great valour and took from the Rani Brijkuwar, from out of the above Taluka, 4 parganas, of 17 Tarafs, consisting of 439½ villages. In return for this service, the Sarmandloi Watan and the Kango Watan of the acquired territory, is granted to you.

(222) A dispute having arisen between Jorawar Sing and Udesing of Sansthan Wasde, Ramaji Bapuji was sent to attack the Sansthan.

A. D. 1753-54.

इ. स. १७५४–५५.
खमस खमसेन
मया व अलफ.
साबान १३.

[२२३] वीरपा मलपागौडा सरदेसाई मामले हुबळी वगैरे याचे नांवें कौल लेहून दिल्हा कीं फौजेची स्वारी या प्रांतीं जाली, सबब तुमचे तालुकेयांची खंडणी परगणे कितूर वगैरे कुल बेरीज करार रुपये ८०००० ऐशी हजार केले. याचा वसूल सरकारांत मुदतीबमोजिब देऊन सुखरूप राहणें. जाजती आजार लागणार नाहीं, अभय असे ह्मणून कौल १.

सदरहु ऐशी हजार ऐवजाचा जाब मशारनिल्हेचे नांवें लेहून दिल्हा कीं, सदरहु खंडणीचे ऐवजाचा वसूल लिंगो आपाजी याचे गुजारतीनें सरकारांत जाहला. मजुरा असेत ह्मणोन १.

इ. स. १७४८–४९.
खमस खमसेन
मया व अलफ.
रबिलावल २९.

[२२४] मेदगीर नाईक संस्थान चित्रदुर्ग याचे नांवें जाब लेहून दिल्हा कीं साल गुदस्तां खासा स्वारी त्या प्रांतें जाली होती, सबब तुमचे संस्थानची खंडणी करार रुपये ६५००० पांसष्ट हजार केली. त्याचा भरणा सरकारांत गुजारत रा० शंकराजी राम जमा रुपये:–४४८०० जमा पोता, २०२०० जमा परंजेकर, एकूण ६५०००.

येणेंप्रमाणें पांसष्ट हजार रुपये सरकारांत जमा जाहले असेत ह्मणून जाब लिहून दिल्हा असे १.

इ. स. १७५४–५५.
खमस खमसेन
मया व अलफ.
जमादिलावल ३.

[२२५] रूपराम कटारे यांस करार कीं सूरजमल जाट यांजकडे साल गुदस्तां तीस लक्ष रुपये खंडणी करार केली; त्यापैकीं दरसदे रुपये २ दोन समाईक ऐवजीं तुह्मांस करार करून दिल्हे आहेत येणेंप्रमाणें:—

२८००० हालीं चौदा लक्षांचा भरणा करावा. त्यांपैकीं दहांचा जाला आहे. बाकी चार लक्षांची निशा बाळ गोविंद यांजकडे करावयाचा करार केला आहे. त्याचीं कबजें बाळ गोविंद यांजजवळ लेहून दिल्हीं आहेत. त्यास चार लक्षांची निशा क्षेपनिक्षेप जाली ह्मणजे सदरहु पैकीं अठावीस हजार रुपये रूपरामास देणें ह्मणोन बाळ गोविंद यांचे नांवें पत्र दिल्हें आहे. सन खमसचा हप्ता आठ लक्ष रुपयांचा येणें त्याचा भरणा करणें. पुरे आठ लक्ष सरकारांत पावले ह्मणजे सदरहु पैकीं घेणें ह्मणोन रूपरामास पत्र.

१६००० सन सीतचा तिसरा हप्ता आठ लक्षांचा येणें त्याचा भरणा करणें. पुरा भरणा

६०००० जाला ह्मणजे सदरहु ऐवजीं सोळा हजार घेणें ह्मणोन रूपरामास.

A. D. 1754-55. (223) The province of Hubli, &c. having been invaded a tribute of Rs. 80,000 was imposed.

(224) Receipt was acknowledged of Rs. 65,000, remitted by Medgir Naik of Sansthan Chitradurga on account of tribute, as agreed upon at the time of the invasion of the province by the Peshwa during the preceding year.

A. D. 1754-55.

(225) A tribute of Rs. 30 lacs was imposed upon Surajmal Jat in the preceding year.

A. D. 1754-55.

तपशील २८००० बाळ गोविंद यांचे नांवें पत्र चार लक्षांपैकीं. ३२००० रूपराम यांचे नांवें पत्र दोन सालचे हस्त्यापैकीं.

येणेंप्रमाणें साठ हजार रुपये रूपराम कटारे दिमत सूरजमल जाट यांस देविले आहेत. रसानगी यादी पत्रें २.

[२२६] मल्हार राम कारकून याजबरोबर संस्थानिकाच्या राज्यास पत्रें व जागा जागा भील मवासगिरी करून गांवगंनाचीं गुरें ढोरें नेतात व गिरासपट्टी मन मानेसी घेतात ह्मणून हुजूर विदित जाहलें. त्याजवरून वाजवी गिरासपट्टी वगैरे सुदामत चालत आली असेल त्याप्रमाणें गांवगंना मल्हार राम याचे विद्यमानें घेणें आणि सरकारची नजर करार बितपशील.

इ. स. १७५४–५५.
खमस खमसेन मया व अलफ.
जमादिलाखर ४.

	नक्त रुपये.	घोडे.	ह्मैसीसर.	चितळे.	हत्ती.
प्रतापसिंग संस्थान राजपिंपळे	१०००००	१०	०	०	०
यांस पत्र कीं तुह्मीं रा० दुर्जन सिंग राजे याजपासीं बदकबर्दीस होते; त्यास गैतलसिंगांचा कौल होतांच ऐकून त्यासी पुसोन जाऊन राज्यीं बसोन कारभार करितां ह्मणून हुजूर विदित जाहलें. त्याजवरून सरकारची नजर आऊदसिंग कुंवर पहाडसिंग	५००००	५	०	०	१
मोठा पाहाडवी मौजे अवलीबारे	२०००	०	२५	२	०
काळु पाहाडवी मौजे काळवी प्रांत राजपिंपळें	२०००	०	२५	२	०
सबळसिंग संस्थान अली	५००००	५	०	०	०
रायसिंग राऊळे संस्था मोहन	५००००	५	०	०	०
दलेलसिंग संस्थान आख्याणी	५०००	०	२५	४	०
अजबसिंग संस्थान वाल्हेर	३०००	२	२५	०	०
डोंगरा व सोवा व बाबल्या व सोवा मौजे सागवडे प्रांत राजपिंपळे भील	१००००	०	५०	०	०
मोटा बरसदा गीतसा परगणें बालवाड	५०००	२	०	०	०
कानोजी सुरते वगैरे गीरासे सुरत अठाविसी	२०००	५	०	०	०
	२७५०००	३४	१५०	८	१

येणेंप्रमाणें नक्त रुपये दोन लक्ष एकुणऐंशी हजार व घोडे रास चौतीस व ह्मैसी सर दीडशें व हत्ती नग एक व चितळे ८ करार केली असेत. तरी सदरहुप्रमाणें मल्हार राम पेठे याजबरोबर हुजूर पाठवून देणें ह्मणोन सनदा ११.

इ. स. १७५४–५५. खमस खमसेन मया व अलफ. साबान २३.

[२२७] राजाराम प्राणनाद बसवापट्टणकर याचे नांवें जाब दिल्हा कीं तालुके बसवापट्टण येथील सालमजकूरची खंडणी रुपये ४०००० चाळीस हजार जाली. त्याचा वसूल येणेंप्रमाणें रुपये:–

२४००८।।।= जमा पोता होन वगैरे. १५९९१८= जमा परभारें वराता (फाटलें आहे). एकूण ४००००. येणेंप्रमाणें ऐवज सर (फाटलें आहे) जाला. मजुरा असे ह्मणून (फाटलें आहे) लेहून दिल्हा असे १.

इ. स. १७५४–५५. खमस खमसेन मया व अलफ. साबान ११.

[२२८] नारो शंकर यांचे नांवें सनद कीं, तुह्मीं विनंति केली कीं, वोडसेकर राजानें आपली प्रतिनिधि आमचे चिरंजीवाचे नांवें दिल्ही आहे. शंभर स्वारांनिसीं चाकरी करावी. तैनातीमध्यें दहापांच गांव दिल्हे आहेत. त्याप्रमाणें स्वामींनीं कृपाळु होऊन सरकारांतून करार करून द्यावी ह्मणून. त्यावरून मनास आणून वोडसेकर राजाची प्रतिनिधि करावयाची आज्ञा तुह्मांस केली असे. तैनात रुपये १०००० जातीची तैनात. २०००० राऊत शंभर एकूण ३०००० तीस हजार रुपये करार केले असेत. वोडशाचे राजाची प्रतिनिधि करावी. त्यांणीं

---

(226) The chiefs of Raj-pipla and other places, as also the Bhils used to carry of cattle, and levy Giras at their pleasure. Orders were issued that a cess should be levied through the agency of a Karkoon deputed by Government for the purpose, the following Nazars were imposed.

A. D. 1754-55.

1 Pratap Sing, for succeeding to the Sansthan of Rajpipla	Rs.	1 Lac.
2 Sabalsing Sansthan of Ali	Rs.	50 thousand.
3 Raysing Raul Sansthan of Mohan	„	50 „
4 Dalel Sing Sansthan of Akrani	„	5 „
5 Ajab Sing Sansthan of Walher	„	3 „
6 Dongra Wasowa and Bablya Wasowa Bhil of Mauze Sagwade in Prant Rajpipla	„	10 „

(227) The Taluka of Baswa Pattan having been invaded, a tribute of Rs. 40000 was imposed.

A. D. 1754-55.

(228) The office of Pratinidhi was conferred by the Raja of Wodse on Naro Shankar's son. Naro applied for Peshwa's permission for his son to accept the office. The permission was granted, subject to the condition that if the salary granted by the Raja exceeded Rs. 30,000 the excess should be made over to the Government.

A. D. 1754-55.

गांव दिल्हे असतील त्यांचा आकार व आणखी जे देतील तो ऐवज जमा करून त्यापैकीं सदरहु तीस हजार बाद होऊन बाकी जे राहतील ते सरकारांत द्यावे. हिसेब कच्चा आणून समजावा. या सदरहु तैनातेपुरता त्यांणीं ऐवज न दिल्हा, बाकी राहिला तो हुजुरून द्यावा, ऐसी रदबदली केली तरी देणार नाहीं; ह्मणून सनद १.

[२२९] संस्थान उदेपूर येथें नाथजी व राणाजीचा हर्षामर्ष होता, त्यास नाथजी हुजूर आले होते व जेतसिंग व खुमानसिंग दिमत राणाजी हुजूर येऊन नाथजीची समजाविसी करून घेऊन गेले. सबब राणाजीकडे नजराणा करार केला सन खमस खमसेन मजकूर रा० जयाजी शिंदे मुक्काम दिल्लीनजीक सालेमार बाग छ १ रमजान रुपये २५००००१. तपसील:—

इ. स. १७५४–५५.
खमस खमसेन
मया व अलफ.
रमजान १.

१५००००० सन खमस साल मजकूर (७००००० आश्विन शुद्ध १०. ५००००० माघ शुद्ध पौर्णिमा. ३००००० ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदा. एकूण १५०००००) १००००००१ सन सीत खमसेन (५००००० माघ शुद्ध प्रतिपदा, ५००००१ आषाढ शुद्ध प्रतिपदा एकूण) २५००००१ येणेंप्रमाणें पंचवीस लक्ष एक रुपया करार केला. याच्या मुदतीप्रमाणें रा० जयाजी शिंदे याजवर वराता कराव्या. ऐवज उदेपुरीं घ्यावा. येणेंप्रमाणें करार.

[२३०] मानाजी पायगुडे यांस पत्र कीं, दायमखान पठाण सवदागर याजपासोन रा० राजे अमानसिंग व दिवाण हिंदुपत बुंदेले यांणीं हत्ती साहा किंमत रुपये ५४१०० चौपन हजार एकशें यासी खरेदी केले. यांचा हवाला शंकराजी अनंत दिमत गोविंद बल्लाळ यांसी देऊन सवदागराची निशा कागदीं पत्रीं करविली; त्यास मुदतीप्रमाणे शंकराजी अनंत यासी रुपये बुंदेले यांणीं न दिल्हे. तेव्हां सवदागरास रुपये पावणें कळतच आहे. त्यास येविसीं ताकीद करून रुपये वसूल होत तें करावें, आणि सदरहु रुपयांपैकीं सरकारचे नजर रुपये ७००० सात हजार घ्यावे, ह्मणोन शिवराम भास्कर वकील दिंमत दायमखान मजकूर यांणीं अर्ज केला त्याजवरून तुह्मांस लिहिलें असे; तरी तुह्मीं बुंदेले यांसी तगादा करून पेशजी बुंदेले यांचा व सवदागराचा करार मदार असेल त्याप्रमाणें हिशेब करून व्याजसुद्धां चौपन हजार रुपये वसूल करून घेणें. पैकीं सरकारची नजर सात हजार रुपये घेऊन बाकी रुपये शंकराजी अनंत यांचे विद्यमानें सवदागराचे पदरीं घालणें ह्मणोन पत्र १.

इ. स. १७५४–५५.
खमस खमसेन
मया व अलफ.
रमजान २८.

(229) A dispute having arisen between Ranji and Nathji of Sansthan Udepur, the latter came to the Huzur in person, as also Jet Sing and Khumansing on behalf of the former. A reconciliation was effected between the parties, and a Nazarana of Rs. 250000 was ordered to be levied from Ranaji.

A. D. 1754-55.

(230) The order is dated 1st Ramjan San Khamas Khamsen 1754–55 at Salemar garden near Delhi. Surety Jayaji Sindai.

A. D. 1754-55.

इ. स. १७५४–५५. खमस खमसेन मया व अलफ. सवाल २०.

[२३१] नारोशंकर यांस पत्र कीं वृंदावनदास व बाळ गोविंद साहुकार याचें कर्ज राजे बीजे बहादर सेवडेकर यांजकडे रुपये १७०००० एक लाख सत्तर हजार रुपये आहेत, ते देत नाहींत. याकरितां हें पत्र तुह्मास सादर केलें असे. तरी राजे मजकूर यांस ताकीद करून रुपये वसूल करून देविणें. वसूल होईल त्यापैकीं सरकारची चौथाई घेऊन बाकी ऐवज साहुकाराचा गुमास्ता सीतळदास याजवळ ऐवज देणें ह्मणोन पत्र १.

इ. स. १७५५–५६. सीत खमसेन मया व अलफ. रमजान १४.

[२३२] शिदापा शेट्या वीरकर यास आज्ञापत्र कीं नगरशेट वोडशेकर याचे कर्ज सावतसिंग संस्थान वोडसें याजकडे येणें, रुपये ३६३४०२ तीन लाख त्रेसष्ट हजार चारशें दोन रुपये येणें; यासी व्याज दरमाहे दरसद्दे रुपये ·।।।· पाऊण प्रमाणें करार करून राजानें खत लेहून देऊन फुट जहागीर गांवाचा तनखा गांव ३१. एकूण तनखा बरहुकूम पट्टा रुपये १०५१८८ एक लाख पांच हजार एकशें अठ्याऐसी रुपये, पैकीं राजास खर्चास द्यावे सतरा हजार; बाकी तनखा अठ्याऐसी हजार एकशें अठ्याऐसी रुपये; पैकीं शिबंदी माहालीं खर्च व सरकारच्या असाम्या नेमून दिल्ह्या आहेत तो ऐवज जाऊन बाकी निवळ राहील त्याची कमावीस तुजकडे सांगितली आहे. सदरहुप्रमाणें वसूल करून नगरशेटीस रद्द कर्जांत ऐवज देणें. त्याचा चौथाई हिस्सा सरकाराचा येणें तो घेऊन जमा करणें, आणि सरकारांत पावता करून कबज घेणें. चौथाईचा ऐवज देशीं पुण्यास पावेल त्यास हुंडणावळ हिंदुस्थानचे शिरस्तेप्रमाणें मजुरा दिल्ही जाईल. याखेरीज रोजाचा ऐवज राजाकडे तीन हजार रुपये येणें त्याबद्दल मौजे खेरगांव तर्पे बांद परगणें व्हरी हा गांव दरोबस्त सरकारांत घेऊन कमावीस तुजकडे सांगितली आहे. इमानें इतबारें वर्तोन अंमल करणें. गांवची लावणी टुपणी करून ऐवज जमा करून सरकारांत पावता करणें. तुजला तैनात सालीना रुपये पांचशें करार केले आहेत. जहागिरीचा ऐवज वसूल होईल त्यांत समाईक ऐवजीं घेत जाणें. बाळाजी कृष्ण फडणीस व राघो मोरेश्वर निसबत सखाराम भगवंत यांची असामी करून अलाहिदा सनदा सादर आहेत त्याप्रमाणें समाईक ऐवजीं देत जाणें ह्मणोन पत्र १.

A. D. 1754-55.

(231) Dayam Khan Pathan, a merchant sold six elephants for Rs. 54100 to Raja Amansing and Diwan Hindupant Bundele. The money was not however paid, and the merchant's agent petitioned for its recovery, offering a Nazar of Rs. 7000 for the purpose. Orders for the recovery of the amount were issued.

A. D. 1754-55.

(232) Naro Shankar was ordered to recover a debt of Rs. 170,000 due by Raje Bije Bahadur to merchants Wrindawandas and Balgovind, and to take a fourth of the amount for Government.

[२३३] हरबाजी कृष्ण कमाविसदार संस्थान चंदेरी याचे नांवें सनद कीं संस्थान मजकूर येथील मामल्याचा ऐवज सालमजकूरचे राजानें वसूल द्यावा याप्रमाणें चालत आहे, त्यास पेस्तर सालापासून तीस हजारांचे गांव सदरहू मामल्याचे ऐवजीं सरकारांत घ्यावा; याप्रमाणें करार केला असे. याजमुळें शिबंदी जाजती पाहिजे. ऐशास तीस हजारांचे वसुली गांव राजापासून नेमून घेतल्यावर वसूल होऊं लागला तरी शिबंदीची नेमणूक तुह्मांस पेस्तर साल सन सबा पासून दरसाल रुपये ६००० साहा हजार करार केले असेत. याखेरीज हुंडणावळ व व्याज व रसदेचा मुशाहिरा पेशजीप्रमाणें दिल्हा जाईल. जर गांव तोडून दिल्हे नाहीं तरी शिबंदी पेशजीप्रमाणेंच करार असे ह्मणोन रसानगी यादी सनद १.

इ. स. १७५५–५६.
सीत खमसेन
मया व अलफ.
जमादिलावल२९.

[२३४] कर्जपट्टी विंध्याद्रि पर्वतामध्यें राजे व गिराशे आहेत ते नानाप्रकारचे मुलकांत उपद्रव करतात; सरकारांत रुजू होत नाहींत; सबब कर्जपट्टी करार करून मल्हार राम पेठे पाठविले आहेत. यांजबरोबर ऐवज हुजूर पाठवून देणें; व तिकडील अपूर्व चीज घोडे वगैरे पाठविणें ह्मणोन पत्रें लिहिलीं असेत. तपशील:—१००००० प्रतापसिंग राजा संस्थान राजपिंपळे. ५००० दलेलसिंग राजा संस्थान अखराणी. ३००० अजबसिंग राजा संस्थान वाल्हेर. ५०००० पाहाडसिंग राजा संस्थान बडवाणी. ५०००० सबळसिंग राजा संस्थान अलीकर राठोड. ५०००० रामसिंग राऊळ संस्थान मोहन. २००० कान्होजी सुरते गिरासे वगैरे. १०००० भडोचचा मोंगल.

इ. स. १७५५–५६.
सीत खमसेन मया
व अलफ.
रमजान २.

भिल्लः—१०००० डोंगड्या वासवा व बाबज्या वासवा वस्ती सागवडे. २०००

(232) Raja Sawatsing of Sansthan Odase owed Nagar Shet of Odase Rs. 363402. The rate of interest was 0–12 annas per hundred per month. A portion of the Raja's territory was attached for the liquidation of the debt. One fourth of the amount of debt recovered was ordered to be credited to Government.

A. D. 1755-56.

(233) A sanad to Harbaji Krishna Kamavisdar of Chanderi. The revenue of the Mamla of the said Sansthan, is being paid by the Raja of the Sansthan to Government. It is agreed that in lieu of it, villages of the value of Rs. 30,000, should be ceded by him to Government.

A. D. 1755-56.

(234) The Rajas and Girasis, residing in the Vindyadri range of hills, oppress the country in various ways, and do not submit to the authority of Government. The following levy (Karjipatti कर्जपट्टी) is therefore imposed upon them. Malhar Ram Pethe is sent with instructions to remit it to the Huzur together with such articles horses &c. as may be peculiar to the Province.

A. D. 1755-56.

आंबलीबोर याचा मोट पाहाडवी. २००० काळु पाहाडवी परगणे वाल्हेर. ५००० मोल्हबा सद्रा गिरासा परगणे बलवाड वस्ती मांडवी.

५०००० निंबाजी व्यास व सातीदास बक्षी व मीठा सेहेता राजपिंपळेकर हे तिघेजण मिळोन. एकूण ३३९०००. रसानगी कृष्णराव पारसनीस.

इ. स. १७५५–५६.
सीत खमसेन
मया व अलफ.
रमजान ४.

[२३५] सर्ज्या हणमापा नाईक संस्थान तरीकिरें याचे नांवें सनद कीं खासा स्वारी या प्रांतें जाहाली, सबब संस्थान मजकूरची या सालची खंडणी ऐन देखील मसाला मिळोन रुपये ४५०१ ऐन, ५०० मसाला, मिळोन एकूण ५००१ पांच हजार एक रुपया करार केला; तो ऐवज रा॰ विसाजी कृष्ण यांचे गुजारतीनें सरकारांत जमा जाहला असे. तुह्मीं आपली खातरदास्त राखोन सुखरूप राहणें. जाजती उपसर्ग लागणार नाहीं ह्मणोन जाब व कौल रसानगी यादी कौल १.

सदरहु पांच हजार रुपये विसाजी कृष्ण यांणीं सरकारांत ज्येष्ठअखेरपर्यंत द्यावे येणेंप्रमाणें करार करून हवाला घेतला असे. रसानगी यादी.

इ. स. १७५५–५६.
तीसा खमसेन
मया व अलफ.
रबिलाखर ३.

[२३६] संस्थान सेवडे येथील साल मजकूरची रसद रुपये १००००० एक लक्ष करार केले ते पथक दिमत रा॰ महादाजी अंबाजी यांजकडे देविले. ते त्यांस गणेश महादेव बिवलकर यांचे गुजारत मार्गशीर्ष शुद्ध अष्टमीस पावले. सरकारांत जमा जाले असेत ह्मणोन नारो शंकर यांस जाब १

1,00,000 Pratapsing, Raja of Sansthan Raj-pipla.
5,000 Dalelsing, Raja of Sansthan Akhrani.
3,000 Ajabsing, Raja of Sansthan Walher.
50,000 Pahadsing, Raja of Sansthan Badwani.
50,000 Sabalsing, Raja of Sansthan Alikar Rathod.
50,000 Raysing, Rawal of Sansthan Mohan.
2,000 Kanhoji Surate Girasis.
10,000 The Mogal of Broach.

Bhils.

10,000 Dogadya Waswa and Bablya Waswa resident of Sagwade.
2,000 Mot Pahadavi of Ambli Bore.
2,000 Kalu Pahadavi of Pargana Walher.
5,000 Molhaba Sadra Girasi of Pargana Balwad, resident of Mandwi.
50,000 Nimbaji Vyas, Sathidas Baxi, and Mitha Lohata of Rajpipla, conjointly.

3,39,000

(235) The Peshwa having personally visited the Sansthan of Taripkire, a tribute of Rs. 5001 was imposed.
A. D. 1755-56.

(236) A tribute of Rs. 100000 was imposed on Sansthan Shewade.
A. D. 1755-56.

[२३७] रा० प्रीतीसिंग राजे बुंधेले यांणीं आपला पुत्र वडील दिवाण नारायणजी यास बाहेर घातलें आहे. ऐशास राजानें वडील पुत्रास बाहेर घालवें, विभाग न द्यावा, हे गोष्ट उचित नाहीं. याजकरितां तुह्मी राजास माकूल करून परस्परें पितापुत्रांची समजावीस होय ते गोष्ट करणें. उभयतांचें रसायन [सौरस्य?] न होय, समजावीस न पडेच, तरी नारायणजीस पंधरा हजारांची जागा कमाल तोडून देवणें आणि कलहास न प्रवर्तत ते गोष्ट करणें ह्मणून बाळाजी गोविंद यांचे नांवें सनद १ रसानगी यादी.

इ. स. १७५७–५८. समान खमसेन मया व अलफ. मोहरम १६.

[२३८] आपाजी हरि किल्ले धोडप वगैरे यांचे नांवें सनदा संस्थान जवार येथील राजे कृष्णशा वगैरे लोक यांसी तुह्मांकडे पाठविले आहेत यांसीः—कित्ता असामी यांसी रोजमरा दीडमाही रुपये, २०० कृष्णशा राजे देखील शागीर्दपेशा. ३० झुंजारराव कोथे. ३९ कदंबराव राजकुवर. ३० येशजी मुलाणे. ३० हरिराम सातपुते. ३० जिवाजी बांडे. ६० महादजी सरनाईक. ६० देवजी अवधूतराव. ३० निंबाजी मिशाळ. २० नेवाजी जुमलेदार. ३० त्रिंबक भानजी. २० गंगाधर शंकर मजमदार. २० यशवंतराव जिवाजी. ३९ लक्ष्मणराव राजकुंवर. ५० आनंदराव जावले. एकूण ७००.

इ. स. १७५८–५९. तीसा खमसेन मया व अलफ. रजब २४.

कित्ता असामी कोळी नाईकवाडी वगैरे मर्द माणूस चांगले पाहून करार करून ठेवणें. त्यांस तैनात बारमाही शिरस्ता दरमाहे रुपये, ८० जकातदार असामी १० दर ८ प्रमाणें. ७० प्रत असामी १० दर ७ आणे प्रमाणें. ४८० प्रत असामी ८० दर ६ प्रमाणें, एकूण ६३०.

शंभर माणूस यांसी दरमाहा तैनात साहेब तीस असामी करार करून दिल्हे असेत. करार होतील त्या तारखेपासून कबजाचा आकार करणें कलम १.

येणेंप्रमाणें सोळा असामी यांसी दीडमाही सातशें व शंभर माणूस यांसी दरमाहा साहाशें तीस करार करून दिल्हे आहेत सुभे मजकुरीं चाकरी घेऊन तैनात पावीत जाणें.

---

(237) A Sanad to Balaji Govind. Pritesing Raje Bundhele has turned out his eldest son Diwan Narayenji. It is improper that a king should turn out his eldest son, and deprive him of any share in the kingdom. You should therefore, by using your influence with the Raja, arrange to effect a reconciliation between him and his son. In case that cannot be done, you should have a territory worth Rs. 15,000 assigned to Narayenji, and should take such further steps as may prevent their resorting to arms in the matter.

A. D. 1757-58.

(238) Sanads to Appaji Hari of fort Dhodap. Krishna Sha Raje and others of Sansthan Jawar are sent to you. They should be given remuneration at the following rate per month and a half.

A. D. 1758-59.

तुह्मांकडील तालुक्याशीं लोक हशम असामी:—२००० पेशजी नेमणूक हुजुरून जाहली आहे. (१५०० बरहुकूम गुदस्त. २०० घोडप. २५० माची किल्ले घोडप. ३०० चांदवड. २५० रामसेज. १७५ हातगड. ५० काळेपखर. २७५ सुभा. एकूण १५००.)

५०० कित्ता नेमणूक:—इब्राई, कन्हा, पेहर, कंचना, ठाणें, सुरगांव, ठाणें गाढीं एकूण ५००.

३०० साल मजकुरीं नेमणूक २०० ठाणें जवार. १०० कित्ता. एकूण ३००.

२३०० येणेंप्रमाणें दोन हजार तीनशें लोक करार करून दिले आहेत यांसी नेमणूक:—

२२५० तुह्मीं सुभे मजकुरीं ठेवणें:—२००० बरहुकूम रुजु गुदस्त, २५० जाजती साल मजकुरीं नेमणूक नवे ४६९ ठेविले आहेत त्यांपैकीं चांगले पाहून ठेवणें. एकूण २२५०.

५० किल्ले माहुली पैकीं नामजाद, त्याचा रोजमरा अडीसेरी तिकडून पावेल.

येणेंप्रमाणें दोन हजार तीनशें माणूस पैकीं हुजुरून देविले ५०, बाकी दोन हजार अडीचशें माणूस तुह्मीं सदरहुप्रमाणें ठेऊन तैनात सुभे मजकूरचे ऐवजीं पावीत जाणें ह्मणोन याद सनद.

देवस्थानें खंडेराव व पीर वगैरे यांस कदीम नैवेद्य व दिवावत्तीस तेल सुदामत प्रांत शंकराजी केशव यांणीं चालविलें आहे. तेणेंप्रमाणें चौकसी मनास आणून पेशजीप्रमाणें चालवीत जाणें. कलम १.

जवार वाघेरा येथील ब्राह्मण व कारकून मंडळी यांचीं वर्षासनें व शेतें गांव इनाम व असाम्या सुदामत चालत आहे त्याची चौकसी करून भोगवटा असेल त्याचा जाबता आकारून हुजूर पाठवणें. मग आज्ञा होईल तेणेंप्रमाणें वर्तणूक करणें. कलम १.

जवारकर व वावरेकर कोळी यांचे गांव इनामाचे व शेतें वगैरे मोकासे पूर्वापार चालत आहेत त्यांची माहीतगिरीनें चौकसी करून त्याचा जाबता आकारून हुजूर लेहून पाठवणें. मग आज्ञा होईल तेणेंप्रमाणें वर्तणूक करणें. कलम १.

प्रांत गाढीकडे जाणें जाहल्यास बराबर कुमक रामनगरकर, व वासदेकर, व पेठकर वगैरे कोळी सुद्धां न्याल, त्यास कामें पाहून मनुष्य नेत जाणें. काम असेल तों पाटास हजीरी घेऊन दर असामीस शेर व तंबाकु पैसाभार देत जाणें. काम जाहली (यावर) निरोप देणें. कलम १.

येणेंप्रमाणें चार कलमें करार करून दिल्हीं असेत. सदरहु प्रमाणें वर्तत जाणें.

कर्णाजी शिंदे नामजाद व कारकून किल्ले माहुली यांसी पत्र ऐसेजे, तुह्मांकडून ठाणें जव्हार निसबत रा० आपाजी हरि याजकडे हशमी लोक असामी ५० पन्नास नामजाद देविले असे. त्यास ठाणें मजकुरीं लोक सदरहु पाठवून देणें. त्यांस रोजमरा व अडसेरी किल्ले मजकूरचे ऐवजीं पावीत जाणें ह्मणून पत्र १.

आपाजी हरि याचे नांवें सनद कीं आनंदराव शिंदे यांस तैनात दरमाहा रुपये.

६१ खाशास (रुपये ३० जातीस देखील घोडे, १५ स्वार १, ५ आफतागीरा १, ८ पोरगे २, ३ दिवट्या १ एकूण ६१) १२ केसो महादेव कारकून १ एकूण ७३.

एकूण सात असामी यांसी दरमाहा तैनात बारमाही शिरस्तेप्रमाणें रुपये त्र्याहात्तर करार केले. तुह्मांकडे पाठविले आहेत. याचे हातून चाकरी घेऊन तैनात सुभेमजकूरचे ऐवजीं पावीत जाणें. व्याजखेरीज आफतागीराचे सामानाबद्दल एकसाला दिवटीस तेल दरमाहा वजन ८८३॥। मापी रुपये १०.

येणेंप्रमाणें दहा रुपये एकसाला व तेल दरमाहा वजन पक्के पावणे चार शेर करून दिल्हें असे. पावीत जाणें ह्मणोन रसानगी यादी सनद.

इ. स. १७५८–५९. तीसा खमसेन मया व अलफ. जमादिलाखर १७.

[२३९] नरसिंह नायडू संस्थान गुमनाड पाले (?) यांस कौल लेहून दिल्हा कीं या प्रांतें स्वारी जाहली सबब तुह्मांकडील तालुक्याची खंडणी करार रुपये:–२७०७८।= बाकी साल गुदस्त; ४८००१ साल मजकूरची खंडणी (३२००१ ऐन खंडणी, १५००० नजर, १००० मसाला) एकूण ४८००१, एकूण ७५०७९।=. यासी मुदती:–३७५०० तूर्त द्यावे, १८७५० छ १ रजबीं, १८८२९।= छ १ साबानीं.

७५०७९।= एकूण पंचाहत्तर हजार सवा एकुणऐसीं रुपये चवल सदरहू मुदतीबमोजीब करार केले असेत. तरी मुदतींत ऐवज सरकारांत पावता करून पावलीयाचे जाब घेऊन तुह्मीं आपल्या तालुक्याची लावणी संचणी करून सुखरूप राहणें. जाजती उपसर्ग लागणार नाहीं. अभय असे. ह्मणोन कौल १.

[२४०] कामगती कस्तुरी रंगापा नाईक रामेदकीरी नाईक राजे संस्थान चित्रदुर्ग यांचें नांवें कौल लेहून दिल्हा कीं, तुह्मांकडील रा० मेदगिरी आपा व पुरुषोत्तम तमाजी हुजूर आले. यांणीं कितेक तुमचे एकनिष्ठेचा मजकूर सांगितला त्याजवरून विदित जाहला. सालमजकूरचे खंडणीची आज्ञा केली, त्याजवरून यांणीं मुलकाचे नातवानीचा व संस्थानच्या कसाल्याचा मजकूर विदित केला. याजवरून तुमचे निष्ठेवर व मुलकाचे नातवानीवर नजर देऊन सालमजकूरची खंडणी करार रुपये:–३५०१०१ ऐन खंडणी ५०००० दरबार खर्च ४००१०१ एकूण चार लक्ष एकसें एक रुपया. यासी मुदती:–२००००० चैत्र अखेर, २००००१ ज्येष्ठ अखेर,

इ. स. १७५९–६०. सीतेन मया व अलफ. साबान २.

---

200 Krishna Raje including servants wages &c.

500 Other persons.

Service should be taken from these persons at the Subha. The management of Sansthan was taken from the Raja given in Kamavis to Appaji Hari (11th Rajab).

(239) The Sansthan of Gumnad Pale having been invaded, a tribute of Rs. 75,079 was levied.

A. D. 1758-59.

(240) Kamgatti Kasturi Rangappa Naik Ramed Kiri Naik, Raja of Sansthan Chitradurg, sent an agent to the Peshwa requesting that the tribute due by him might be fixed with due regard to the poverty of his Sansthan, and his loyalty to Government. The amount of

A. D. 1759-60.

येणेंप्रमाणें चार लक्ष एकशें एक रुपयांच्या मुदती सदरहु दोन करार केल्या असेत. मुदतीप्रमाणें ऐवज सरकारांत पावता करून पावलीयाचें कबज घेणें. त्याप्रमाणें मजुरा पडेल. जाजती उपसर्ग लागणार नाहीं. खातर जमा असों देणें. ह्मणोन कौल १.

इ. स. १७६०–६१ इहिदे सीतेन मया व अलफ. रविलावल २.

[२४१] संस्थान सातगड निसबत हिरास्तखान किल्लेदार याजकडे सन तीसांत गोपाळराव गोविंद व मल्हारराव भिकाजी यांचे स्वारींत खंडणी करार केली त्याचा वसूल येणेंप्रमाणें रुपये:—

१४१६४ जमा रा० स्वारी गोपाळराव गोविंद व मल्हारराव भिकाजी सन तीसांत.

३८३६ छ० मजकुरीं जमा परभारें गुजारत तिमाजी कृष्ण. १८७८ तिमाजी कृष्ण यांणीं गैरसनदीं खर्च केला तो मजुरा दिला. शिबंदी खर्च लिहून रुपये १९५८ देणें सिद्दी अंबर गाडदी दिमत गंगाधर परशराम यांस. एकूण ३८३६.

१८०००

एकूण अठरा हजार रुपये सदरहुप्रमाणें सरकारांत पावले असत ह्मणून जाब लिहून दिल्हा असे. जाब १. रसानगी यादी.

इ. स. १७६०–६१. इहिदे सीतेन मया व अलफ. जमादिलाखर २१.

[२४२] मेदगिर नाईक राजे संस्थान चित्रदुर्ग यांस कौल लिहून दिल्हा कीं तुह्मांकडून मेदगीरी आपा व श्रीनिवासराव बापुजी हुजूर आले, त्यांणीं तुमची एकनिष्ठता बहुत प्रकारें सांगितली व साल मजकूरचे खंडणीविसीं विनंति केली. त्यावरून तुमचे एकनिष्ठेवर नजर देऊन साल मजकूर खंडणी करार रुपये:—

४००००० ऐन खंडणी देखील जप्ती किल्लेसुद्धां.

७५००० परगणे हरिहर व बासवपट्टण व बुकापट्टण व सीरे येथील नाड तरवारकीचे (?) रुसूम व दुमाली गांव पेशजीप्रमाणें तुह्मांकडे करार करून नजरेचा ऐवज करार केला तो.

४७५००० यांस हप्तेबंदी २७५००० चैत्र शुद्ध १,२००००० ज्येष्ठ शुद्ध १, एकूण

the tribute was fixed at Rs. 4,00,101, Rs. 3,50,101 being tribute proper, and Rs. 50,000 on account of Darbar Kharch, and the Raja was informed that no further levy would be imposed.

A. D. 1760-61.

(241) The tribute of Rs. 18,000 imposed upon Sansthan Satgad, under Hira Satkhan Killedar, during the invasion of the province in (San Tisa) A. D. 1758–59 by Gopalrao Govind and Malhar Bhikaji, was received.

A. D. 1760-61.

(242) A Kaul to Medgiri Naik, Raje of Sansthan Chitradurg. Medgiri Appa and Shriniwasrao Bapuji, who came from you to the Huzur, spoke in high terms of your fidelity, and requested that

४७५००० चार लक्ष पंचाहत्तर हजार रुपये सदरहु मुदती बमोजिब करार करून रा० विसाजी कृष्ण व हरी गोपाळ यांजकडे देविले आहेत; तरी हप्तेबंदीप्रमाणें सदरहु ऐवज मशारनिल्हेकडे पावता करून पावलीयाचा जाब घेऊन सुखरूप राहणें. जाजती उपसर्ग तिळमात्र लागणार नाहीं ह्मणोन कौल १.

येविसीं विसाजी कृष्ण व हरि गोपाळ यांस पत्र कीं सदरहु हप्तेबंदीप्रमाणें ऐवज वसूल करून घेऊन पावलीयाचा जाब देणें. जाजती उपसर्ग काडीमात्र न देणें व मशारनिल्हेस सालाबाद बहुमान पावत असेल त्याप्रमाणें देणें ह्मणोन पत्र १. रसानगी यादी १.

इ. स. १७६०–६१.
इहिदे सीतेन मया व अलफ.
जमादिलाखर २२.

[२४३] विसाजी कृष्ण व हरि गोपाळ यांस सनद कीं मेदगीरी नाईक राजे संस्थान चित्रदुर्ग यांजकडेस सन सबाचे खंडणीपैकीं बाकी पाऊण लक्ष रुपये येणें, त्यास बळवंतराव गणपतराव यांणीं इरकुरे व बहीरवतिदी व तजमीरे हीं तीनही ठाणीं रायदुर्गकरापासून घेऊन संस्थानिकास द्यावीं आणि बाकीचा ऐवज सरकारांत द्यावा याप्रमाणें करार केला आहे. ऐसीयास तुह्मीं सदरहु तीन ठाणीं रायदुर्गकरांपासून घेऊन संस्थानिकांस देऊन बाकीच्या ऐवजाची निशा करून देणें. कदाचित् ठाणीं घेऊन संस्थानिकास न दिल्हीं तर बाकीच्या ऐवजाचा तगादा संस्थानिकास न करणे ह्मणोन सनद १. रसानगी यादी.

इ. स. १७६०–६१.
इहिदे सीतेन मया व अलफ.
रजब २१.

[२४४] मोहनकुंवर राणी जवारकर यांणीं हुजूर येऊन विदित केलें कीं, कृष्णशा जवारकर याणें सरकारचा ऐवज शंकराजी केशव यांजपासून घेतला तो द्यावयाबद्दल साहुकारापासून कर्ज घेऊन पाठवून देईन. साहुकाराकडे कर्जाबद्दल ××× गहाण दिला होता व साहुकारास शंकराजी केशव यांणीं सरकारचें उगवणीपत्र दिलें होतें, त्याजवर कृष्णशाहानें कल्हई केली ते

---

the amount of the contribution of current year might be fixed with due regard to your loyalty. Government is pleased to fix the contribution as under:—

4,00,000 Net contribution.

75,000 The nazar fixed for the continuance of your haks over the Parganas of Harihar, Basawapatan, and Bukapatan and Sire.

&c. &c. No further levy shall be made.

A. D. 1760-61.

(243) A Sanad to Visaji Krishna and Hari Gopal. The contribution due from Medgiri Naik, Raja of Sansthan Chitradurg, for the year of (San Saba) A. D. 1756-57 is in arrears. It has been agreed with Balwantrao Ganput, that the post of Irkura, Bahirao Tipi and Tajmira should be taken from Rayadurg and handed over to the Sansthan, and that the Sansthan should give security for the payment of the arrears.

A. D. 1760-61.

(244) A Sanad to Appaji Hari:—Krishna Sha Jawarkar, obtained a loan from the Government, through Shankaraji Keshav, and to repay it, he raised another loan from certain bankers, pledging

समयीं त्याचा मुलुक सरकारांत जप्त केला. त्याजवर सदरहु कर्जाचा ठराव बारा हजार रुपये केले. त्यांचे हप्ते दरसाल रुपये २५०० अडीच हजार प्रमाणें पांच साला इस्तकबील सन सीतेन तागाईत सन अर्बा सीतेन पावेतों साडे बाराहजार रुपयांचे ऐवजीं परगणे मजकूर तुह्मांकडे कमावीस सांगोन साहुकाराचे हवाले तुह्मांकडे दिले होते. त्यास सन सीतेन व साल मजकूर दोन सालें तुह्मांकडे अमल होता. पुढें तीन सालें राहिलीं. तीं आपण कराराप्रमाणें दरसाल अडीचहजार रुपये प्रमाणें देऊन मागील दोन सालांचे पांच हजार रुपये पैकीं कमी ऐवज परगणे मजकूरचा आकारला असेल तो रुजवातीमुळें ठरेल तो तोटा व पुढील ऐवज साहुकारास देऊं ह्मणोन करार केला. त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें आहे. तरी पेशजीचे कराराप्रमाणें इस्तकबील सन इसन्ने सीतेनापासून अर्बा सीतेनापावेतों तीन सालें दरसाल रुपये अडीच हजार प्रमाणें व मागील दुसाल्याचे पांच हजार पैकीं कमी ऐवज परगणे मजकूरचा आकारला असेल त्याचे तोटीं याचा ऐवज सुद्धां साहुकारीं निशा करून दिल्यास परगणे मजकुरीं राणीचे हवाला ठाणेंसुद्धां करून पावल्याचें कबज घेणें ह्मणोन आपाजी हरी यांस छ २१ रजब रसानगी यादी लष्कर सनद १.

२०१८॥- तागाईत सन खमसेन मक्ता ५०७९।-॥ पैकीं गांवाकडेस येणें ते.

५९४॥ सन बादबाकीपैकीं सालमजकुरीं सरकारांत द्यावयाचे करार केले होते.

२६१३८-

पैकीं सन बाद बाकीचे ऐवजीं सोड रुपये १३१३८- एक हजार तीनसें तेरा रुपये दुवल सोड दिली असे. बाकी राहिला ऐवज रुपये १३०० एक हजार तीनसें यासी उगवणी सालें रुपये:—३२५ सालमजकुरीं सन इहिदेंत देणें, ३२५ सन इसन्ने खमसेन, ३२५ सन सलास खमसेन, ३२५ सन अर्बा खमसेन. येणेंप्रमाणें एक हजार तीनसें बाकीचे राहिले आहेत. याची उगवणी सदरहुप्रमाणें सालाचे सालांत करून पावलीयाचे जाब घेणें. तेणेंप्रमाणें मजुरा असे. याखेरीज सालमजकुरचे खंडणीचा ऐवज पेशजीं करार करून कौल सादर केला आहे. त्याप्रमाणें सरकारांत उगवणी करून सुखरूप राहणें ह्मणून सनद १.

इ. स. १७५०–५१. इहिदे खमसेन मया व अलफ. जिल्हेज ३०.

[३६६] खंडोजी माणकर प्रांत राजपुरी यास पत्र कीं, द्वारकाबाई टुली इच्या दादल्याकडे सरकारची भातबाकी येणें आहे; ह्मणोन आह्मी गुरें पेशजी सरकारांत आणिलीं आहेत. त्यांपैकीं हल्लीं जिवंत गुरें असतील तीं माघारीं देविलीं असेत देणें ह्मणून सनद १.

---

(365). A sanad to the village of Pachora Pargana Wani. You come to the Huzur at Poona, and representing your inability to pay the revenue due, prayed that both in the interests of the village and of the Government, a portion of the arrears might be remitted. Taking into consideration your poverty and failure of your crops, Government is pleased to remit Rs. 1313-1 out of the amount due. The remaining amount of Rs. 1300 shall be paid by instalments.

A. D. 1750-51.

(366). A sanad to Khandoji Mankar. An arrear of rice being due from the husband of Dwarkabâi Tulli, his cattle was formerly attacked by Government. Permision is now given to restore to him such of the cattle as may be living.

A. D. 1750-51.

[३६७] आटगांव तर्फ खर्डी प्रांत जवार येथील पांच सालां मक्ता सन खमसेनापासून सन अर्बापावेतों हुजुरून करार करून दिल्हा आहे. त्यास चढसुद्धां दोन सालें सरकारांत वसूल दिल्हा. सालमजकुरीं नापीक जाहालें आणि मक्ता भारी बसला. यास्तव रयत परागंदा होऊं लागली, दुसरें लष्कर कोंकणांत उतरलें; यामुळें जंगलांत आगी लागल्या. त्यामुळें दोचौं गांवचा शिवारही जळाला. ऐसें कित्येक प्रकारें नादारीचें वर्तमान तुह्मी व जमीदार तर्फ मजकूर यांणीं हुजूर येऊन विदित केलें. त्यावरून अर्ज खातरेस आणून व रयतेवर नजर देऊन मक्त्यापैकीं येणेंप्रमाणें सोड दिल्ही असे. रुपये ४०० सन इसन्ने मजकुरांत, ४०० सन सलास खमसेनांत, ४०० सन अर्बा खमसेनांत, एकूण बाराशें रुपये तीसाला मिळोन दरसाल चढाची बेरीज चारशें रुपयेप्रमाणें सोड दिल्ही असे. सदरहुप्रमाणें सालबेसाल मक्त्यापैकीं सोडखर्च लिहित जाणें. तेणेंप्रमाणें मजुरा असेत. बाकी बेरीज सालदरसाल सरकारांत वसूल देऊन तर्फ मजकुरची आबादानी करणें, ह्मणून आनंदराव शिंदे हवालदार किल्ले माहूर यास रसानगी याद. सनद १. येविसीं जमीदार तर्फ मजकूर यास सनद १.

इ. स. १७५१–५२.
इसन्ने खमसेन
मया व अलफ.
रजब १५.

[३६८] कसबें मुखेड परगणे पाटोदें सरकार संगमनेर हा गांव सालमजकुरीं बाणरायानें लुटिला व लष्करामुळें पायमाली जाहाली. याजकरितां सालमजकुरचे इस्तावयापैकीं सोड देऊन जमाबंदी कुलबाब कुलकानु मुकरर केले रुपये २००० दोन हजार करार केले असेत. उगवणी करून सुखरूप राहणें, जाजती आजार लागणार नाहीं. ह्मणून कौल जाहीराना लेहून दिल्हा असे, बरहुकूम यादी.

इ. स. १७५१–५२.
इसन्ने खमसेन
मया व अलफ.
रजब १९.

[३६९] महिपतराव कवडे यास पत्र कीं, आपाजी गणेश व जमीदार यांणीं अर्ज केला कीं, परगणे रायपूर बुधाटी या महालाची जप्ती सालमजकुरीं झाली. यामुळें गायकवाड यांनीं अदावत करून परगणा नागविला; त्यामुळें रयत परागंदा झाली. त्याहीमध्यें कोठें जुजवी वस्ती कांहींशी राहिली. ते, खासा स्वारीचा मुक्काम या परगण्यांत पंधरा सोळा दिवस जाहला याकरितां झाडून परगणा खराब झाला. तरी मुकासबाबेची जप्ती रयतेवर नजर देऊन माफ के-

इ. स. १७५१–५२.
इसन्ने खमसेन
मया व अलफ.
रजब १९.

(367). Owing to the encampment of troops in the Konkan, the Jungles of 2 or 3 villages caught fire, and crops were burnt. Remission was therefore granted.

A. D. 1751-52.

(368). The village of Mukhed in Pargana Patode of Sarkar Sangamner being this year pillaged by Bânaray, the revenue was remitted.

A. D. 1751-52.

लीया वस्ती होऊन पेस्तर सालाची लावणी होईल; ह्मणोन विनंती केली. त्यावरून मनास आणतां गायकवाड यांणीं अदावतीनें परगणा लुटून खराब केला. त्यावरी खासा स्वारीही प्रस्तुत होऊन पंधरा सोळा दिवस मुक्काम जाले. याकरितां उपसर्ग जाला. यामुळें मशारनिल्हेचा व जमीदाराचा अर्ज खातरेस आणून परगणे मजकूरच्या मोकासबाबेची जप्ती माफ केली असे. तरी तुह्मीं जप्तीचा तगादा परगणे मजकुरीं न करणें. ह्मणोन सनद १.

येविसीं पत्रें २. १ हरी दामोदर यांस १, देशमुख देशपांडे परगणे मजकूर यांस.

[३७०] सुबराव वेंकटेश यांस पत्र कीं, संस्थान बल्हारी येथील खंडणीच्या ऐवजीं तुह्मीं चोवीस हजार सहाशें रुपयांचा हवाला घेतला. त्यापैकीं तुह्मांकडे बाकी रुपये ६४०० साहा हजार चारशें येणें. व याखेरीज रा० विसाजी कृष्ण यांजकडील ताकितीस राऊत ४ हिरेहल्लीस नेले होते. त्यास, ते राऊत गांवकरी यांनीं मारिले व त्यांचीं घोडीं घेतलीं. त्याबद्दल घोडीयांचे रुपये १००० एक हजार करार केले ते. एकूण सात हजार चारशें रुपये येणें. ते रा० नारायणराव व्यंकटेश यांजकडे देविले असेत. किल्ले पराक्रमगड येथें ऐवज पावता करून कबज घेणें. ह्मणोन पत्र १.

इ. स. १७५२–५३. सलास खमसेन. मया व अलफ रजब २८.

[३७१] बहिरो राम कमावीसदार अगर जंजीरे रेवदंडा यास सनद कीं, जोरीजी फिरंगी याची वाडी जंजीरे मजकुरीं आहे. त्यास, तो टाकून परागंदा जाहला, तेव्हां वाडी सरकारची जाहाली. ते, सरकारांतून बाबजी कृष्ण उकीडवे यांस इजारा दिल्ही आहे. त्यास, वाडीमध्यें विहीर जुनी होती ते बाबाजी कृष्ण यांणीं बांधिली; त्यास सवाशें रुपये खर्च लागले आहेत ह्मणोन

इ. स. १७५१–५२. सलास खमसेन मया व अलफ. सवाल २.

(369). The Pargana of Raypur Budhati which was kept under attachment this year, was, through ill-feeling, pillaged by the Gaikwad. The Pargana also suffered much in consequence of the encampment therein of the Peshwa's army for 15 or 16 days. Remission was therefore granted.

A. D. 1851-52.

(370). Some horsemen sent for the recovery of revenue in Sansthan Bellari were killed by the villagers and their horses were taken away. Rs. 1000 were levied from the villagers as the price of the horses in question.

A. D. 1751-52.

(371). A Sanad to Bahiro Ram Kamavisdar Agar Fort Revdanda. Joriji(?) Portuguese who owns some land under the control of the fort has absconded. The land therefore vests in Government and should be left out to Babaji Krishna Ukidwe.

A. D. 1752-53.

मोरोजी शिंदे यांणीं हुजूर लेहून पाठविलें. त्यावरून तुह्मांस हें पत्र सादर केलें असे. तरी सरकारचे बागेंत विहीरीस खर्च लागला रुपये १२९ सवाशें तुह्मांस मजुरा द्यावयास आज्ञा केली असे. तरी बाबाजी कृष्ण यांजकडे सालमजकूरचा वाडीचा ऐवज येणें, त्यांत सदरहु सवाशें रुपये मजुरा देणें. ह्मणून सनद.

इ. स. १७५३–५४.
अर्बा खमसेन
मया व अलफ.
जिल्काद ४.

[३७२] अंताजी विठ्ठल कमावीसदार परगणे भेलसें यांस पत्र कीं, परगणे खामखेडें येथील कमावीस रा० सदाशिव त्रिंबक यांस साल गुदस्त आहे, त्याप्रमाणें सालमजकुरीं यांजकडे करार असे. त्यास परगणे मजकूरचे पाटील रयत पळोन तुमच्या परगण्यांत जातात, त्यांस समजाऊन नेणें असें तुह्मीं ह्मणतां, ह्मणोन हुजूर विदित जालें. ऐशास सरकारची बाकीसाकी घेऊन पळोन जातील हें कसें कामास येईल? याजकरितां ज्याचे परगण्यांतील रयत येईल त्यास ताकीद करून गांवचे गांवीं लाऊन देत जाणें. मौजे आठसीवर येथील माल भरून नेऊन गांव लुटिलांत ह्मणून कळलें. तरी यांचे गांवचे वाटेस एकंदर न जाणें ह्मणोन पत्र.

इ. स. १७५४–५५.
खमस खमसेन
मया व अलफ.
साबान ३.

[३७३] बहिरो राम परगणे करकंब यांस पत्र कीं, लक्ष्मण खराडा कुणबी मौजे कठापूर याजकडे सरकारची बाकी गल्ला येणें, त्यापैकीं सात खंडी जोरी सोळुलें मापें, त्याचा भाऊ करकंबेस शेत वाहातो, त्याजपासून खंडी ७ सात घेऊन सरकारचे हिशेबीं जमा करणें; ह्मणोन सनद १. रसानगी जनार्दन आपाजी.

A. D. 1753-54.

(372). A Sanad to Antaji Vithal Kamavisdar of Pargana Bhelse. The revenue farmer of the Pargana of Khamkhede last year was Sadashiv Trimbak, and he has also taken the farm for the current year. It is represented to the Huzur that the Patels and ryots of the said province absconded to your Pargana, and that you, when asked by Antaji to send them back to their villages, reply that they may be taken away with their consent. How can it be tolerated that persons owing revenue to Government should abscond? You are therefore directed to warn the Ryots of the said Pargana coming into your province, and to send them back to their villages.

A. D. 1754-55.

(373). A letter to Bahiro Ram Patel of Karkumb. Certain revenue (in kind) is due to Government from Laxaman Khurada Kunbi of Kathapur. A portion of it viz. 7 Khandis of Jawari should be levied from his brother who cultivates a field at Kurkumb, and brought to the account of Government.

[३७४] सुलतानजी रणदिवे पाटील मौजे रांजणगांव सांडस याचे शेतांत चिरंजीव रा० भाऊचे स्वारींत खासे डेरे व लष्कर राहून आठ दिवस मुक्काम जाहला. त्यामुळें शेताची खराबी अगदीं जाहली आहे. ऐशास शेताची खराबी जाहाली असेल त्याची चौकशी करून, सरकारशिरस्तेप्रमाणें शेताचा सारा होईल तो पाटील मजकूर यास मजुरा देणें. ह्मणून बाबुराव माणकेश्वर सुभेदार परगणे कर्डे रांजणगांव यांस सनद १. रसानगी पत्र रा० भाऊ.

इ. स. १७५९–६०. सीतेन मया व अलफ. रमजान २९.

[३७५] नारो त्रिंबक देशमुख यांचे नांवें सनद कीं, मामले कोहज निसबत यशवंतराव शिवाजी येथील रयत सन तीसांत कोळ्याचे दंग्यामुळें तर्फ गोरट प्रांत कल्याणभिवंडी येथें जाऊन राहिली आहे. त्यास मामले मजकूरपैकीं, जी रयत जाऊन राहिली असेल ती मशारनिल्हे याचे हवालीं करणें. रयत हवालीं न केली तरी रयतीकडे मत्तयाची सूती नक्त व ऐनजिनसी असेल ती रयतीचे गुजारतीनें तुह्मीं सरकारचे हिशेबीं जमा धरणें. आणि रयतीपासून वसूल घेणें. ह्मणोन सनद १.

इ. स. १७६०–६१. इहिदे सीतेन मया व अलफ. रजब १६.

क.—शेतकीस उत्तेजन.

१. तगाई.

[३७६] सुभानजीराव एरुणकर किल्ले राजमाची यांस पत्र कीं, मौजे तांबस तर्फ नीड व मौजे खाडपें तर्फ वासेर प्रांत कल्याण या दोन गांवांस तगाई भात कैली बारुळें मापें खंडी १० दहा देणें. पेस्तरसालीं हंगामशीर दीडसवाईप्रमाणें हिशेब करून वसूल घेणें. कदबा लिहून घेणें. ह्मणोन पत्र.

इ. स. १७४१–४३. सलास अर्बैन मया व अलफ. रबिलावल २६.

---

(374). A Sanad to Baburao Mankeshwar Subhedar of Karde Ranjangaon. In a campaign led by Bhau, the army encamped for 8 days in the field of Sultanji Randive Patel of Mouze Ranjangaon. The tents of Bhau himself were also pitched there. The field was therefore considerably damaged. You should therefore satisfy yourself of the fact after inquiry and remit the assessment that may be due on the said field.

A. D. 1759-60.

(375). A Sanad to Naro Trimbak Deshmukh. The ryots of Mamle Kohaj under Yeshwantrao Shiwaji went away to reside in Tarf Gorat Prant Kalyan Bhiwandi, in San Tisa, on account of a disturbance of the Kolis. You are directed to send back the ryots in question to the said Yeshwantrao. In case this is not done, you shall have to recover and pay up on their behalf, the revenue in cash and in kind, due by them to Government.

A. D. 1760-61.

376. A letter to Subhanjirao Erunkar of the Rajmachi Fort. You may advance 10 candies of rice in husk as Tagai to the villages of Tambas and Khadpe Prant Kalyan, to be recovered next year at one and a half for a candy.

A. D. 1741-43.

[३७७] इभ्रामजी नाडकर खोत कसबें गोवळें तर्फ मजकूर यांस लक्ष्मण हरि याजकडून देशमुखीपैकीं तगाई रुपये १०० व भात खंडी दहा दिल्हें आहे. त्यास सालमजकुरीं नापीक जाहालें, याजमुळें यंदा घ्यावयास मवसर नाहीं. यास्तव खोत मजकुरास सालमजकुरीं तगाईचा तगादा न करणें. पेस्तर फसल हंगामीं गल्ला व नक्ताचा वसूल घेणें. ह्मणून लक्ष्मण हरी यांस पत्र १.

इ. स. १७४३–४४.
अर्बा अर्बैन
मया व अलफ.
सफर २८.

[३७८] रामाजी बाबजी हवालदार व कारकून तर्फ हवेली पाल यास पत्र कीं रयत कसबे पाल यांचीं घरें जळालीं; याजकरितां ज्यांस भक्षावयास नसेल त्यांस जामीन घेऊन भात कैली बारुळें मापें खंडी १५ पंधरा देविलें आहे. तर जामीन बळकट घेऊन सदरहु भात देणें. पुढले सालीं हंगामशीर वसूल उसनें घेणें. याखेरीज कसबे मजकूरचे रयतेचीं घरें जळालीं याकरितां सालमजकूरचे ऐवजीं रयत निसबत तकूब ठेविले असे. भात कैली बारुळें मापें खंडी १० नक्त रुपये ५० येणेंप्रमाणें तकूब ठेवायाची आज्ञा केली असे. तरी सदरहुप्रमाणें तकूब ठेवणें; ह्मणोन सनद १.

इ. स. १७४६–४७.
सबा अर्बैन
मया व अलफ.
रविलाखर.

नक्त रुपयांविसीं अंबाजी दादा यांचे नांवें सनद लेहून दिल्ही असे.

अंबाजी दादाजी कमावीसदार नक्तबाब तर्फ हवेली पाल यांस पत्र कीं कसबे पाल येथील रयतेचीं घरें जळालीं. याजकरितां गौळीयाबाबत तूप वजन कच्चें ।· पांचमण तकूब ठेविलें असे. तरी सदरहुप्रमाणें पांचमण तूप गौळीयाबाबत सालमजकूरचे ऐवजीं तकूब ठेवणें. ह्मणोन सनद १.

---

377. A letter to Laxuman Hari. Rs. 1000 in cash and ten candies of rice in husk was given as Tagai to Ibhramji Nadkar Khot of Kasba Govale of the same Tarf. The present season having failed, no demand should be raised for the repayment of the Tagai. It should be recovered next year.

A. D. 1743-44.

378. A Sanad to Ramji Babaji Havildar and Karkun Tarf Haveli Pal. The rayats of Pal having lost their houses owing to fire, you are desired to give a loan of 15 candies of rice in husk to those who are in need of food, on their furnishing solvent sureties. The loan is to be recovered next year in harvest time.

A. D. 1746-47.

[३७९] रामाजी बाबजी हवालदार तर्फ पाल हवेली यांसी पत्र कीं, तर्फ मजकूरचे रयतीस तगाई भात कैली खंडी २५ पंचवीस पावेतों तुह्मांकडून देविलें असे. तर्फ मजकूरचे शिलकेपैकीं देऊन पेस्तर हंगामीं राशीसुद्धां जनशिरस्ता होईल त्याप्रमाणें वसूल घेणें. यासी ऐवज कोठील ह्मणाल तर तुह्मांकडील सीतचे नेमणुकीस बासष्ट खंडी तसेर घ्यावयाचे नेमले ते घेतले नसले व याखेरीज साल गुदस्तापैकीं हुजूर पस्तीस खंडी तांदुळ आणावे ते न आणले त्याचें सत्तर खंडी भात, व गुदस्ताचा चढ चाळीस खंडी व तिगस्ताप्रमाणें बासष्ट खंडी, गुदस्ता तसेर घेतले तसेर घेतले नसेल. एकून तुह्मांकडील सालाबाद नेमणूकप्रमाणें खर्च वजा करून दीडशें खंडीपावेतों बाकी निघते त्याऐवजीं देणें. ह्मणोन मशारनिल्हे यासी पत्र १.

इ. स. १७४७–४८.
समान अबैन
मया व अलफ.
जमादिलाखर १५.

[३८०] राजपूर प्रांतींच्या रयतीस सालगुदस्ता व सालमजकुरीं गल्ला तगाई अजमासें पांचशें साहाशें खंडी दिल्हा आहे. फसल हंगामीं जनशिरस्ताप्रमाणें वाढीसुद्धां वसूल घ्यावयाची आज्ञा जाहाली. त्यास मक्ता भारी; वाढीदिढीपावणेदुप्पट जनशिरस्ता जाला आहे. त्याप्रमाणें रयतीच्यानें देवत नाहीं. तरी स्वामींनीं रयतीवर नजर देऊन कांहीं रियात करून घ्यावयाची आज्ञा करावी ह्मणोन तुह्मीं अर्ज केला. त्यावरून रयतीवर नजर देऊन पांचशें साहाशें खंडी गल्ला तगाई दिल्हा आहे तो सवाई वाढीसुद्धां माघमासाअलीकडे झाडून वसूल घेणें. एक शेर बाकी न ठेवणें ह्मणोन खंडोजी माणकर यांसी पत्र १.

इ. स. १७४७–४८.
समान अबैन
मया व अलफ.
जिल्काद १६.

[३८१] राघो गोविंद यास पत्र कीं कसबे मुखडे परगणे पाटोदें येथील गांवचा बंदोबस्त सालमजकुरीं करून दिल्हा आहे. याजकरितां कसबे मजकुरास तगाईबद्दल कर्जदाखल रुपये १५०० दीड हजारपर्यंत तुह्मांकडून देविले असेत. पावते करून पावलीयाचें कबज घेणें. तेणेंप्रमाणें मजुरा असेत. सदरहु तगाईचे रुपये दोहों सालांमध्यें हंगामशीर उगवून घेणें. गांवचे

इ. स. १७५०–५१.
इहिदे खमसेन
मया व अलफ.
सवाल ३.

---

379. A letter to Ramaji Babaji Havaldar and Karkun Tarf Haveli Pal. You are desired to give Tagai to the amount of 25 candies of rice in husk from the stock in hand to be recovered next year at the harvest time at the usual rate.

A. D. 1747-48.

380. A letter to Khandoji Mankar. You have represented that the Tagai of 500/600 candies of grain was given to the rayats of Rajpur Prant during the last and present years, that the current rate has risen to $1\frac{3}{4}$ for a candi, that the rayats are not able to return the grain at that rate and that therefore some leniency should be shown to them. You are therefore desired to recover the grain at $1\frac{1}{4}$ per candy before the end of next magh, no outstandings should be left.

A. D. 1747-48.

381. A letter to Ragho Govind, desiring to pay to the villagers of Mukhade

रखवालीस तुह्मांकडून प्यादे असामी दाहा व पांच सात राऊत देविले असेत. देऊन गांवची रखवाली करणें, ह्मणून पत्र १.

[३८२] रामचंद्र विश्वनाथ कमावीसदार परगणे हसोट (हसोत) प्रांत गुजराथ यास सनद कीं, परगणे मजकूर खराब आहे, त्यास रयतीस कांहीं तगाई दिल्हीयानें आबादानी होईल ह्मणोन विदित केलें. त्यावरून रयतीवर नजर देऊन तुह्मांस सनद सादर केली असे. तरी जरुरातीस दोन तीन हजार रुपयेपर्यंत रयतीस तगाई देऊन लावणी उत्तमप्रकारें करणें; तगाईचा ऐवज पुढें हंगामशीर उगवून घेणें; ह्मणोन सनद १. रसानगी याद.

इ. स. १७५१–५२. इसन्ने खमसेन मया व अलफ. रजब ८.

[३८३] नरसिंगराव विठ्ठल कमावीसदार जागीर परगणे निंबाईत यास सनद कीं, मौजे मलगाव परगणे मजकूर सरकारचे फौजेमुळें लुटलें गेलें. याकरितां मौजे मजकूरचे रयतीस तगाई उसने रुपये १०००० तुह्मीं देणें आणि गांवची कीर्द आबादानी करवून तुह्मीं आपले रुपये उसने उगवून घेणें; ह्मणोन सनद १. रसानगी याद.

इ. स. १७५२–५३. सलास खमसेन मया व अलफ. रबिलावल १५.

[३८४] नारो रामचंद्र जिल्हे मावळे यांचे नांवें सनदाः—जिल्हा मावळें येथें सालमजकुरीं नापीक जाहालें; रयतेस भक्षावयासी नाहीं; तरी रयतेवर नजर देऊन तगाई दिल्हीयानें रयत जगोन कीर्द आबादानी होईल; ह्मणोन तुह्मीं विनंती केली. त्याजवरून रयतेवर नजर देऊन प्रांत कल्याणभिवंडीपैकीं गल्ला भात, नागली, वरी मिळोन बारुलें मापें ३०० तीनशें खंडी गल्ला

इ. स. १७५३–५४. अर्बा खमसेन मया व अलफ. मोहरम २२.

A. D. 1750-51. Pargana Patode Rs. 1500 as Tagai advance on proper receipts and to recover the amount in two years in proper time.

382. A sunad to Ramchandra Vishwanath Kamavisdar Pargana Hanot Prant Gujarath. It has been represented that the Pargana has been reduced to poverty; that therefore if some Tagai advances are made to the rayats, improvement might be expected. You are therefore directed to make advances to the extent of 2/3 thousand as may be necessary with a view to secure the best cultivation. The advances to be recovered next year in due time.

A. D. 1751-52.

383. A Sanad to Narsingrao Vithal Kamavisdar Jahagir Pargana Nimbait Mouje Malgon of the said Pargna having been looted by Govt. troops, you are directed to issue Tagai amounting to Rs. 10000 to the rayats and secure good cultivation to enable you to recover the advance.

A. D. 1752-53.

384. A Sanad to Naro Ramchandra Zilla Maval. You have represented that owing to the failure of season this year the rayats have nothing to live upon and that therefore any Tagai would enable them to live and secure good cultivation. In consideration of your representation and the condition of the rayats, it is ordered that 300 candies of rice in husk Nagli and

A. D. 1753-54.

देविला आहे. घेऊन रयतेस तगाई देणें. पुढें पेस्तरसालीं सदरहु तीनशें खंडी गल्ला सरकारांत उसना वरघाटी देणें. ह्मणोन सनद १.

२ पडीत जमिनीच्या लागवडीकरितां व बागाईत वाढविण्याकरितां विशेष प्रकारची सवलत.

[३८५] परगणे पुर्णी सरकार बांडे परगणा वैराण आहे. त्यास, त्र्यंबक हरि यास लावणी संचणी करावयाची आज्ञा करून तनख्याप्रमाणें इस्तावा साता सालांनीं भरून द्यावयाचा करार केला. तनखा जागीर व फौजदारी व मुकासा व बाबती कुलबाब कुलकानु रुपये ४२६४॥~ यास उगवणी सालें सात:—

इ. स. १७४३–४४ अर्बा अर्बैन मया व अलफ. रमजान २९.

सालमजकूर सन अर्बा रुपये	३१.	सन समान अर्बैन रुपये	१३००.
सन खमस अर्बैन रुपये	६२.	सन तिसा अर्बैन रुपये	२१००.
सन सीत अर्बैन रुपये	२००.	सन अर्बैन रुपये	४२६४॥~.
सन सबा अर्बैन रुपये	७००.		

येणेंप्रमाणें उगवणी करून परगणे मजकूरची लावणी संचणी करणें. याखेरीज परगणे मजकुरीं जकात वगैरे आकार होईल तो माहाल मजकुरास दिल्हा असे; खर्च करणें ह्मणोन त्र्यंबक हरि कमाविसदार सरकार बांडे यास सनद १.

[३८६] देशमुखी प्रांत वसई व साष्टी व बेलापूर निसबत परशुराम रामचंद्र याजकडे पत्रें दिलीं:—

इ. स. १७४६–४७. सबा अर्बैन मया व अलफ. जिल्हेज २०.

मौजे जु तर्फ तुरभें प्रांत साष्टी हा गांव इसाफतीचा; तेथील बागाईत जमीन खराब आहे, यास कौल दिलीया बागाची लावणी होईल ह्मणून अर्ज केला. त्यावरून लागवडजमीन धारीयाची खेरीजकरून पडजमीन बागाईत आबाद करणें कौल.

Vari pertaining to Prant Kalyan Bhivadi should be given to them to be returned next year on the ghauts. Every facility should be afforded to cultivate waste land and for the improvement of the Bagait.

385. A Sanad to Trimbak Hari Kamavisdar Pargana Purni under the Banda Sirkar having fallen waste, Trimbak Hari has been directed to bring it under cultivation, the revenue being paid within 7 years. The assignment to include Jagir, Fouzdari, Mokasa and Babati with Kulbab Kulkanu Rs. 4264-14 to be paid in 7 years. Besides any other levies such as Jakat &c. to be remitted.

A. D. 1743-44.

386. A kowl or agreement passed to Parashram Ramchandra of the Desh-

माडाची नवी लावणी होईल त्यास बारा वर्षें पाळावें. पेस्तर पाहाणी करून शिरस्तेप्रमाणें पाळावीं. सुपारीची लावणी होईल त्यास आठ वर्षें पेस्तर पाहाणी करून शिरस्तेप्रमाणें धारा घ्यावा १.

येणेंप्रमाणें माड बारा वर्षें व सुपारी आठ वर्षें महसूल माफ करून कौल दिला असे.

इ. स. १७५०–५१.
इहिदे खमसेन मया व अलफ
सवाल ३.

[३८७] कसबे मुखेड परगणे पाटोदें सरकार संगमनेर सुभे खुजिस्ते–बुनियाद यांस कौल लिहून दिल्हा कीं, कसबे मजकुरावर बहुत कसाले येऊन गुदरले. यामुळें गांव खराब जाहला. रयतेमध्यें बळ हवाल किमपि राहिले नाहींत. याजकरितां साहेबीं कृपाळु होऊन इस्तावियाचा कौल दिल्हीयानें सरकारची उगवणी होईल व गांवची लावणी टुपणी होऊन आबादानी होईल ह्मणून. त्यावरून बराय अर्ज खातरेस आणून तुह्मांवर कृपाळु होऊन व कसबे मजकूरचे आबादानीवर नजर देऊन इस्तावियाचा कौल येणेंप्रमाणें सदर केला असे. कुलबाब कुलकानु रुपये:—

११४०५८=॥ ऐन तनखा दरोबस्त व ११४०॥· सर देशमुखी. एकूण १२५४५॥=॥ एकूण बारा हजार पांचशें साडेपंचेचाळीस रुपये अडीच आणे. यासी इस्तावा सालें बितपसील काळी व पांढरी कुलबाब कुलकानु:—

सन इहिदे सालमजकूर रुपये,	४०००	सन सलास खमसेन जमा रुपये,	
सन इसन्ने खमसेन रुपये,		बरहुकूम गुदस्त	५०००
बरहुकूम गुदस्त	४०००	जाजती सालमजकूर	२०००
			७०००
सालमजकूर जाजती	१०००	सन अर्बा खमसेन जमा रुपये,	
	५०००		
		बरहुकूम गुदस्त रुपये	७०००
		जाजती सालमजकूर	३०००
			१००००
		सन खमस खमसेन जमा रुपये;	
		बरहुकूम गुदस्त	१००००
		जाजती सालमजकूर	२५४५॥=॥
			१२५४५॥=॥

A. D. 1746-47. mukhi Prant Bassein, Salsette and Belapur to the effect that excepting lands already under cultivation paying revenue, all the waste lands should be made Bagait lands brought under Mâd and Supari cultivation for the first 12 and 8 years respectively.

येणेंप्रमाणें सालमजकूर सन इहिदे चार हजार व सन इसन्ने पांच हजार व सनसलास सात हजार व सन अर्बा दाहा हजार व सन खमस बारा हजार पांचशें साडेपंचेचाळीस रुपये अडीच आणे. याप्रमाणें पांच सालां करार केला असे. सदरहुप्रमाणें सालाची साल-उगवणी करून कीर्द आबादानी करणें. जाजती आजार लागणार नाहीं. पांचां वर्षांत कसबे मजकूरची सारी जमीन लाऊन देणें. आप्ता फितरती जाली तरी मनास आणून मुल्क शि-रस्तेप्रमाणें मजुरा दिल्हा जाईल. अभय असे ह्मणोन कौल लेहून दिल्हा असे.

[३८८] तर्फ पौनमावळ येथील इस्तावा पेशजी सन सबा अर्बैनापासून सन तिसा अर्बैन पावेतों तीसाला मक्ता करार करून दिल्हा होता, तो पुरला. सन खमसेनची जमाबंदी जाहली नाहीं. व पुढें साल मजकुरापासून जमाबंदी मुशकस करून दिल्ही पाहिजे. पेशजी सरकारांतून इस्तावा दिल्हा होता तो भारी जाहल्यामुळें रयत परागंदा जाहली व पर्जन्यानें घालविलें; याकरतां रयतेमध्यें ताकत राहिली नाहीं. जीवनमवाफक जमाबंदी करून कौल सादर केलीया उमेदवारी धरून कीर्द पुरी करतील. ह्मणून तुह्मीं विनंती केली. त्यावरून बराय अर्ज खातरेस आणून आबादानीवर नजर देऊन जमाबंदी करार केली. आज देहे २८ पैकीं वजा पागा दिमत खंडेराव बारगे याजकडे जिल्हेबाबपैकीं मुकासे देहे, १ मौजे पाचाणें, १ मौजे पुसाणें; एकून दोन गांव वजा होऊन बाकी देहे २६ यांची जमाबंदी येणेंप्रमाणें. कुलबाब इहिदे सन खमसेन तारीख सन अर्बा पांच सालां बितपसील सालें रुपये:—

इ. स. १७५०–५१.
इहिदे खमसेन मया व अलफ.
सवाल १८.

---

387. A Kowl to Kasba Mukhed Pargana Patode of the Sirkar of Sangamner under Subha Khujiste Buniad. The Kasba in question having undergone many difficulties and dangers, has become quite reduced. The rayats have become helpless. In view of these circumstances and of the improvement of the Kasba it is given over to you for Rs. 11405-2-6 on account of Kulbab Kulkanu and Rs. 1140-8 on account of Sardeshmukhi, to be paid in yearly 5 specified instalments.

A. D. 1750-51.

388. A Kowl to the Deshmukhs and Deshpandes Tarf Pownmawal. The present assessment being very high, the rayats have gone away, besides the rains have failed, consequently the rayats have lost all capacity. For these reasons you have requested that a moderate Jamabandi be fixed deducting the villages of Pachane and Pusane pertaining to Khanderao Barge from the 28 villages. The following Jamabandi has been fixed for the next 5 years.

A. D. 1750-51.

1 In san Khamsen cash Rs. 8251 and grain 35 candies.
2 In san Ihide cash Rs. 8251 and grain 35 candies.
3 In san Isane „ „ „
4 In san Salas „ „ „
5 In san Arba cash Rs. 9001 and grain „

सन खमसेन सालगुदस्तः—

नकद गुदस्त सन तीसा रुपये ९५०१ पैकीं वजा सोड रुपये १२५०, बाकी करार रुपये ८२५१.	गल्ला कैली साडेतीसेरीमाप खंडी ३३॥४॥=। बारुळें, गुदस्त सन तीसा. १८।.।॥ जाजतीसाल मजकूर. ३५.

सन इहिदे खमसेन जमाखेरीजः—

नक्त बरहुकूम सन खमसेन बेरीज रुपये ८२५१.	गल्ला कैली साडेतीसेरी बारुळे मापें बरहुकूम गुदस्त खंडी ३५.
सन इसन्ने खमसेन नक्तबरहुकूम गुदस्त रुपये ८२५१.	गल्ला कैली बरहुकूम गुदस्त खंडी ३५.
सन सलास खमसेनः—बरहुकूम गुदस्त नकद रुपये ८२५१.	गल्ला कैली बरहुकूम गुदस्त खंडी ३५.
सन अर्बाखमसेनः—नक्त जमा रुपये बरहुकूम गुदस्त ८२५१ जाजती साल मजकूर ७५० ९००१	गल्ला कैली बारुळे मापें खंडी बरहुकूम गुदस्त खंडी ३५.

येणेंप्रमाणें सन खमसेन नक्त रुपये आठ हजार दोनशें एकावन व गल्ला पस्तीस खंडी व सन इहिदे नक्त आठ हजार दोनशें एकावन व गल्ला पस्तीस खंडी; इसन्ने नक्त आठ-हजार दोनशें एकावन व गल्ला पस्तीस खंडी; व सन सलास आठ हजार दोनशें एकावन रुपये व गल्ला कैली खंडी पस्तीस; व सन अर्बा नक्त रुपये नऊ हजार एक रुपया व गल्ला कैली खंडी पस्तीस याप्रमाणें पांच सालां करार करून दिल्हा असे. सदरहुप्रमाणें सालबसाल सर-कारांत उगवणी करून कीर्द आबादानी करून सुखरूप राहणें. जाजती आजार लागणार नाहीं. ह्मणून देशमुख देशपांडे तालुके मजकूर यांस कौल.

इ. स. १७५०-५१. इहिदे खमसेन मया व अलफ. जिल्हेज ५.

[३८९] मौजे मोहाडी परगणे दिंडोरी हा गांव कसाल्यामुळें नातवान जाहला आहे. तरी इस्तावियाचा कौल करून द्यावा ह्मणून शाहाजी सोमवंशी यांणीं विनंती केली. त्यावरून मौजे मजकूरचे नातवानीवर नजर देऊन येणें-प्रमाणें इस्तावा करार केला असे. तनखा जागीर मोकासी कुलबाब कुलकानु खेरीज सरदेशमुखी तनखा रुपये ३५०० साडेतीन हजार पैकीं वजा शिवेखाली जमीन गेली आहे तिचे अजमासें वजा रुपये ५००, बाकी तनखा रुपये ३००० तीन हजार यास इस्तावाः—

सन इहिदे साल मजकूर रुपये २४००
सन इसन्ने खमसेन रुपये २७००
सन सलास रुपये ३०००

येणेंप्रमाणें करार केला असे. जिकडील तिकडे हिश्शाबमोजिब उगवणी करून सुखरूप राहणें. परगणेसंबंधें पट्टीचा ऐवज बसेल तो सदरहु तनख्याशिवाय देत जाणें ह्मणोन कौल सादर.

[३९०] कसबे तळेगांव तर्फ पाबळ प्रांत जुन्नर यास दिल्हें अभयपत्र ऐसेजें, तुह्मी हुजूर कसबें देपूर तर्फ मजकूर परगणे संगमनेर येथील मुकामीं येऊन अर्ज केला कीं, सालमजकुरीं मोंगलाची स्वारी आपले प्रांतीं जाली. मोंगलाचा मुकाम कसबे मजकुरीं जाला, त्यामुळें शिवार गेला; गांवचीं घरेंदारें जाळून फस्त केलीं; रयत परागंदा जाहली; याकरितां लावणीचा कौल दिल्हीया रयतेचा दिलासा करून गांवावर आणून लावणी करूं ह्मणोन. त्यावरून बराय अर्ज खातरेस आणून रयतेवर व लावणीवर नजर देऊन, पेस्तर साल सन सलास खमसेनापासून चार सालां मिळोन दिल्हा असे. ऐन तनखा बरहुकूम यादी पाटील रुपये १०००० दाहा हजार पैकीं वजा मोहतर्फ २२००, बाकी जिराईत व बागाईत ७८०० सात हजार आठशें यास इस्तावा येणेंप्रमाणें:—

इ. स. १७२१–५२. इसन्ने खमसेन मया व अलफ. रबिलावल १८.

---

389. Shahaji Somvanshi having represented that the village of Mohadi Pargana Dindori has become quite incapable owing to its being hard pressed, it has been agreed that the village be managed on payment of the following increased sums:—

A. D. 1750-51.

In san Ihide current year Rs. 2400
In san Isane Rs. 2700
In san Salas Rs. 3000

Besides any rates that may be levied in connection with the Pargana.

390. A Kowl to the village of Talegaon Tarf Pabal Prant Junar. It was represented to the Huzur while encamped at Depur Pargana Sangamner that during the current year the Mogals appeared in this Prant and encamped at this village, the result being the destruction of crops and houses of the villages and the migration of villagers and that therefore if a Kowl for cultivation be granted, the rayats would be induced to return and proper cultivation secured. In consideration of this representation, this Kowl is granted on payment of the following sums:—

A. D. 1751-52.

In san Salas San 1162, no payment.
In san Arba Khamsain San 1163 Rs. 1950.
In san Khamas Khamsain San 1164 Rs. 3900.
In san Sit Khamsain San 1165 Rs. 7800.

सन सलास सन ११६२ माफ केले असे सालमजकूर रुपये०
सन अर्बाखमसेन सन ११६३ चौथाई रुपये १९५०
सन खमस खमसेन सन ११६४ रुपये

१९५० बरहुकूम गुदस्त
१९५० जाजती

३९००

सन सीत खमसेन सन ११६५ रुपये

३९०० बरहुकूम गुदस्त
३९०० जाजती

७८००

येणेंप्रमाणें सन सलास माफ व सन अर्बा साडेएकुणीसशें व सन खमस तीन हजार नवशें व सन सीत सात हजार आठशें याप्रमाणें करार केले असे. तर सदरहुप्रमाणें सालाचे सालांत सरकारांत ऐवज पावता करून पावलीयाचीं कबजें घेणें, आणि कीर्दी मामुरी करून सुखरूप राहणें. जाजती आजार लागणार नाहीं. अभय असे. याखेरीज मोहतर्फ रुपये २२०० बावीसशें आहेत. त्यास सनसलास तागाईत सनसीत चार सालेंपावेतों माफ केले असेत. मोहतर्फ कुळें आणून, दिलासा देऊन आबादानी करणें. शिरस्तेप्रमाणें मोहतर्फा घेतला जाईल. जाजती आजार लागणार नाहीं. ह्मणोन गांवास कौल लेहून दिल्हा असे १.

इ. स. १७५४–५५.
खमस खमसेन मया व अलफ.
सरफ १८.

[३९१] प्रांत बागलाण येथील बागाइतास पाटाचें पाणी बंधारे फुटले, यास्तव जात नाहीं. याजकरितां पाटाचे बंधारे बांधावयासी आज्ञा करावी ह्मणोन तुह्मीं विनंती केली. त्याजवरून पाटाचे बंधारे बांधावयासी प्रांत मजकूरचे ऐवजीं साल मजकुरापासून दरसाल रुपये पांच हजारप्रमाणें पांच सालां बिनतपसील रुपयेः—५००० सनखमस सालमजकूर. ५००० सन सीत. ५००० सन सबा. ५००० सनसमान. ५००० सन तीसा.

एकूण पंचवीस हजार देविले असेत. सदरहुप्रमाणें दरसाल पांच हजार घेऊन पाटाची इमारत पक्की बांधोन बागाइतास पाणी पोहोंचोन कीर्द आबादी होय तें करणें. इमारतीचा कच्चा हिशेब साल दरसाल सरकारांत आणून समजावीत जाणें. तेणेंप्रमाणें मजुरा होतील. ह्मणून अंताजी विठ्ठल कमावीसदार प्रांत मजकूर यांस सनद १.

A. D. 1754-55.

391. A Sanad to Antaji Vithal Kamavisdar Prant Baglan. You have represented that dams having given way the bagait crops do not get water in the Baglan Prant and therefore requested permission to repair the dams. It is hereby ordered that for the purpose of repairing the dams, Rs. 5000 be paid yearly for 5 years from the revenues of the Pargana.

[३९२] मौजे अगरखेडें परगणे इंडी प्रांत विजापूर हा गांव चौघा हाकिमांचे तसदीमुळें उजाड पडिला; ह्मणून देशमुख देशपांडे परगणे मजकूर यांणीं विनंती केली कीं, स्वामींनीं कृपाळु होऊन कौल दिल्हीया गांवची लावणी होऊन कीर्द आबादानी होईल ह्मणून. त्यावरून तुह्मांवर कृपाळु होऊन मौजे मजकुराचे आबादानीवर नजर देऊन रा० विसाजी कृष्ण पागासरकार यांसी मौजे मजकूरची लावणी करावयास आज्ञा केली असे. तरी मशारनिल्हेसी रुजू राहून गांवची कीर्द आबादानी करून सुखरूप राहणें. जाजती आजार करणार नाहीं. अभय असे. ह्मणोन मोकदमाचे नांवें कौल लेहून दिल्हा असे.

इ. स. १७५४-५५. खमस खमसेन मया व अलफ. साबान २३.

[३९३] अभयपत्र कसबे खेड तर्फ चांभारगोंदें प्रांत कडेवळीत येथील मोंगलाकडील व स्वराज्याकडील कमाविसदारांनीं धामधूम करून वसूल मन मानेल तसा घेतला आहे ह्मणोन हुजूर विदित जाहलें. त्यावरून कसबे मजकूरास इस्तावियाचा कौल सादर केला असे. आज तनखा रुपये:—

इ. स. १७५५-५६. सीत खमसेन मया व अलफ. रबिलावल २४.

८३५२॥।=॥ ऐन तनखा.
१०४४ सरदेशमुखी दर सदे रुपये १२॥ प्रमाणें.

९३९६॥।=॥ यासी इस्तावसाले रुपये.
४५०० सन सीत सन ११६६ रुपये.
४००० ऐन रुपये.
२००० जाहागीर रुपये ५० प्रमाणें.
२००० स्वराज्य रुपये ५० प्रमाणें.
८०० सुभाबाबत.
९२० मोकासी.
१६० निमे चौथाई.
१२० साहोत्रा.

४००० २०००
५०० सरदेशमुखी दर सदें रुपये १२॥ प्रमाणें.

४५००

392. A Kowl in the name of Mokadam. The village Agarkhede, Pargana Indi, Prant Vijapur has become desolate owing to the oppression of the 4 Hakims and therefore the Deshmukh and Deshpande requested that a Kowl be granted to enable the cultivation of the village lands. In consideration of these circumstances, Visaji Krishna Paga Sarkar has been ordered to bring under cultivation the lands of the said village.

A. D. 1754-55.

५६२५ सन सबा सन ११६६ रुपये,

४५०० बरहुकूम गुदस्त.

११२५ जाजती सालमजकूर.

५६२५

तपसील:—

५००० ऐन जाहागीरसुद्धां.

२५०० जाहगीर.

२५०० स्वराज्य.

१००० सुभाबाबत.

११५० मोकासी.

२०० निमे चौथाई.

१५० साहोत्रा.

५००० २५००

६२५ सरदेशमुखी दरसदे १२॥ प्रमाणें.

५६२५

७०३१। सनसमान सन ११६७ रुपये,

५६२५ बरहुकूम गुदस्त.

१४०६। सरदेशमुखी.

७०३१।

तपसील:—

६२५० ऐन.

३१२५ मोंगलाई.

३१२५ स्वराज्य.

१२५० सुभाबाबत.

१४३७॥ मोकासी.

२५० निमे चौथाई.

१८७॥ साहोत्रा.

६२५० ३१२५

393. It has been represented that the Kamavisdars of this Government and of that of Mogals have recovered the revenue of the village Khed Tarf Chambergonde, Prant Kadevalit at the rates according to their wishes by coercion. A kowl has therefore been granted fixing the amount each Government should receive every year.

A. D. 1755-56.

६२५०
७८१। सरदेशमुखी दर १२॥ प्रमाणें.
७०३१।

९३९६॥।=॥ सन तीसा सन ११६८ रुपये,
७०३१। बरहुकूम गुदस्त.
२३६५॥।=॥ जाजती.
९३९६॥।=॥

तपसील:—
८३५२॥।=॥ ऐन.
४१७६।≡। जाहागीर.
४१७६।≡। स्वराज्य.
१६७०॥ सुभाबाबती.
१९२०॥।= मोकासी.
३३४।= निमे चौथाई.
२५०॥≡। साहोत्रा.
८३५२॥।=॥. ४१७६।≡।.
१०४४ सरदेशमुखी १२॥ प्रमाणें.
९३९६॥।=॥

२६५५३८=॥

एकूण सव्वीस हजार पांचशें त्रेपन रुपये अडीच आणे मोंगलाई व स्वराज्य चौसाला इस्तावा करार करून दिल्हा असे. सदरहु इस्तावीयाप्रमाणें साल दरसाल जिकडील तिकडे ऐवज पाठवीत जाणें. ह्मणून अभयपत्र.

[३९४] मौजे शेंदी परगणे पांडें पेडगांव हा गांव मोंगलाचे दंग्यानें सन इसन्नेंत जळाला, व लुटला. त्याजमुळें गांवची खराबी जाहली. सबब गांवचे लावणीवर नजर देऊन इस्तावा करार करून दिल्हा असे. मौजे मजकुराचा तनखा:—

इ. स. १७५५–५६.
सीत खमसेन मया व अलफ.
रबिलावल ३०.

394. A letter to Gopal Shunkar. The village of Shendi Pargana Pande Pedgaon was burnt and robbed in the Mogal disturbances and thus has been reduced to poverty. In consideration of this, it has been agreed to receive Rs. 2801–4–0 during the 3 years mentioned, any sums recovered beforehand being deducted from this amount.

A. D. 1755-56.

रुपये, ३१००|≡ ऐनतनखा.

३८७॥ सरदेशमुखी दर सदे रुपये १२॥ प्रमाणें.

३४८७॥≡ यासी इस्तावा साले,—

सन इसन्नेंत मोंगलानें लुटलें सबब वरकडाप्रमाणें मोकासी व सरदेशमुख यांणीं ऐवजाचा तगादा लाऊं नये. माफ केला असे.

१४००॥= सनसलास खमसेन.

७१३॥= मोकासी.

३८७ सरदेशमुख.

३०० जाजती फड फरमास वगैरे मिळोन अवघे अमलदार अजमासें

१४००॥= घेत होते त्याप्रमाणें घ्यावे.

१४००॥= सन अर्बा गुदस्ताप्रमाणें.

२८०१।

एकून दोन हजार आठशें सवा रुपया मागील दुसाला इस्तावा येणेंप्रमाणें करार केला असे. तरी सदरहु हिश्शाप्रमाणें वसूल घेणें. जाजती तगादा न लावणें. तीसालांत मौजे मजकुरचा वसूल घेतला असेल तो सदरहु इस्तावियांत मजुरा देणें. ह्मणोन गोपाळ शंकर यांसी पत्र.

[३९५] मौजे जखणगांव परगणें कर्डे रांजणगांव येथील मोकदमाचे नांवें कौल कीं, तुवां हुजूर येऊन अर्ज केला कीं, सालमजकुरीं मोंगलाच्या दंग्यामुळें गांवचा शिवार लुटला, घरें जळालीं, व वस्तभाव सर्व गेली. गुरें भोंसले यांणीं लुटलीं. यामुळें गांवची वस्ती करून लावणी करावयाची ताकद राहिली नाहीं. ऐशास साहेबीं कृपाळु होऊन कौल दिल्हीयास उमेदवार होऊन लावणी करूं ह्मणोन; व बाबुराव सदाशिव यांणीं तुमचेविशीं विनंती केली; त्यावरून मौजे मजकुराचे लावणीवर नजर देऊन अभयपत्र सादर केलें असे. तरी आकार मोंगलाई व स्वराज्य रुपये:—

इ. स. १७६१–६२. इसन्ने सीतेन मया व अलफ. रजब २०.

395. A letter to the Mokadam of Jakhangaon Pargana Karde. You have represented to the Huzur that owing to the Mogal disturbances in the current year, the village crops had been taken away, houses burnt, and property lost, besides the cattle has been robbed by the Bhosla, in consequence of which the village has been depopulated, and no cultivation of lands was possible and requested for a kowl to secure cultivation. Baburao also pleaded your cause. In consideration of both, a kowl is hereby granted under which you should pay the following sums yearly and manage the village:—

A. D. 1761-62.

१४०० ऐनतनखा.
१४० सरदेशमुखी दर सदे रुपये १०.
२१० नजर दर सदे रुपये १५ प्रमाणें.
२५१ महालमजकूर मक्ता.
२००१

एकून दोन हजार एक रुपये. यासीं पेस्तर सालापासून इस्तावा साले बितपसील:—

५००	सन सलास सीतेन रुपये	१४००	सन सीत सीतेन रुपये.
८००	सन अर्बा सीतेन ,,	१७००	सन सबा सीतेन रुपये.
११००	सन खमस रुपये ,,	२००१	सनसमान रुपये.

येणेंप्रमाणें सन सलास पांचशें, व अर्बा आठशें, व खमस अकराशें, व सीत चौदाशें व सबा सतराशें, व समान दोन हजारएक रुपयाप्रमाणें सहा सालें करार करून दिल्हें असे. तरी मौजे मजकूरची लावणी संचणी करून उमेदवारीनें कीर्द आबादानी करून इस्ताव्याप्रमाणें सालाचे सालांत वसूल देत जाणें. मौजे मजकुराची कमावीस सदाशिव बाबाजी याजकडून दूर करून सदाशिव हरि याजकडे सांगितली असे. यासी रुजू होऊन त्याजकडे अंमल सुरळीत देणें ह्मणोन मोकदमाचे नांवें कौल १.

येविशीं सदाशिव हरि याचे नांवें सनद कीं, सदाशिव बाबाजी याजकडून कमावीस दूर करून तुह्मांस सांगितली असे. तरी गांवची लावणी करून इस्तवियाप्रमाणें वसूल घेऊन तो हुजूर पागेकडे देत जाणें. तुह्मांस पेस्तर सालापासून सालीना दरसाल वेतन रुपये १०० सरकार ऐवजपैकीं, १०० सादिलवार गांव खर्चापैकीं, एकून २०० दोनशें रुपये करार करून दिल्हे असेत. घेत जाणें, पैकीं सदर्हू १०० शंभर रुपये सरकारचे ऐवजीं मजुरा पडतील. ह्मणोन सनद १.

ड. बिगर हुकूम लागवड केल्याबद्दल शिक्षा.

इ. स. १७४९–५०. खमसेन मया व अलफ- साबान २७.

[३९६] मौजे कोल्हाळें बुद्रुक परगणें सुपें व मौजे मुढळें परगणे मजकूर याची जमीन दोहों गांवची मिळोन होती, ते कोल्हाळ्याचे कुणब्यानें न पुसतां पेरली, सबब मौजे मजकुराकडे गुन्हेगारी करार करून कतबा लेहून घेतला, मुदत आश्विन मास ३०० रुपये तीनशें करार केले असेत.

In san Salas Rs. 500
In san Arba Rs. 800
In „ Khamas Rs. 1100
In „ Sita Rs. 1400
In „ Saba Rs. 1700
In „ Saman Rs. 2001

ई. जमीन घेतल्याबद्दल मोबदला.

इ. स. १७५२-५३. सलास खमसेन मया व अलफ. रबिलाखर १५.

[३९७] नवलोजी वाघमारा खिजमतगार वतनदार कुणबी मौजे पर्वती तर्फ हवेली प्रांत पुणें याचें शेत होतें तें तळ्याखालीं वगैरे बागाखालीं गेलें यास शेत नाहीं; याजकरितां मौजे मजकुरीं आपाजी सावंत खासबारदार साठ बिघे वाहात होता. त्यास, तो कोंकण प्रांतीं गेला. शेत रिकामें पडलें. तें शेत कानो जनार्दन वाहातात. त्यास हालीं त्या शेतापैकीं तीस बिघे शेत यास देविलें आहे; तरी याचे हवालीं करणें. वाजवी सारा होईल तो याजपासून घेणें. ह्मणोन चिरंजीव रा० नीलकंठ महादेव यास सनद १.

येविशीं चिरंजीव रा० विश्वासराव यास पत्र कीं, तुह्मीं ताकीद करून यास शेत देवणें ह्मणोन १.

परवानगी रा० भाऊ. रसानगी हरि जिवाजीवरें.

फ.–गांवठाणाकरितां दिलेल्या जमिनी.

इ. स. १७५४-५५. खमस खमसेन मया व अलफ. मोहरम १८.

[३९८] मैराळ मेघःशाम याचे नांवें सनद कीं, तुह्मीं हुजूर येऊन विनंती केली कीं, कसबे पाबळ तर्फ मजकूर प्रांत जुन्नर येथें शेंपन्नास घर नवें होणार, त्यास पाबळचे पूर्वेस जागा आहे तेथें वस्ती करावयाची आज्ञा केली पाहिजे ह्मणून. त्याजवरून कसबे मजकूरचे वसाहतीवर नजर देऊन तुह्मांस सनद सादर केली असे. तरी कसबे मजकूरचे पूर्वेस जागा आहे तेथें लोकांस घरें बांधून सुखरूप वस्ती करून राहूं देणें ह्मणून सनद १. रसानगी याद.

ग.–जंगलखातें.

इ. स. १७४३-४४. अर्बा अर्बैन मया व अलफ. सवाल १७.

[३९९] खंडोजी माणकर नामजाद प्रांत राजपूरी यास पत्रें. परगणें घोसाळें येथील भेरली माडाचा मक्ता सालमजकुरीं नारो हरि यांणीं रामाजी बल्लाळ हवालदार परगणे मजकूर यांचे गुजारतीनें करार केला, तेणेंप्रमाणें मक्ता करार केला असे रुपये १५४॥= सदरहूचा वसूल घेणें ह्मणोन.

---

(396) A piece of land in dispute between the villages of Kolhale and Mudhale in Pargana supe, was unauthorizedly cultivated by a Kunbi of the former village. He was fined Rs. 300.
1749-50. A. D.

(397) A field belonging to Nauloji a Vatandar, resident of Parvati, having been taken up for a tank and garden, another field was given to him in exchange.
1752-53 A. D.

(398) About 100 houses being to be newly built at Pabal, a vacant site to the east of the Village was issued for the purpose.
1754-55 A. D.

(399) The farm of the revenue from Bherali palm trees in Pargana Ghosala for one year was given for Rs. 154-10-0.
1743-44 A. D.

[४००] जुन्नर प्रांतींच्या रयतेचीं घरें जळालीं मोंगलांच्या दंग्यामुळें. त्यांस घरें नवीं बांधावयाबद्दल साहित्य रसानगी यादी:—

इ. स. १७५१–५२. इसन्ने खमसेन मया व अलफ. जमादिलावल ७.

सीनाजी नाईक बरडे याजकडून रांधेदरवाडी येथील कुरण पैकीं देविले सुमार १००००० गवत पुळे.

घराच्या कामाबद्दल रयत लांकडें, वांसे, धारण वगैरे सरंजाम तोडून नेतील त्यास नेऊं देणें ह्मणोन सनदा.

१ मौजे रांधे येथील कुरणास.

१ मेघःश्याम बापुजी यास कीं अजमपूरच्या कुरणपैकीं नेऊं देणें ह्मणोन.

इ. स. १७५४–५५. खमस खमसेन मया व अलफ. जमादिलावल १५.

[४०१] रा० जनार्दन बल्लाळ फडणीस यांचें घर पर्वतीस नवें होत आहे. त्यास सावळ्या घाटांतून इमारतीचीं लांकडें साइली व हर-जिनसी गाडे १०० शंभर गोंदजी काळभोर कसबे पुण्यास आणील त्यास आणूं देणें. कोणेविशीं मुजाहिम न होणें. हाशीलाचा तगादा न करणें. ह्मणोन दस्तक.

इ. स. १७५५–५६. सीत खमसेन मया व अलफ. सवाल ८.

[४०२] रा० जनार्दन बल्लाळ फडणीस यांजकडील जळाऊ लांकडें सालाबादप्रमाणें रानांत तोडतील त्यास तोडूं देणें मुजाहिम न होणें ह्मणून पत्रें मोकदमांसः—

१ मौजे आधलें तर्फ पौन-मावळ.

१ मौजे कातर खडक तर्फ पौनमावळ.

---

(400) The houses of ryots in Prant Junnar having been burnt during the Mogal invasion, the grant of the following materials required for building new houses is sanctioned.

1751-52 A. D.

Grass bundles one lac to be supplied by Sinaji Naik Berad out of the Randhedharwadi Kuran.

Letters directing that the ryots requiring beams and rafters for constructing new houses should be permitted to cut and remove them.

1 To the person in charge of the Kuran at Randha.

1 To Meghashyam Bapuji directing him to allow the material to be removed from the Kuran at Anjanpur.

(401) Order was issued for allowing wood required for the construction of a new house at Parvati by Janardan Ballal Phadnis, to be brought from Savalya Ghaut without duty.

1754-55 A. D.

(402) Letters to the Patels of Mauza Andhale and Katar Khadak in Tarf Paun Maval. Permit the cutting of fuel in your forests for the use of Janardan Ballal Fadnis as is usual every year.

1755-56 A. D.

इ. स. १७६०-६१.
इहिदे सीतेन
मया व अलफ.
जिल्काद २६.

[४०३] वेदमूर्ती रा० शंकरभट खरे वस्ती मौजे हेदवी, तर्फ गुहागर, यांनीं हुजूर येऊन विदित केलें कीं, मौजे मजकुरीं पांच सात झाडें आहेत. त्यांपैकीं आपल्या घराजवळ कोस एक झाड आहे, त्याजवर काळंबी बसोन मध होतो. त्यापैकीं निमे सरकारांत घ्यावा, निमे आह्मीं घ्यावा याप्रमाणें अंगऱ्याचे अंमलांत चालत होतें, त्याप्रमाणें सरकारांतून करार करून द्यावें ह्मणून त्यावरून तुह्मांस सनद सादर केली असे. तरी भटजीचे घराजवळ एक झाड असेल त्याजवर साल दरसाल मध निघेल त्यापैकीं पेशजीप्रमाणें निमे सरकारांत घेत जाणें, व निमे भटजीस देत जाणें. ह्मणून चिमाजी माणकर नामजाद तालुका अंजनवेल यास रसानगी यादी सनद १.

इ. स. १७६०-६१.
इहिदे सीतेन मया
व अलफ.
रविलावल १४.

[४०४] वेदमूर्ती रा० दिवाकर भट गोडबोले यांणीं कल्याणास घर बांधावयास लांकडें खरेदी केलीं आहेत. त्यास सरकारचा शिरस्ता दर शेंकडा लांकडें पांच घ्यावयाचा आहे. तो न घ्यावा ह्मणोन भटजींनीं हुजूर विनंती केली. त्याजवरून ही सनद तुह्मास सादर केली असे. तरी भटजीपासून शिरस्तियाचीं लांकडें न घेणें. घरापुरतीं लांकडें आणूं देणें, ह्मणोन बाजी शंकर प्रांत कल्याण भिवंडी याचे नांवें सनद १.
रसानगी यादी.

ह–मामलेदार, कमावीसदार जमीन महसुलाचे मक्तेदार आणि खोत.

इ. स. १७४०-४१.
इहिदे अर्बैन
मया व अलफ.
जमादिलाखर २६.

[४०५] ताहा महादलिंग जंगम व संभाजी पडवळ व रयेत मौजे नांदवी तर्फ गोवेले व बाळकोजी गवसकर पाटील मौजे चिचोली तर्फ गोरेगांव यास कौल लेहून दिला यैसेजे. तुह्मी हुजूर कसबे पुण्याचे मुकामीं येऊन अर्ज केला कीं, सरकारी गांव खोती

बितपसील:—

---

(403) Shankarbhat Khare of Hedvi in Taraf Guhagar, represented that
1760-61 A. D. during the administration of Angria, he used to receive half the quantity of honey obtained from hives on a tree near his house, and prayed that the practice might be continued. His prayer was granted.

(404) A man purchasing wood for the construction of a house in Prant
1760-61 A. D. Kalyan was required to surrender to Government 5 pieces out of every hundred purchased by him.

(405) The Khoti watan of Nandvi Dhabhole in Tarf Govele &c. belonged
1740-41 A. D. to Government. Shekh Mahamed was appointed the agent of Government to carry on the duties of the watan. The ryot

तर्फ गोवेले.
१ मौजे नांदवी,
१ मौजे दाभोळे,
१ मौजे टोळखुर्द,
एकून ३

तर्फ गोरेगांव.
१ चिचावली,
१ मलखंड कसबे गोरेगांव.
एकून २

एकून चार गांव मलखंडें कसबे गोरेगांव येथील कारभार शेख महंमद मुरजूका यास साहेबीं सांगितला आहे. त्यास हा कारभारी रयतेस पुरवत नाहीं. तर यास दूर करून गांवचा मक्ता आहे त्याखेरीज खोतीचा नफा जीवन मवाफिक सरकारांत घेऊन गांव आमचे स्वाधीन करावे व सरकारची शेरी, व कामंथ, व मलखंडे व वोसाड जमीन, व सरकाचे अर्धेल आहेत ते आमचे स्वाधीन करावे ह्मणून अर्ज केला. त्यावरून मनास आणून, मामुरीवर व रयेतीवर नजर देऊन सन मजकुरापासून सरकारची शेरी व कामथ, व मलखंडे, व ओसाड जमीन, व सरकारचे अर्धेल तुमचे स्वाधीन करून कीर्दी पावसाळी व उन्हाळी करार बेरीजः—

सन मजकूर,

८८॥३॥१॥ बरहुकूम मक्ता गल्ला खंडी.

२९ खोतीचा नफा
५० नक्त गल्ला खंडी.
२२।२ भात.
२॥३ काठण.
२५

नक्त रुपये ५०
गल्ला कैली खंडी. ११३॥३॥१॥

सन इसन्ने

बरहुकूम मक्ता गल्ला खंडी.
१०३॥३॥१॥

खोतीचा नफा.
नक्त.
५०
गल्ला
२२।२ भात.
२॥३ काठण
२५

नक्त रुपये ५०
गल्ला कैली खंडी. १२८॥३॥१॥

सन सलास.

बरहुकूम मक्ता गल्ला कैली खंडी
११९८२॥।

खोतीचा नफा
नक्त रुपये
५०
गल्ला खंडी
२२।२ भात
२॥३ काठण
२५

लंग

being dissatisfied with the agent, offered to pay to Government the amount of the farm (agreed upon by the agent) together with the profits of the watan, if the management were intrusted to them. The offer was accepted.

नक्त रुपये	गल्ला खंडी
५०	१४४८२॥।

येणेंप्रमाणें तीसाला करार केला आहे तर मक्ते याची बेरीज माहालचे शिरस्तेप्रमाणें व खोतीचा नफा नेमणूकप्रमाणें सालाचे साल सरकारांत उगवणी करून सुखरूप राहाणें, पेस्तर सालापासून सरकारचा ऊस जमीन बिघे ८२॥ अडीच तुह्मी लावून द्यावासा करार केला आहे त्याप्रमाणें लाऊन देणें. उसास तूस व जो खर्च लागेल तो सरकारांतून दिल्हा जाईल ह्मणोन कौल लिहून दिल्हा.

[४०६] त्रिंबक हरि कमावीसदार सरकार हांडे महाल मजकूरची नेमणूक:—

दिमत खासा सालीना रुपये.

इ. स. १७४०-४१.
इहिदे अर्बैन
मया व अलफ.
रजब १३.

१००० खासा.

६६० पालखी दरमाहे रुपये ६० इस्तकबील छ १ साबानपासून.

एकून अकरमाही कब्ज, बारमाही चाकरी.

७५०० राऊत ५० पन्नास एकून.

९१६०

नवहजार एकशेंसाठ करार केले असेत.

प्यादे असामी २०० यास दरमाहा अजमास अडीच, पावणेतीन, अथवा तीन याखेरीज जमातदारास कांहीं थोडेंबहुत अधीक करणें लागेल तर करणें, जाहले चाकरीचा पैका देणें. दसमाही अकरमाही वजा न करणें.

चौकीवर कारकून असामी १२ यासी दरमाहा दर असामीस रुपये ३॥ साडेतीनप्रमाणें देऊन ठेवणें. काम नसेल तेव्हां दूर करणें.

कारकून दरमाहा रुपये,

---

(406) The following charge on account of the establishment to be kept by Trimbak Hari Kamavisdar of Sirkar Hande was sanctioned.

1740-41 A. D.

Rs. 1000 The Kamavisdar.

" 660 Palanquin for 11 months at Rs. 60 per month. Service to be taken for 12 months.

" 7500 Troopers 50.

1. Two hundred peons to be entertained on Rs. 2-8. Rs. 2-12. or Rs. 3 each per month; the salary to be payable for 12 months.

1. Twelve Karkuns to be employed when necessary at the chowkis (out posts) at Rs. 3-8 each per mensem.

Karkuns at the following monthly salaries payable for 10 months, service being taken for 12 months.

२५ मजमदार २५ नारो राम फडणीस २५ शिवाजी दादाजी चिटणीस २५ शिरमाजी आवजी २० जनार्दन भास्कर १५ विसाजी यादव १५ भिकाजी तानदेव १२ बाबुजी त्रिमल १२ गोविंद शिवदेव १५ मोरी शानराज १२ शिवाजी राम १२ वेंकाजी अनंत १५ गिरमाजी निसबत सदाशिव भट पटवर्धन. (एकून २२८.) सदरहू दोनशेंअठ्ठावीस रुपये तेरा असामींस दरमाहे करार केले आहेत. बारमाही चाकरी दसमाही कबज करून पावणें.

येणेंप्रमाणें चार कलमें करार केलीं असेत. सदरहूप्रमाणें सरकार मजकूरचे ऐवजापैकीं पावते करणें ह्मणोन मशारनिल्हेच्या नांवें सनद १.

[४०७] परगणे भूपाल निसबत रामचंद्र बल्लाळ कमावीसदार यास सनदाः—

इ. स. १७४३–४४. अर्बा अर्बैन मया व अलफ. साबान ३.

तुह्मांस परगणे मजकुरची कमावीस सांगितली असे. इमानें इतबारें वर्तोन सेवा करीत जाणें तुह्मांस माहाल मजकूर करार रुपये,

७००० तुह्मांस वेतन, रसद पावणेदोन लाख रुपयास दरसदे ४ रुपयेप्रमाणें.

१६२० शिबंदी करार.

१५०० स्वार १० दरअसामीस १५० प्रमाणें.

१२० प्यादे ५ दरमाहे ३ येकूण दरमाहे १५ प्रमाणें आठमाही.

१६२०

२२४ किरकोळ असामी आठमाही करार.

१२८ जासूद ४ दरमाहे ४ प्रमाणें दरमाहे १६ प्रमाणें आठमाही.

२४ चोपदार १ दरमाहे ३ येकूण आठमाही.

३२ दिवट्या १ दरमाहे ४ येकूण आठमाही.

४० आफ्तागिरा १ दरमाहे ५ येकूण आठमाही.

२२४

--Rs.	25	Majumdar
"	25	Fadnis
"	25	Chitnis
"	25	one Karkun
"	20	one Karkun
"	60	four Karkuns on Rs. 15 each
"	48	four Karkuns on Rs. 12 each

(407) 1743-44 A. D. The remuneration of the Kamavisdar of Bhopal was fixed at Rs 4 per cent of the revenue received.

७५० तुह्मांस बक्षीस.
५०० पालखीबद्दल.
२५० कड्याबद्दल.
७५०

९५९४

येणेंप्रमाणें करार करून दिल्हे असेत. परगणे मजकूरचे ऐवजीं घेणें. ह्मणोन सनद १.

तुह्मांपासून मामल्याची रसद रुपये १७५००० एकलाख पंचाहत्तरहजार रसद देखील दिवाणगिरी व मजमु व फडनीसी घेतली असे यास व्याज दरमाहे दरसदे रुपये १॥ प्रमाणें करार केलें असे. जाले मुदतीचें व्याज व मुदल हिशेब करून परगणे मजकूरचे ऐवजीं उगवून घेणें. महालीं ऐवज उगविला नाहीं, तरी, व्याजासुद्धां सरकारांतून दिला जाईल. रसदेचे रुपये माहालीं ज्या दिवशीं पदरीं पडतील त्या दिवसापासून साहुकाराचे पदरीं पडे तोंपर्यंत देखील साहुकारी मुदत पाऊण महिन्याची करार करून दिल्ही असे. तेथून व्याज पुढें खुंटलें. व हुंडणावळ रसदे रुपयास व रसदेचे व्याजास देखील दरसदे रुपये ५ प्रमाणें करार केले असेत. परगणे मजकूरचे ऐवजीं मजुरा दिले जातील. सदरहु रसदेचा भरणा सरकारांत करून जाब घेणें. तेणेंप्रमाणें व्याजास मित्या लागतील. ह्मणोन सनद १.

येणेंप्रमाणें दोन सनदा लिहून दिल्ह्या असेत.

इ. स. १७४४–४५.
खमस अर्बैन मया व अलफ
सफर १९.

[४०८] परगणे मनोर येथील मक्ता तीसाला नरोत्तम भगवंत परदेशी यासी दिल्हा होता त्यास परगणे मजकूरची रयत हुजूर येऊन फिर्याद जाली. त्यास रजावद नाहीं. याजकरितां रयतेचें वृत्त मनास आणून मक्ता त्याजकडून दूर करून रघुनाथ विठ्ठल व केशव भट आठवले यासी खोती करार करून सांगितली असे. इस्तकबील सन मजकूर तागाईत सन सबा अर्बैन तीसाला ऐन जिनस व नक्तबाब देखील नदी गर्क व जंगल गर्क व दर्या गर्क जमीन व भुताले गांव व देशमुखीचे गांव कुलबाब कुलकानु मक्ता करार केला असे.

× × × × × × × × ×

1744-45 A. D.

(408) The (land revenue) farm for 3 years of the Pargana of Manora, was given to Narotam Bhagwant. The ryot of the Pargana being dissatisfied with him, laid a complaint before the Huzur. The farm was therefore cancelled.

[४५४] परगणे सीरोज येथून बऱ्हाणपुरी हत्ती, घोडे वगैरे जिन्नस हरबाब रवाना जाला तरी त्याचा हशील येथें घ्यावा. बऱ्हाणपुरीं कांहीं घेऊं नये. पानसुपारीचा शिरस्ता काय असेल तो मात्र घ्यावा, ऐसा पहिल्यापासून पडला आहे. व तेथून हरजिन्नस रवाना जाला तरी तेथें हाशील घ्यावा; मग सिरोजेस घेऊं नये. याप्रमाणें शिरस्ता असतां शिरोजेस हाशील चुकला असतां तुह्मीं तेथें दुबार हाशील मागतां, ह्मणून विदीत जालें. त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तरी सुदामत ज्याप्रमाणें रहदारीचा शिरस्ता चालत आला असेल त्याप्रमाणें करणें, (नवीन कांहीं न करणें) ह्मणोन शंकराजी निकम यासी पत्र १.

इ. स. १७४६।४७
सबा अर्बैन मया
व अलफ.
जिलकाद २२.

[४५५] परगणे माहिम येथील जकातीचा मामला पेस्तर सालापासून तुह्मांस सांगितला असे. मक्ता बितपशील:—

सन समान अर्बैन इस्तकबील अवलसाल तागाईत अखेरसाल मक्ता रुपये:—

२४९० बरहुकूम गुदस्त.
१२१० जाजती सालमजकूर.
३७००

तपसील.

१२३३ तूर्त रसद.
२४६७ दर माहे हप्तेबंदी.

३०८ कार्तिक शुद्ध १
३०८ मार्गशीर्ष शुद्ध १
३०८ पौष शुद्ध १
३०८ माघ शुद्ध १
३०८ फाल्गून शुद्ध १
३०९ चैत्र शुद्ध १
३०९ वैशाख शुद्ध १
३०९ ज्येष्ठ शुद्ध १
एकूण २४६७.

३७००

सन तीसा अर्बैन

बरहुकूम गुदस्त मक्ता रुपये ३७००

तपसील.

१२३३ तूर्त रसद.
२४६७ दरमाहे हप्तेबंदी गुदस्ताप्रमाणें.
३७००

सन खमसेन

बरहुकूम गुदस्त मक्ता रुपये ३७००.

तपसील:—

१२३३ तूर्त रसद.
२४६७ दरमहा हप्तेबंदी गुदस्तप्रमाणें.
३७००

---

(454) 1745-46 A. D. On goods passing between Siroj and Barhânpur octroi duty was charged at only one place.

(455) 1746-47 A. D. The Mâmlâ of octroi in Pargana Mâhim was given for ready payment of Rs. 3700.

येणेंप्रमाणें सन समान तीन हजार सातशें, व सन तीसा तीन हजार सातशें, व सन खमसेन तीन हजार सातशें, सदरहु प्रमाणें सालाचे साल करार केले असेत. मुदती बरहुकूम सालाचे साल उगवणी सरकारांत करून पावलीयाचीं कबजें घेणें, तेणेंप्रमाणें मजुरा असे. याखेरीज जाजती आकार होईल तो महाल मजकूर खर्च करणें. पेशजीचा कमावीसदार अमल करीत होता, त्याप्रमाणें तुम्ही अमल करणें. जाजती करावयास प्रयोजन नाहीं, म्हणून त्रिंबक केशव याचे नांवें सनद १.

(४५६) जकात बंदर रोहें वगैरे जकातीचा इजारा सालगुदस्ता राघो हरि याजकडे होता. तो सालमजकुरीं त्याजकडून दूर करून, तुह्मांस मामला सांगितला असे. मक्ता सालें बितपसील:—

इ. स. १७४९–५०. खमसेन मया व अलफ. रमजान ८.

सालमजकूर सन खमसेन मक्ता इस्तकबील छ ८ साबान सन मजकूर तागाईत छ ८ साबान सन इहिदे खमसेन बेरीज रुपये:—

४४७१ बरहुकूम गुदस्त
४४०१ ऐन
७० बाजार पेठ कसबे तळोदे देखील
४४७१ बसक बछापा.
५३० जाजती चढ साल मजकूर देखील बाजार निजामपूर बसक
५००१

सनइहिदे खमसेन इस्तकबील छ. ८ साबान सन मजकूर तागाईत छ. ८ साबान सन इसन्ने खमसेन मक्ता बरहुकूम गुदस्त रुपये ५००१

तपसील.

१५०० रसद तूर्त.
३५०१ दरमाहे गुदस्त प्रमाणें
५००१

(456) The octroi revenue of the post of Rohe was farmed out for one year for Rs. 5001 and it was ordered that the tax should be levied at the old rates on the merchandize coming by land or by sea, and on the sale of animals.

1749-50 A. D.

तपसील:—

१५०० रसदतूर्त.

३५०१ दर माहे शु॥ १५

४५० कार्तिक.

४५० मार्गशीर्ष.

४५० पौष.

४५० माघ.

४५० फाल्गुन.

४६० चैत्र.

४०१ वैशाख.

४०० ज्येष्ठ.

३५०१

५००१

सन इसने खमसेन इस्तकबील छ. ८ साबान साल मजकूर तागाईत छ. ८ साबान सन सलास मत्ता बरहुकूम गुदस्त जमा बेरीज रुपये ५००१

तपसील:—

१५०० रसदतूर्त

३५०१ हस्तेबंदी दरमाहे गुदस्त प्रमाणें.

६००१

येणेंप्रमाणें सन खमसेन पांच हजार एक रुपया, व सन इहिदे खमसेन पांच हजार एक रुपया, व सन इसन्ने खमसेन पांच हजार एक रुपया, याप्रमाणें ती साला करार केला असे. सदरहुप्रमाणें सालाचे साल मुदतीप्रमाणें सरकारांत ऐवज पावता करून पावलीयाचे जाब घेणें; तेणेंप्रमाणें मजुरा असे. पेशजीप्रमाणें, ज्या ठिकाणीं जलमार्ग, उभा मार्ग, शिंग, शिंगोटी अंमल चालत होता, त्याप्रमाणें तुम्ही अंमल करणें. जाजती करावयास प्रयोजन नाहीं, ह्मणोन नारो हरि यास सनद १.

[४५७] हरिभक्त परायण रा. तिमया गोसावी यांचे बैलसर ७५ पाऊणशें खेरीज फिरंगाण, कोंकणांत हरएक जागा जाऊन तांदूळ, व मीठ, नारळ वगैरे हर जिन्नस भरून तळघाट, बोरघाट, कसबे नाशिकास एक खेप आणितात, त्यास जकातविशीं दस्तक. १.

इ. स. १७५०–५१
इहिदे खमसेन
मया व अलफ
रजब ४.

(457) A pass port exempting from the payment of octroi, one trip of 75 bullocks belonging to Timayá Gosávi, conveying rice, salt, cocoa-nuts &c. to Nasik, via that of Bore Ghauts from any part of the kokan, the Portuguese settlements excepted.

1750-51 A. D.

[४५८] गंगाजी जाधव वस्ती पेठ सोमवार कसबे पुणें याचे बैलसर ६० खानदेशांत जाऊन सूत व खाद्या व छिटें वगैरे जिन्नस खरेदी करून, खेपा ३ तीन पुण्यास आणतील. त्याला कोणेविशीं मुजाहिम न होणें, ह्मणून दस्तक देऊन सरकारची नजर करार केली; देखील पुणें जुन्नर बरहुकूम याद रुपयेः—

इ. स. १७५०–५१
इहिदे खमसेन
मया व अलफ.
जिल्हेज ३.

२२६ बरहुकूम गुदस्त.
१० जाजती सालमजकूर.

२३६ यास मुदतीः–
१३५ कार्तिक अखेर
१०१ माघ अखेर

२३६

[४५९] जकाती प्रांत पुणें व जुन्नर निसबत अंताजी त्रिंबक व मोरो कृष्ण यांजकडे जकातीचा मक्ता आहे; त्यांस आज पावेतों गोसावी घोडीं, उंट वगैरे माल आणून विकीत होते. त्यांस जकात कोणी अमलदार घेत नव्हता, व हेही घेत नव्हते. हल्लीं गोसावी यापासून, सत्रा आठराशें दोन हजार, दोन हजार रुपये पावेतों जकात घेतली आहे. हे सदरहु रुपये मक्तीयाचे बेरीज खेरीज सरकारांत द्यावे. आज पावेतों जकाती गोसावी याजपासून घेतली असेल, व अखेर साल पावेतों घेतील, तो ऐवज मक्ते याखेरीज सरकारांत द्यावा. येणेंप्रमाणें रसानगी भगवंत त्रिंबक मजमदार दिमत पागा लखजी बोधने.

इ. स. १७५०–५१
इहिदे खमसेन
मया व अलफ.
रबिलावल ७.

---

(458) A permit directing that no obstruction should be offered to 60 bullocks of Gangáji Jádhav of Somvár Peth Poona, laden with Khádyá (course cloth) & coloured cloth, purchased in Khándesh, is issued and the following Nazar is agreed upon.

1750-51 A. D.

Rs. 226 as per last year.
10 addition for the current year.

236.

To be paid.
135 At the end of Kártik.
101 At the end of Mágha.

(459) The farmers of the octroi of Pránt Poona and Junnar were Antáji Trimbak and Moro Krishna. Neither they nor any of the previous farmers levied any duty from Gosávis, selling horses, camels and other furniture. Such duty amounting to Rs. 1700 or 1800 or 2000 was however in this year levied by Antáji & Moro. They were directed to surrender the amount to Government, in addition to the amount previously contracted for.

1750-51 A. D.

[४६०] बाजार लष्कर येथील हाजारा महादशेट शेठ्या वीरकर याजकडे दिल्हा असे. इस्तकबील माघ शुद्ध १५ पासून दरमहा रुपये साडेपांचशें करार केले असेत. सरकारांत दरमहा साडेपांचशें वसूल घेत जावा; येणेंप्रमाणें करार केला असे. रसानगी यादी.

इ. स. १७५०–५१
इहिदे खमसेन
मया व अलफ.
रबिलाखर ९.

याखेरीज पेशजीपासून रा० महादाजी अंबाजी याची असामी आहे; त्याचा ऐवज सरकारांत घ्यावा. करार केला असे. रसानगी यादी.

[४६१] कानुजाबता, महाल कोठा, फरचा, व मग्यारा कोठा, शहर अमदाबाद येथें करार करून दिल्हा. शेठ्ये महाजन व कानगोवर यांणीं हुजूर येऊन अर्ज केला कीं, शहर मजकुरीं पूर्वीं अलमगीर पातशाह याचे कारकीर्दींत हाशील चालत होता, त्यासी अलीकडे सुभे नवे जाहले, यांणीं पातशाही शिरस्त्याशिवाय जो सुभा जाहला त्याणें मनमानेसा जबरदस्तीनें जास्ती हासील घेत आला. यामुळें आमदरफ्ती होत नाहीं. उदीम व्यवसाय सर्व राहिला. सावकार बेपारी वगैरे लोक परागंदा जाले. शहरची खराबी बहुत जाली आहे. ऐशीयासी हल्लीं अमल सरकारांत जाला. याकरितां साहेबी रयतेवर कृपाळु होऊन, व शहरचे आबादानीवर नजर देऊन, नवे सुभे जाजती हाशील घेत आले आहेत, हा माफ करावा. पूर्वीं पातशाही शिरस्ते आहेत, ते मनास आणून, त्याप्रमाणें करार करून हाशील घेतलीयानें हरएक जागा व वाद राहून सावकार वगैरे लोक माल आणून आमदरफ्ती करतील; व रयेत परागंदा झाली आहे, ते येऊन वसाहत करतील. शहरांत उदीम व्यवसाय करून आबादानी होईल म्हणून; त्याजवरून बराय अर्ज खातरेस आणून, रयतीवर कृपाळु होऊन, शहरचे आबादानीवर नजर देऊन, अलीकडील सुभ्यांनीं जाजती अमल केला आहे, तो माफ केला असे.

इ. स. १७५२–५३
सलास खमसेन
मया व अलफ.
जमादिलाखर १५.

---

(460) The farm of the revenue from the Cantonment Market, has been given to Mahâdshet Shetyá Virkar, on condition of his paying Rs. 550 per month from the 15th of Màgh (Bright half).

1750-51 A. D.

(461) The Shetye and Mahájan and Kâji of Ahmedàbád, represented that the rates at which, octroi was levied during the reign of Emperor Alumgir were increased at their pleasure by the several Subhedárs who afterwards held charge, and that consequently trade has suffered and the traders and merchants had left the city. Having regard to the prosperity of the city, Government was pleased to restore the old octroi rates of the time of Alumgir. These were as follows:—

1752-53 A. D.

अलमगीर पातशहा याचे कारकीर्दीत शिरस्ते आहेत, त्याप्रमाणें हल्लीं करार करून दिले असे. बितपसील:—

हिंदूवरी हांशील.

कपडा छापा रुपये १००० एक हजार रुपयांचे किमतीस हांशील
५० ऐन हांशील, दरसदे रुपये ५ पांच-
७॥~ दस्तुरी. प्रमाणें.
५७॥~
साडेसत्तावन रुपये एक आणा.

रेशीम कच्चें गठडी १ एक, एकूण वजन पक्के ८३ तीन मण अमदानी हरएक जागाहून येईल, त्यास मालदाखलाई, बंगाला हांशील रुपये
३॥ तफावत दाखला.
३।≡ दस्तुरी.
३ तलब दाखला गठडीस.
९॥।≡

किराणा जिन्नस. रुपये एक हजार रुपयांच्या जिनसास हांशील रुपये
५० ऐन हांशील, दरसदे रुपये ५ पांच- प्रमाणें
७॥~ दस्तुरी.
५७॥~
साडेसत्तावन रुपये एक आणा करार केला असेत. घेत जाणें. कलम १.

किराणा तफावत दाखला हरएक जागाहून येईल, त्यास दर हजारीं दस्तुरी दाखला हांशील रुपये
२॥ तफावत दाखला.
४।~ दस्तुरी.
६॥।~
पावणेंसात रुपये दुवल करार केले असेत. कलम १.

Rates for Hindus.

(*a*) Tax for stamping cloth of the value of Rs. 1000.
Rs. 50 duty proper at Rs. 5 per cent.
Rs. 7–9 Dasturi.
57-9.

(*b*) Tax on a bundle of silk weighing 3 mounds coming from any part of the country.
Rs. 3–8 Tafáwat Dákhlá.
" 3–7 Dasturi.
" 3 Talab Dákhlá.
9–15

(*c*) Tax on groceries worth Rs. 1000.
Rs. 50 duty proper at Rs. 5 per cent.
Rs. 7–9 Dasturi.
57-9

(*d*) Tax on groceries coming from any part of the country.
2-8 Tafávat Dákhlá.
4-5 Dasturi.
6-13

(*e*) Tax on glass ware worth Rs. 1000.
2-8 Tafâwat Dákhlá.
4-5 Dusturi.
6-13

(*f*) Tax on glass ware worth Rs. 1000.
50 Tax proper at Rs. 5 per cent.
7-9 Dasturi.
57-9

तीन मण रेशीम यासी पावणे दाहा रुपये तीन आणे प्रमाणें, दर मणीं ३।- सवातीन दुवल करार केले असेत. कलम १.

मण्यार कोठा, माल, रुपये १००० एक हजार रुपयांचा, यासी हांशील रुपये
५० ऐन दर सदे रुपये ५
७॥- दस्तुरी.
५७॥-
साडे सत्तावन रुपये दुवल करार केला असे. घेत जाणें. कलम १.

दाखलाई मण्यारा माल रुपये एक हजार यासी हांसील, हरएक जागाहून येईल त्यास दर हजारीं रुपये
२॥ ऐन तफावत दाखला.
४।-दस्तुरी.
६॥।-
पावणें सात रुपये दुवल करार केला असे. कलम १.

(एकूण) हिंदू कलमें ६.

मुसलमानावरील हांसील.

कापड छापा रुपये १००० रुपयांचे मालास हांशील रुपये
२५ ऐन हांशील हिंदूचे निमें दरसदे रुपये २॥ प्रमाणें.
७॥- दस्तुरी.
३२॥-

किराणा बाब जिन्नस रुपये १००० एक हजार रुपयाचा माल यासी हांशील
२५ ऐन हांशील हिंदूचे निमें दरसदे २॥ प्रमाणें.
७॥- दस्तुरी.
३२॥-

Rates for Mahomedens.

Half the rates of the duty proper imposed in cases nos (a) (b) and (f) above on the Hindus.

Rates for आरमणी (Armenians) वलंदेज (Hollanders) and फराशी (French) and other Europeans, to pay on all the clothes or other articles imported by them, the following for every one thousand Rupees worth of their merchandize.

Rs. 35 at Rs. 3-8 per hundred.
Rs. 7-9 Dasturi.
42-9

The Hollanders had further the concession of being required to pay in cases of nos. (d). and (e). above, half the rates imposed on Hindus.

साडे बत्तीस रुपये दुवल करार केला असे. घेत जाणें. कलम १.

रेशमी कच्चें गठडी १ एक, एकूण वजन पक्कें तीन मण हरएक जागाहून येईल त्यास दाखलाई व बंगाला बरहुकूम हिंदू प्रमाणें हाशील रुपये

३॥ तफावत दाखला.

३।≡ दस्तुरी.

३ तलब दाखला गठडीस.

९॥।≡

पावणे दाहा रुपये तीन आणे ३ मणास एकूण दर मणीं रुपये ३।- सवातीन दुवल प्रमाणें. कलम. १

तफावत दाखला माल मण्यारा हर एक जागाहून येईल, रुपये १००० एक हजार यासी हांशील रुपये,

२॥ तफावत दाखला.

४।- दस्तुरी.

६॥।- पावणें सात रुपये दुवल. १.

साडे बत्तीस रुपये दुवल करार केले असेत. घेत जाणें. कलम १.

तफावत दाखला किराणबाब, जिन्नस हरएक जागाहून येईल, किमत रुपये १००० एक हजार यासी दर हजारी दस्तुरी रुपये

२॥ तफावत दाखला.

४।- दस्तुरी.

६॥।-

पावणें सात रुपये दुवल करार केला असे. घेत जाणें. कलम. १

मण्यारा कोठा माल रुपये १००० एक हजार रुपयांचा यासी हांशील रुपये

२५ ऐन हांशील हिंदुचे निमें प्रमाणें दर सदे २॥ रुपये अडीच प्रमाणें.

७॥- दस्तुरी.

३२॥- साडेबत्तीस रुपये दुवल. १.

(एकूण) मुसलमान कलमें ६.

अरमणी, वलंदेज, व फरासीस वगैरे टोपीवाले, तमाम कापड हरजिन्नस माल रुपये एक हजार हाशील रुपये

३५ ऐन दरसदे रुपये ३॥ साडे तीन प्रमाणें.

७॥- दस्तुरी.

४२॥- एकूण साडे बेचाळीस रुपये दुवल करार केला असे. घेत जाणें. कलम १.

दाखलाई टोपीवाले पैकीं वलंदेजास मापा दर हजारीं मुकरर १। रुपये. सवा रुपये करार केला असे. घेत जाणें. कलम १.

येणेंप्रमाणें हिंदुवरी साहा कलमें व मुसलमानावरी साहा कलमें व वलंदेज टोपीवाले एक कलम व दाखलाई, टोपीवाले एक कलम याप्रमाणें करार करून दिल्हीं असे. सदरहु प्रमाणें वर्तणूक करीत जाणें. याखेरीज, चुकोन शिरस्ता राहिला असेल त्याची चौकशी करून सुदामत पातशाही शिरस्ता असेल त्याप्रमाणें हांशील घेत जाणें. येणेंप्रमाणें कानुजाबते करार करून दिल्हे असेत.

रसानगी यादी.

[ई]–छपा.

[४६२] घनशेट कर्जे यांचे नांवें सनद कीं, शहरपुणें येथील छपायतीची कमावीस तुम्हांस सांगितली असे. कलम वितपसील:—

इ० स० १७५४।५५
खमस खमसेन
मया व अलफ.
सफर ३.

बाहेरील कापड शहरांत येईल त्याजवर छापा करून किमतीवर दरसदे रुपये ५ पांच प्रमाणें घेत जावे. कलम १.

शहरांत नवें कापड होईल त्याचा शिरस्ता दर सदे रुपये २॥ अडीचप्रमाणें घेऊन छापीत जावें. कलम १.

पहिलें कापड शहरांत उदम्याचे घरीं आहे तें आणून छापावें. किमतीवर दर सदे रुपये २॥ अडीच घ्यावे. कलम १.

बिनछापी कापड जो विकील त्यापासून गुन्हेगारी घ्यावी. कलम १.

शिबंदीची नेमणूक सालीना रुपये

१००० कमावीसदार.
३७५ कारकून कमावीसदारांनीं ठेवावे ३.
३०० बाजे खर्च कागद वाहा व रोशनाई वगैरे खर्च. कलम १.
१६७५

---

(462) The Komávis of the duty of stamping cloth in the city of Poona, was entrusted to Ghanshet Karje on the followingco nditions:—

1754-55 A. D.

1. Every kind of cloth coming into the city from outside should be stamped and advalorem duty at Rs. 5 per cent should be levied on it.

1. Cloth already on hand with the traders in the city should be called for and stamped, and subjected to advalorem duty of Rs. 2-8 per cent.

1. New cloth manufactured in the city should also be stamped and subjected to advalorem duty of Rs. 2-8 per cent.

1. Any person selling unstamped cloth should be fined.

1. The requisite stamp should be obtained from Government. The stamping office should be held on the square in front of Samsher Bahàdur's house.

1. The following expenditure on this account was sanctioned.

1000 Pay of Komávisdár annual.
375 Do of 3 Kárkuns to be appointed by the Kamàvisdár.
300 Contingencies.
1675

छपायतीची कचेरी, समशेर बहादर याचे दरवाज्यापुढें पूर्वेकडील चौत्रा आहे, त्याजवर करावी. कचेरीचें साहित्य करावें. कलम १.

छापा सरकारांतून करून घ्यावा. कलम १.

येणेंप्रमाणें सात कलमें करार करून दिल्हीं असेत, तरी इमानें इतबारें वर्तोन चौकशीनें अंमल करणें. आणि ऐवज जमा होईल तो सरकारांत पावता करून पावलीयाचे जाब घेणें. पावणें सत्राशें रुपये महाल मजकुरचे नेमणूक करून दिल्ही आहे. त्याप्रमाणें कमाविसीचे ऐवजीं देणें याबरोबर सरकारांस द्यावे. येणेंप्रमाणें असामीः—

१ शिवब्रानाईक मजमदार, १ फडणीस, २ कारकून, २५ प्यादे (एकूण २९).

येणेंप्रमाणें एकुणतीस असामी सरकारांतून घ्यावे; त्यांचे वेतनाची सनद सादर होईल, त्याप्रमाणें वेतन देत जाणें. सदरहु कमाविसीचे ऐवजीं तुम्हाकडे रसद रुपये ५०००० पन्नास हजार करार यास व्याज दरमहा दरसदेस रुपये एकोत्रा शिरस्तेप्रमाणें करार केला असे. तरी सदरहूचा भरणा सरकारांत करून पावलीयाचे जाब घेणें. तेणेंप्रमाणें व्याजास मित्या लागतील, म्हणून सनद १.

(फ)–जिनसांच्या खरेदी विक्रीवरील कर.

(१) गाड्या.

[४६३] मल्हारजी गावंडा दिवव्या याणें मौजे धानोरें तर्फ चाकण, येथें गाडा एक किंमत ३५ पस्तीस रुपयांस विकत घेतला आहे. त्याची जकात दर रुपयास ≈ प्रमाणें ४।≈ सवाचार चवल आकार जाला. तो जकातदार मजकूरचे नांवें खेरीज तेनात खर्च लिहिणें; म्हणोन विसाजी बाबाजी कमावीसदार जकात प्रांत पुणें व जुन्नर यांस सनद १.

इ. स. १७५४-५५
खमस खमसेन
मया व अलफ.
साबान २४.

रसानगी हरि जिवाजी.

Ghanshet was directed to act honestly and with proper care and to remit the amounts collected to Government. The amount of expenditure above sanctioned should be paid out of the revenue collected. In addition to the above establishment one Mujumdár, one Fadnis, two Kárkuns and 25 peons were to be given by Government, and orders regarding their emoluments were to be issued afterwards. Ghanshet was further directed to pay into the treasury Rs. 50,000 and the rate of interest was fixed at Re 1 per cent per mensem.

(463) A cart was purchased for Rs. 35 at Danore in Taraf Chákana. Duty at annas two per Rupee of the purchase money was levied on account of the transaction.

1754-55 A. D.

२ तंबाकु.

[४६४] महादाजी अनंत हवालदार, मामले रेवदंडा, येथील तंबाकूचे रेदाचा मक्त देखील कारेला इस्तकबील सन सल्लास तागाईत सन समान, एकून साहासाला दिल्हा असे बितपसील:—

इ. स. १७४२–४३
सलास अर्बैन
मया व अलफ.
जिलकाद १०.

साल मजकूर सन सलास मक्ता.
बेरीज सालिना रुपये १००० पैकीं साहा महीने साल गुजरलें सबब वजा रुपये ५००
बाकी सन मजकूर अखेर साल तागाईत करार रुपये ५००.
सन अर्बा अर्बैन इस्तकबील अवल साल तागाईत अखेर सालकरार १०००रुपये.
सन खमस अर्बैन इस्तकबील अवल साल तागाईत अखेरसाल करार रुपये१०००.

सन सीत अर्बैन इस्तकबील अवल साल तागाईत अखेरसाल करार रुपये १०००
सन सबा अर्बैन इस्तकबील अवल साल तागाईत अखेरसाल करार रुपये
१००० सालगुदस्त.
१०० जाजती साल मजकूर.
११०० सन समान इस्तकबील अवल साल तागाईत अखेर साल करार रुपये
११०० साल गुदस्त.
१०० जाजती सालमजकूर.
१२००

येणेंप्रमाणें साहा साला मक्ता सनसलास पाचशें, व सन अर्बा एक हजार, व सन खमस एक हजार, व सीत १००० एक हजार, व सन सबा एक हजार एकशे, व सन समान एक हजार दोनशें, करार केले असेत. सदरहु प्रमाणें सालाचे साला उगवणी करणें. तंबाकु विकावयाचा शिरस्ता, शाही वजनें, दरमणीं किंमत रुपये ५॥= साडे पांच रुपये चवल प्रमाणें साहुकार लोकांस व उदमी लोकांस विकत देत जाणें; म्हणोन मशारनिल्हेचे नांवें रेदाचा कौल लेहून दिल्ह असे. १.

येविशीं मोराजी शिंदे नामजाद जंजीरे रेवदंडा यांस पत्र १.

---

(464) License for selling tobacco in Revdandá was given for Rs. 1000.
1742-43 A. D. The condition of the license was that tobacco should be sold at Rs. 5-10 per maund and to none but merchants and traders.

(४६६) शेख दाऊद दरकार खोत रैद तंबाकु प्रांत साष्टी देखील तर्फ आटगांव यास कौल लिहून दिल्हा कीं, प्रांत मजकूरचे व तर्फ मजकूरचे तमाखूचे रैद पेशजी खेरीज, आटगांव ऐन मक्ता रुपये अडतीसशें व शिबंदी सुभ्याहून पंचवीस प्यादे व पांच कारकून देविले होते, त्यांचा मुशारा साडे आठशें रुपये, एकूण चार हजार साडेसाशें दर साल द्यावे. ऐसा तीन सालांचा

इ. स. १७४२–४३
सलास अर्बैन
मया व अलफ.
साबान १४.

करार करून तुम्हास कौल सादर केला होता. त्यावरून तुम्ही हुजूर येऊन कित्येक आपलें वर्तमान जाहीर केलें. इजारा भारी पडला आहे, कांहीं रियात करावी, म्हणोन अर्ज केला. त्यावरून कृपाळु होऊन पंचवीस प्यादे व पांच कारकून सुभ्याहून द्यावे. ऐसा करार करून साडे आठशें रुपये तुम्हांकडे करार केले होते ते माफ करून, पांच प्यादे सुभ्याहून द्यावे, त्यांचा मुशाहिरा सरकारांतून पावतो त्याप्रमाणें सरकारांतून द्यावा. ऐसा करार करून मक्ता करार केला रुपये

३८०० ऐन प्रांत मजकूर.
५० तर्फ आटगांव, परगणे सायबान, येथील मक्ता हल्लीं तुम्हावर कृपाळु होऊन रियातीनें करार केला.

३८५०

एकूण तीन हजार साडे आठशें रुपये करार केले. यास हप्तेबंदी इस्तकबील अवल साल तागाईत अखेर साल एकूण मुदत माहे १२ बारा. दर माहे रुपये ३२०॥।≈ तीनशें पावणें एकवीस रुपये चवल प्रमाणें करार करून तीन सालें मक्ता तुम्हास करार करून दिल्हा असे. सदरहु प्रमाणें दरमहाचा दरमहा ऐवज तीन सालेंपर्यंत, सुभा ठाणें यास वसूल देत जाणें आणि पावलियाचे कबज घेत जाणें. तेणेंप्रमाणें मजुरा पडेल. तंबाकु विकावयाचा शिरस्ता, शाही वजनें, दरमणीं किंमत रुपये ५॥≈ साडे पांच रुपये चवल प्रमाणें घेऊन, साहुकार लोकांस व उदमी लोकांस विकत देत जाणें. रयतेस तंबाकु विकत एकंदर न देणें. ज्या गांवीं दुकान नसेल, त्या गांवचे रयतेस तंबाकु मण, दोन मण, अदमण पावेतों विकत देत जाणें. तंबाकूची वानगी व जकात सुदामत तीन चार सालें चालत आली आहे, त्याप्रमाणें जकातीचे

---

(465) License to sell tobacco in Prânt Salsette was given for 3 years to Shekh Daud Parkâr (Darkâr) for an annual payment of Rs. 3,800. The farmer was also bound to pay Rs. 850 in addition, on account of the remuneration of 25 peons and 5 Karkuns lent to him from the Subha. The farmer represented that the amount of the farm pressed very heavily upon him, and prayed for its reduction. The charge on account of establishment was remitted and the following amount only was levied:—

1742-43 A. D.

Rs. 3800 on account of the monopoly in Prânt Salsette.
50 Do Do in Taraf Atgaum newly granted.

खोताकडे देत जाणें. जाजती एकंदर न देणें. जागाजागा तमाखुचे रेदाचा बंदोबस्त करून सुखरूप राहणे. जाजती उपसर्ग लागणार नाहीं; म्हणोन कौल लेहून दिल्हा असे. १.

पांच प्यादे रामाजी महादेव याजकडून देविले असेत, नेहमीं देणें. रोज मरे यांबरोबर रोजमरा देत जाणें म्हणोन पत्र दिल्हें असे. १. येविशीं रामाजी महादेव यास पत्र दिल्हें असे.

(४६६) परगणे साष्टी व आटगांव येथील तंबाकूचे रेदांचा मक्ता सालमजकूरापासून तीन वर्षेपर्यंत शेख दाऊद दरकार यांस सांगितला होता. त्याजकडून दूर करून रामजी शिवाजी परभु यास सालमजकुरापासून चौसाला येणेंप्रमाणें करार करून दिल्हा असे. तपसील:—

इ० स० १७४८।४९
तीसा अर्बैन
मया व अलफ.
मोहरम ८.

सनतीसा सालमजकूर जमा मक्ता रुपये
७८५० बरहुकूम मक्ता पेशजी
२५० अंतस्त
८१००

पैकीं वजा, शेख दाऊद दरकार यास मुदत भोगिली. मुदत इस्तक बिल छ. ६ जमादिलावर तागाईत छ. १३ मोहरम, मुदत माहे ७। दर माहे रुपये ६५४। प्रमाणें रुपये ४७४१॥
१५० अंतस्थापैकीं
४८९१॥

पैकीं वजा सोड रुपये ९९१॥. बाकी शेख दाऊद दरकार याजपासून घ्यावे रुपये

सन खमसेन मक्ता इस्तकबील अवल साल तागाईत अखेर साल रुपये
८१०१ बरहुकूम गुदस्त
४०० जाजती सालमजकूर.
८५०१

सदरहूची वांटणी बारा महिन्यांवर बसवून महिन्याच्या महिना(न्या) वसूल घेणें.

सन इहिदे खमसेन मक्ता बरहुकूम गुदस्त, इस्तकबील अवल साल तागाईत अखेर साल जमा बेरीज रुपये ८५०१.

सदरहूची वांटणी बारा महिन्यांवर बसवून महिन्याच्या महिना(न्या) वसूल घेणें.

The farmer was directed to sell tobacco to none but traders and merchants and to these persons at Rs. 5-10 per maund. A maund or two of tobacco was also permitted to be sold to ryots of villages in which there were no shop-keepers. He was further directed to continue to pay as usual to the octroi farmer, the octroi chargeable on tobacco as also the customary present of the article in question.

(466) License to sell tobacco was formerly given to Daud Parkâr (Darkâr) for Rs. 8501. This sum was inclusive of Rs. 250 as secret money. Râmji Siwâji having bid for a larger sum, the license was given to him. It was stipulated that tobacco should be sold at the rate of Rs. 5-10 per maund and to none but traders and merchants.

1748-49 A. D.

३९०० तीन हजार नवशें. बाकी रामजी मजकूर याजकडे इस्तकबील छ. १४ मोहरम तागाईत अखेर साल मुदत, माहे ४॥। दर माहे ६'५४। प्रमाणें रुपये

३१०८॥

१०० अंतस्थपैकीं

३२०८॥

बतीसशें साडेआठ रुपये पावणें पांच महिन्यांवर वांटणी बसवून महिन्याचा वसूल घेणें.

सन इसन्ने खमसेन बरहुकूम गुदस्त, इस्तकबील अवलसाल तागाईत अखेर साल रुपये ८५०१

सदरहूची वांटणी बारा महिन्यांवर बसवून महिन्याच्या महिना वसूल घेणें.

येणें प्रमाणें साल मजकूर सनतीसा तीन हजार दोनशें साडे आठ, व सन खमसेन आठ हजार पांचशें एक, व सन इहिदे खमसेन आठ हजार पांचशें एक, वसन इसन्ने खमसेन आठ हजार पांचशें एक रुपया, याप्रमाणें चौसाला करार केला असे. तंबाकू विकावयाचा शिरस्ता शाही वजनें दर मणी रुपये ५॥= साडे पांच रुपये चवल प्रमाणें घेऊन साहुकारास व उदमी लोकांस विकत देत जावा. रयेतीस तंबाकू विकत एकंदर न द्यावा. व ज्या गांवीं दुकान नसेल, त्या गावच्या रयेतीस तंबाकू मण, दोन मण, अदमण पावेतों विकत देत जावा. तंबाकूची वानगी व जकात सुदामत सरकारच्या अमलापासून चालत आहे, त्याप्रमाणें जकातीचे खोताकडे देत जावी, जाजती देऊं; नये याप्रमाणें करार केला असे. तर याजपासून हमी घेऊन सदरहु प्रमाणें तुम्हीं यास पट्टा करून देणें. जकातीचे कमावीसदाराकडे तंब्राकूचे वानगीचा व जकातीचा अंमल आहे. त्याचा मक्ता पेशजी कमावीसदारांनीं करार करून दिला आहे, तो तुम्हीं मनांस आणून त्याप्रमाणें तुम्ही रामजी मजकूर याजकडे करार करून देणें. तंबाकूचे बंदोबस्ताकारणें सुभ्याहून पांच प्यादे पेशजीप्रमाणें देविले आहेत, त्याप्रमाणें नेमून देणें. शेख दाऊद दरकार याजकडे साल मजकूरचे रेंदाचे ऐवजीं रुपये३९०० तीन हजार नवशें सोड देऊन करार केले आहेत. त्याचा वसूल घेणें म्हणोन रामाजी महादेव नामजाद प्रांत साष्टी यांस सनद १.

(३). नारळ.

(४६७) उमर डावील व अबदुल कादीर खोत नारळ तर्फ आगाशी, प्रांत वसई येथील नारळाचे खोतीचा मक्ता इस्तकबील अवल साल तागाईत अखेर साल करार रुपये:—

इ. स. १७४४।४५
खमस अबैन
मया व अलफ.
जमादिलाखर १६.

(467) License for purchasing cocoanuts from the ryots and selling them to traders in Tarf A'gáshi of Prànt Bassein was given to Abdul Kàdar for Rs. 1501.

1744–45 A. D.

१२०० बरहुकूम गुदस्त.
३०१ जाजती सालमजकूर.
१५०१

येणेंप्रमाणें एक हजार पांचशें एक रुपया करार केला असे. सरकारांत वसूल देऊन पावली याचीं कबजें घेणें. तर्फ मजकूरचे रयतेपासून नारळ तुम्हींच विकत घेऊन सर्व उदमीयांस तुम्हींच विकत देत जाणें. सरकारचा माल जाईल अगर सरकारचे दस्तकाचा माल जाईल त्यास तुह्मीं मुजाहीम न होणें. सदरहु कलमाचे सदरहु इजारी यांत तुह्मांस मजरा पडणार नाहीं. येणेंप्रमाणें करार करून कौल लिहून दिल्हा असे.

सदरहु पंधराशें रुपयांची निशा महमद साले याणें शंकराजी केशव याची केली असे. शंकराजी केशव यांणीं हुजूर निशा केली असे.

(४)—तूप.

[४६८] नारो हरि याजकडे प्रांत राजपुरी येथील गौळीयाबद्दल तुपाचा मक्ता मशारनिल्हेकडे करार केला. तूप वजन कच्चें खंडी

इ० स० १७४८।४९
तीसा अर्बैन मया व अलफ.
रमजान २३.

६॥·॥ सालमजकूर सनतीसा

२८८५ मामले तळें,
१।१॥ बरहुकूम गुदस्त.
·॥३।५ जाजती चढ.
२८८५

१॥ प्रांत घोसाळें.
·॥२॥ बरहुकूम गुदस्त.
·॥२॥ जाजती चढ.
१॥

२।·।५ तर्पे निजामपूर.
१॥·। बरहुकूम गुदस्त.
·॥८५ जाजती चढ.
२।·।५

॥ उक्ता चढजाजती.
६॥·॥

(468) The farm of the levy of Ghee from the cowherds of Prânt Râjpuri
1748-49 A. D. was given to Nâro Hari for 6½ Khandis and ½ maund.

६॥-॥ बरहुकूम गुदस्त सन खमसेन.
६॥-॥ सन इहिदे खमसेन. बरहुकूम गुदस्त.

१९॥१॥

एकूण साडे एकोणीस खंडी दीड मण प्रमाणें सनतीसा सालमजकूर साडे सहा खंडी अदमण याप्रमाणें, ती साला, साल दरसाल करार केले असे. तरी सालाचे साल, सदरहु प्रमाणें सरकारांत वसूल देऊन पावली याचीं कबजें घेणें. तेणेंप्रमाणें मजुरा असे. सन समानांत नवे गौळी आले, त्यांच्या म्हशी सर ६३ त्रेसष्ट तुह्मीं सांगितल्या. तरी त्रेसष्ट शिवाय ह्मशी असतील त्यांचा वसूल सरकारांत घ्यावा. तुह्मांस मक्त्यांत मजुरा पडणार नाहीं. पेस्तर जाजती गौळी आणाल ते मक्तीयामध्यें असेत. आफ्त फितरत जाली तर मनास आणून मजुरा दिली जाईल. या खेरीज गौळीयांचीं कलमें:—

नवें कूळ परमुलखीं येईल त्यास घर देणें एकसाला पाल. कलम १.

गौळी जिराईत करतील त्यांस वेट बेगार व पेंढा माफ कलम १.

गौळ्यास वऱ्हाड देणें व पाटदाम माफ कलम १.

एकूण तीन कलमें पेशजीचे शिरस्तेप्रमाणें करार करून दिल्हीं असेत. गौळी याजकडे चालवून अंमल सुरळीत देणें, ह्मणोन मशारनिल्हेचे नांवें सनद १.

येविशीं खंडोजी मानकर नामजाद प्रांत राजपुरी यास पत्र कीं, सदरहु प्रमाणें तिन्ही कलमें करार करून दिल्हीं असेत. पेशजीच्या शिरस्त्याप्रमाणें याजकडे चालवणें. व याखेरीज:—

चवाटे मजकूरचे गौळी यांचीं वतनी शेतें असतील तीं मक्ता सरली यावर धारा पडेल तो घेऊन, ज्यांचीं शेतें वतनी असतील त्यांचे हवाला करणें. कलम १.

गौळी याचे चारणीचे जागे सुदामत असतील ते गौळीयास देणें. गौळीयावर खरेदी सुभ्याची व महालची न घेणें. कलम १.

सदरहु प्रमाणें दोन कलमें मशारनिल्हेकडे चालवणें. सदरहु तीन महालचे मक्तियास नवे गौळी सन समानांत आले असतील त्यांपैकीं त्रेसष्ट म्हशी शिवायकरून त्यांचा वसूल मक्ता खेरीज देतील, व पेस्तर नवे गौळी हे आणतील ते मक्तियांत द्यावे, ऐसा करार केला असे. सनदेप्रमाणें याजकडे चालविलें जाईल. त्यास म्हशीची चौकशी करून सदरहु प्रमाणें आहेत, कीं अधीक उण्या आहेत, त्या लेहून पाठविणें म्हणून पत्र १.

[४६९] परगणे उमरखेड येथील तुपाची खोती महादशेट पेटकर याजकडे महिपतराव कवडे याजकडून होती, त्या प्रमाणें सरकारांतून करार करून द्यावें, म्हणोन अर्ज केला. त्यावरून करार तूप वजन पक्कें खंडी:—

इ. स. १७६०-६१. इहिदे सीतेन मया व अलफ. मोहरम १२.

(469) The Monopoly of the purchase of ghee in Pargana Umarked was formerly farmed by Mahipatráv Kavade to Mahâdshet Pethkar on certain terms. The latter now applies that the farm may be given to him by Government on the same terms.

1760-61 A. D.

१। बरहुकूम गुदस्त कवडे याजकडे देत होते त्याप्रमाणें.
·।· जाजती सालमजकुरापासून.

१॥·

१०० रुपये नक्त कवड्याकडे देत होते त्याप्रमाणें.

१००

येकूण दीड खंडी वजन पक्कें व एकशें रुपया करार केले असेत. सरकारांत वसूल देऊन पावलीयाचा जाब घेत जाणें. जाजती आजार लागणार नाहीं. अभय असे, म्हणोन कौल महादशेट पेटकर याचे नांवें रसानगी यादी. १

यासी हमी सदाशीवशेट शेट्ये वीरकर यांणीं सरकारांत जमा करावे.

(ग). घरपट्टी व म्हैसपट्टी.

इ. स. १७४१-४२. इसन्ने अर्बैन मया व अलफ. साबान १.

[४७०] परगणे घोसाळें येथील घरटिपेचे पाहणीस व गौळीयांचे म्हशीचे पहाणीस गणेश दत्ताजी पाठविले आहेत; त्या समागमें गुदस्ताचे कागद देणें. व लिहिण्यामाफक कोरे कागद व रूमाल देणें. दोन शिपाई नेमून देणें, म्हणोन खंडोजी माणकर प्रांत राजपुरी यास पत्र. १

कोंकण प्रांतीच्या घरटिपेच्या, गौळ्याच्या म्हशीच्या, पाहणीस कारकून पाठविले, त्यास लिहिण्यामाफक कागद व रूमाल देविले; व सालगुदस्ताचे पाहणी खर्डे देविले व दोन दोन शिपायी देविले.

It is ordered that he should pay the following to Government for the monopoly in question:—

Pallâs.
$1\frac{1}{4}$. of ghee as paid last year to Mahipatráv Kavade.
$\frac{1}{4}$. Addition from the current year.

$1\frac{1}{2}$

In cash Rs. 100 the amount that was being paid to Mahipatráv Kavade.

A receipt should be taken. No additional levy shall be paid.

1741-42 A. D.

(470) An officer was sent to take a census of the houses and of the she-buffaloes of cowherds in Pargana Ghosála. Papers of the preceeding years' census were ordered to be given to him.

[४७१] तर्फ पाल व तर्फ माणखोरें येथें रावो बल्लाळ कारकून पाठविले आहेत, म्हणोन रामाजी बाबाजी हवालदार तर्फ मजकूर यास सनद १.

इ० स० १७४२–४३
सलास अर्बैन
मया व अलफ.
जमादिलाखर ६.

तर्फ घोसाळें येथें रामाजी विश्वनाथ कारकून पाठविले आहेत, यास शिपायी चार देऊन पाहणी करवणें, म्हणोन खंडोजी माणकर नामजाद प्रांत राजापुरी यास सनद १.

परगणे बीरवाडी येथें हरि बाबाजी कारकून पाठविले आहेत, म्हणोन होनाजी बालकवडे यास सनद १.

मामले तळें येथें नारो वासुदेव व गणेश बल्लाळ यांस पाठविले आहेत. यांस शिपायी चार देऊन पाहणी करवणें, म्हणोन खंडोजी माणकर यास सनद १.

तर्फ अष्टमी व तर्फ नागोठणें येथें नारो बल्लाळ कारकून पाठविले आहेत म्हणून होनाजी बालकवडे यांस सनद १.

[४७२] मामले रेवदंडा येथील भंडारी लोकांस घराचें भुईभाडें घर पाहून दर घरास रुपये ।· पावला, व ८≡ तीन दुवल, व ८= दोन दुवल, व ८– एक दुवल प्रमाणें दर माहे पेशजी घेत होते; ऐशास साल गुदस्ता भंडारी हुजूर कसबें पुणें येथील मुक्कामीं येऊन विनंती करून सदरहू प्रमाणें भुईभाडें माफ करून घेतलें; त्याचा आकार रा० मोराजी शिंदे यांचे विद्यमानें करून त्यांजवळून शिक्यानिशीं जाफ्ता घेऊन तुम्हीं हुजूर आणला; तो मनास आणून मशारनिल्हेनीं शिक्यानिशीं जाफ्ता करून दिल्हा आहे; त्याप्रमाणें रुपये २५६॥ दोनशें साडे छपन्न तुम्हास साल गुदस्ताचे मत्त्यांत मजुरा दिल्हे असेत. मामले मजकूरचे मत्त्यापैकीं अखेर मक्त्यामध्यें मजुरा घेणें; म्हणून महादाजी अनंत हवालदार मामले मजकूर याचे नांवें सनद १.

इ. स. १७४२–४३.
सलास अर्बैन
मया व अलफ.
जिलकाद ११.

---

(471) Karkuns were deputed for the enumeration of houses, and for ascertaining the number of she-buffaloes, kept by each cowherd in the Tarfs of Pál; Ashtami, Nágothane, Ghosále, Birwádi and Mámlá Tale.

1742–43 A. D.

(472) Mahádáji Anant Havâldar is informed by a Sanad that he should pay Rs. 256-8 less than in the previous year on account of exemption from ground rent of houses to be paid by Bhandáris of Revdandá.

1742-43 A. D.

[४७३] चिरंजीव रा०सदाशीव चिमणाजी प्रांत कल्याण यास पत्र कीं, परगणे नसरापूर व बोरेटी व चौण, प्रांत मजकूर, या प्रांतीं परभु लोकांचीं घरें आहेत, त्यास घरटीप व वण घेतात, दोनशें रुपयेपर्यंत बेरीज आहे. ते माफ करावी ह्मणोन बापुजी खंडेराव याणीं विदीत केलें. त्यावरून सदरहु तर्फामध्यें परभु लोकांचीं घरें असतील, त्यांस घरटीप व वण दोनशें रुपयेपर्यंत आकार होईल तो माफी खर्च पेस्तर साल सन खमसापासून लिहिणें; ह्मणोन सनद दिली असे.

इ. स. १७४३।४४
आर्बा अर्बैन
मया व अलफ.
रवीलाखर ५.

[ह] आबकारी.

[४७४] महादशेट वीरकर यांस कसबें पुणें व पेटा कसबें मजकूर येथील कलालास गूळ व मोहो द्यावयास तुजला आज्ञा केली असे, देत जाणें. दुसरे कोणास द्यावयास प्रयोजन नाहीं. याप्रमाणें करार करून तुजकडे मक्ता मुकरार केला. बितपसील:—

इ.स. १७४९-५०
खमसेन मया
व अलफ.
जमादिलाखर २०.

सन खमसेन सालमजकूर इस्तकबील अवल साल तागाईत अखेरसाल रुपये

५०० बरहुकूम गुदस्त.
१०१ जाजती सालमजकूर.
६०१

तपशील:—

१२५ रसदतूर्त
१२५ अश्विन शु॥ १
१२५ कार्तिक शु॥ १
१२५ माघ शु॥ १
१०१ वैशाख शु॥ १
६०१

सन इहिदे खमसेन इस्तकबील अवल साल तागाईत अखेर साल बरहुकूम गुदस्त रुपये ६०१
यासी मुदती गुदस्ताप्रमाणें करार.

सन इसन्ने खमसेन मक्ता बरहुकूम गुदस्त इस्तकबील अवलसाल तागाईत अखेर साल रुपये ६०१. यासी मुदती गुदस्त प्रमाणें करार.

(473) At the request of Bápuji Khanderáv, the Parbhus in Pargana Nasrápur, Berati and Chaune were exempted from house tax and grazing fee.
1743-44 A. D.

(474) The monopoly of selling sugarcandy and maura to the liquor manufacturers of Kasba Poona and its suburbs was given for three years to Mahádshet Virkar for Rs. 601 per year. No other person had permission to sell the articles in question to the liquor manufacturers.
1749-50 A. D.

येणें प्रमाणें सालमजकुरीं साहाशें एक रुपया, व सन इहिदे साहाशें एक रुपया, व सन इसन्ने साहाशें एक रुपया, याप्रमाणें ती साला मक्ता करार केला असे. सालाचे साला मुदतीप्रमाणें सरकारांत वसूल देऊन पावली याचे जाब घेणें. तेणेंप्रमाणें मजुरा असेत ह्मणोन सनद १.

[४७५] महादशेट वीरकर याणें जुन्नर (येथून) येऊन विनंती केली कीं, कसबें पुणें व पेठ येथील कलालास गूळ व मोहे एकानें द्यावें याप्रमाणें करार करून जीवन मावाफक मक्ता केलिया उगवणी करून देऊं म्हणून. त्याजवरून मनास आणून कसबे मजकूर व पेठ येथील कलालास गूळ व मोहे द्यावयासि तुजला आज्ञा केली असे. देत जाणें. दुसरे कोणास द्यावयास प्रयोजन नाहीं.

इ. स. १७५२–५३. सल्लास खमसेन मया व अलफ. साबान ४.

याप्रमाणें करार करून तुजकडे मक्ता करार केला. बितपसील बरहुकूम करार यादी रुपये:—

सालमजकूर सन सलास इस्तकबील अवल साल तागाईत अखेर साल रुपये

६०१ बरहुकूम गुदस्त
९०० जाजती
१५०१

तपशील—

५०० तूर्त रसद
१००१ दरमाहे शु॥ १
२५० अश्विन शु॥ १
२५० कार्तिक शु॥ १
२५० माघ शु॥ १
२५१ वैशाख शु॥ १
१००१

सन आर्बा.

बरहुकूम गुदस्तजमा व मक्ता १५०१ रुपये. यासी रसद हस्तेबंदी गुदस्त प्रमाणें.

सन खमस खमसेन.

मक्ताजमा, बरहुकूम गुदस्त रुपये १५०१. यासी रसद हस्तेबंदी गुदस्त प्रमाणें करार.

---

(475) Mahàd Shet Virkar, prayed that if the right to sell sugarcandy and maura to the liquor manufacturers of Kasba Poona and the suburbs were farmed for a moderate sum, (subject to the conditions that no other person was to sell the articles to the liquor manufacturers), he would undertake the farm. His offer was accepted. The farm was given on the conditions specified above as per Memo of agreement.

1752-53 A. D.

For whole of the current year San salas A. D. 1752-53.

Rs. 601 As per last year.
900 Increase.
1501

For the year San Arba A. D. 1753-54.

Rs. 1501 as per last year. The instalment being the same.

येणेंप्रमाणें साल मजकूर सन सलास एक हजार पांचशें एक रुपया, व सन अर्बा एक हजार पांचशें एक रुपया, व सन खमस एक हजार पांचशें एक रुपया प्रमाणें ती साला मक्ता करार करून दिल्हा असे. सदरहुप्रमाणें सालबसाल मुदती बरहुकूम सरकारांत वसूल देऊन पावलीयाचे कबज घेणें. तेणेंप्रमाणें मजुरा असेत, म्हणून सनद १.

याखेरीज ती साला मिळोन नजर रुपये ५०० पांचशें करार केले असेत. रोख सरकारांत घ्यावे. याप्रमाणें करार केला असे.

[४७६] प्रांत फिर्गाण येथें दारूसरा होत होता, तो न करावा, म्हणून सरकारांतून मना केला होता. त्यास फिर्गाण प्रांतींची रयत भंडारी व कोळी खलक वगैरे यांची उपजीविका दारूसऱ्यावर होती, ते बंद जाली, तेव्हां परागंदा होणार आणि सरकारचे जमाबंदीस फार नुकसान येणार ह्मणून विदीत जालें. त्याजवरून हें ध्यानांत आणून पूर्ववत्प्रमाणें करार केला असे. तरी भंडारी यांणीं माड, ताड वाहावें. सऱ्याच्या भट्या लावून सरा रयेत खलकास विकावा. चाकरमाने लोकांस विकत न द्यावा. व जाजती सरा द्यावयाचा अधिकार नाहीं. ब्राह्मण, प्रभु, शेणवी, त्यास सरा विकत न द्यावा व फुकट न द्यावा. येणेंप्रमाणें परिछिन्न कैद चालविणें. यांत अंतर जालीया पारिपत्य होईल ह्मणून पत्रें:—

इ. स. १७५४।५५
खमस खमसेन
मया व अलफ
जिल्हेज १९.

Details of instalment.

500 To be paid at once.

1001 On the first of the bright half of the following months.

250	Ashwin.
250	Kàrtik.
250	Mágh.
251	Vaishàk.
1001	

For the year Khamas A. D. 1754-55. As above.

The farm was given for 3 years on the above terms.

A Nazar of Rs. 500 was in addition to be paid to Government.

(476) The manufacture of liquor in Pránt Firangán has been stopped by the orders of Government. It has, however, been represented that the ryots of Prant Firangána consist of Bhandáris, Kolis &c. who depend on the manufacture of liquor for their support, & who, if thus deprived of their means of subsistence, will be compelled to leave the province, and that this will result in a considerable loss of revenue to Government. Government is, therefore, pleased to revert to the former arrangment, and to permit the Bhandàris to open distilleries for manufactures of liquor from cocoanut and palm trees for sale to the ryots (खळक). Liquor should not be sold to the servant-class. It should neither

1754-55 A. D.

१ शंकराजी केशव प्रांत वसई यांस.
१ रामाजी महादेव नामजाद प्रांत साष्टी यांस.
१ गोंदजी माणकर प्रांत बेलापूर यांस.
१ मोरोजी शिंदे नामजाद जंजीरे रेवदंडा यांस.
४

(आय) मिठागर.

[४७७] तर्फ नागोठणें, प्रांत चेऊल, येथील मिठागराचे बंदिस्तीविषयीं उमेदवार होऊन अर्जदास्त हुजूर लेहून पाठविली. व रंगो नारायण, सुभेदार निसबत सुधागड, यांणीं विनंती केली. त्यावरून मनास आणून बंदिस्त करावयाची आज्ञा केली असे. मिठागराचा शिरस्ता जकात:—

इ. स. १७४२–४३. सलास अर्बैन मया व अलफ. सवाल २१.

मिठागरांत कोंड्या होतील त्या मोजून दर कोंडीस दुतर्फा खेरीज बाबती खुर्दा टक्का १.

जकात दर खंडीस रुपये.
१८= दिमत सरकार.
१८= सुधागड.
।= आंगरे.
२॥=

शिळोत्री व आगरी मिठागराची बंदिस्त करितील त्याचा शिरस्ता:—

मीठ दर खंडीस जे किंमत होईल त्याची वांटणी निमेशिळोत्री व निमे आगरी याप्रमाणें करार १.

आगरी मीठ विकवतील त्यास घरदेणें व मीठपट्टी तीसाला माफ केली असे. पुढें शिरस्तेप्रमाणें घरटका व मीठपट्टी घ्यावी.

---

be sold nor given gratis to Brahmins, Parbhus and Shenvis who by the rules of their caste are prohibited from drinking liquors. These conditions should be strictly enforced. A breach of them will be punished.

Letters to the above effect to the officers of Prànt Bassein, Salsette, Belàpur and fort Revdandá.

(477) The following instructions were issued for encouraging manufacture of salt.

1742-43 A. D.

1. The following duty would be levied:—One Takká for each salt-pan (Takká = 4 annas). Rs. 2—10 on each Khandi of salt.

1—2 to Government.
1—2 Sudhágad.
„—6 Angria.

वेट बेगार, मिठागरी यास ती तर्फा मीळाफ
केली असे.

येणेंप्रमाणें करार करून कौल सादर केला असे. तरी मिठागराची बंदिस्त करून सदरहुप्रमाणें जिकडील तिकडे वसूल देऊन सुखरूप राहणें. जाजती आजार लागणार नाहीं, म्हणोन देशमुख व अधिकारी व देशपांडे यांस कौल.

येविशीं रा. होनाजी बाळकवडे नामजाद प्रांत राजापुरी यास पत्र १.

[४७८] रामाजी महादेव नामजाद प्रांत साष्टी यास पत्र कीं, कृष्णाजी रघुनाथ यांणीं आपलें वर्तमान कित्येक निवेदन केलें. त्यावरून मनास आणून मखलासी केली. येणेंप्रमाणें बितपशील:—

इ. स. १७४३–४४.
अर्बा आर्बैन
मया व अलफ
जमादिलावल १३.

मौजे भायंदर तर्फ घोडबंदर येथील मिठाचा मक्ता दरसाल सातशें खंडी प्रमाणें पांच साला मक्ता आहे. त्यास गतवर्षीं रा. शंकराजी केशव यांणीं, आपणाकडेस, दर खंडीस दाहा आणे प्रमाणें फरोक्ताचा शिरस्ता करार केला आहे, त्या शिरस्तेयानें विकत दिल्हें. बाकी चार सालें राहिलीं. त्याचा पैका त्याच शिरस्त्यानें द्यावयाची आज्ञा करावी ह्मणोन विनंती केली. ऐशास सरकारांत मिठाचा खर्च असेल त्याप्रमाणें ऐन जिन्नस मीठ घेणें. वरकड मिठास दर खंडीस रुपये ·।।।· पाऊण रुपया ध्यावयाचा करार केला असे. तर दर खंडीस पाऊण रुपया प्रमाणें पैका आकारून घेणें.

कलम १.

---

1. Half the value of each khandi of salt manufactured would be allowed to be taken to the Silotri and the remaining half to the Agris (owners of the tracts).

1. The manufacturers of salt would not be liable to be called upon for forced labour to Government, Sudhâgad or Angria.

1. They would further be exempted from house-tax and salt tax for three years.

(478) The salt farm at Mauji Bhoidar in Tarf Ghodbandar was taken by Krishnáji Raghunáth for a term of five years on condition of paying seven hundred khandis of salt to Government every year. In the first year Shankarâji Keshao (an officer of Government) received from the farmer in lieu of the quantity of salt agreed upon, its value calculated at 0—10. per khandi. In the succeeding year the value of salt was ordered to be calculated at 12 annas.

1743-44 A. D.

[४७९] दादाजी आनाजी प्रभु खोत मिठागर मौजे केळवें परगणे माहीम प्रांत वसई याणें कसबे पुण्याचे मुक्कामीं येऊन विनंती केली कीं, मिठागर मजकूर कांहीं जिवन माफिक गुदस्ताचे बेरजेंत चढ घालून इजारा दिली यानें उगवणी करीन. त्याजवर मनास आणून लावणीवर नजर देवून, सन मजकुरापासून तागाईत सनसबा, तीसाला नवें मीठ पिकेल, त्याचा मक्ता करार इस्तकबील सालमजकूरचा चैत्रमास तागाईत सनसबा तीसाला बेरीज रुपये १९५० यासी उगवणी सालें. ३

इ. स. १७४४–४५
खमस अर्बैन
मया व अलफ
रमजान ८.

सन खमस सालमजकूर रुपये
३५० बरहुकूम गुदस्त.
३०० जाजती चढ.
६५०
यासी उगवणी हप्तेबंदी रुपये
२५० वैशाख वद्य १ प्रतिपदा सालमजकूर
४०० सन सीतांत.
२०० मार्गशीर्ष शु॥ १
२०० माघ वद्य १ प्रतिपदा
४००
६५०

सन सीत अर्बैन.
बरहुकूम गुदस्त रुपये ६५०
यासी उगवणी गुदस्ताप्रमाणें रुपये.
२५० सनमजकूर वैशाखमास.
४०० पेस्तर साल सन खमसाप्रमाणें.
६५०

सनसबा.
बरहुकूम गुदस्त रुपये ६५०
यासी उगवणी बरहुकूम गुदस्त रुपये
२५० सन मजकूर वैशाखमास.
४०० सन समानांत हप्ते बरहुकूम गुदस्त.
६५०

एकूण एक हजार साडे नवशें. सदरहु सालोसाल हप्तेबंदीप्रमाणें उगवणी करणें. पेशजी मिठागर मजकुरीं शिल्लिक मीठ असेल तें मक्त्याखेरीज असे. नवें मीठ पिकेल त्याचा मक्ता करार म्हणून पत्र. १

[४८०] शेख दाऊद बिन शेख हसन दरकार वस्ती कसबे ठाणें साष्टी यास अभय पत्र दिल्हें ऐसाजे, तुम्ही पेशजी सन अर्बा अर्बैनांत साताऱ्याचे मुक्कामीं येऊन अर्ज केला कीं, कसबें तुर्भे तर्फ मजकूर प्रांत साष्टी येथील मिठागर खराब पडलें होतें, तें कस्त मेहनत करून खर्च वेंच लाऊन बांधलें. याकरितां तुम्हांस तीन सालें बंदिस्ती बद्दल सरकारचा महसूल

इ. स. १७४६।४७
सबा अर्बैन मया
व अलफ.
जिल्हेज २१.

---

(479) The right of manufacturing salt from the salt-pans of Mauje Kelwe in Pargana Máhim of Práut Bassein, was for a period of 3 years, farmed to Dádáji Annáji Parbhu for Rs. 1950.

1744-45 A. D.

(480) A kowl for the manufacture of salt at Durbe was granted to Shek Daud Shek Hasan Darkár of Thana in Práut Salsette. The condition was that no revenue would be charged for 3 years and that

1746-47 A. D.

माफ केला असे. पेस्तर फिर्गी याचे शिरस्तेप्रमाणें महसूल घेतला जाईल, म्हणोन कौल सादर केला होता. त्या उपर सनखमसांत अवल सालीं दुसरें मिठागर कसबे मजकूरचे दोन सुभ्याच्या सनदेवरून नवें बांधिलें आणि हुजूर येऊन अर्ज केला कीं, मिठागराचे फिर्गाणी शिरस्ते सुभा तहकीक करावयाची आज्ञा होती; त्यावरून सुभ्यास कसबे मजकूरचे पाटील व रयत आणून शिरस्त्याची चौकशी करून कौल लिहून दिल्हा आहे, तो साहेबीं मनास आणून हुजूरचा कौल द्यावा म्हणोन. त्यावरून बराय अर्ज खातरेस आणून तुह्मांवर मेहरबान होऊन सुभापाटील रयत शिरस्त्याची चौकशी करून कौल लिहून दिल्हा होता त्याप्रमाणें हुजरून कौल दिल्हा असे. बितपसील बंदिस्ती मिठागर ५ पांचः—

बंदिस्त सन अर्बा अवलीस
१ आगर धुल्या
१ आगर नवखार
१ आगर घरचा
३

बंदिस्त सन खमस अर्बैन अवलीस
१ आगर आगुरली
१ आगर सतोतन
२

यासी महसूल करार बेरीजः—

निसबत सेती व रयत.
मिठागराचे जमिनीस महसूल सालिना रुपये
३ आगर धुल्या
७ आगर नवखार
७॥ आगर घरचा
३ आगर अगुरली
३। आगर सतोतण
·।· पेशजी महसूल कारभारी याचे निसबत होता सबब
३ जास्ती करार
३।
२३॥।

निसबत साहुकार.
आत, खार, कातु मिठ विकलें, त्यास दरराशीस तेरा अधोल्यांची टोपली १ एक प्रमाणें टोपली सुमार १६०० सोळाशें येकूण तीसात रास एक, दर राशीस फिर्गाणी फदे तीसातीस १६ सोळा प्रमाणें सरकारांत द्यावे कलम १.

जकात व खुटवा जकातीचे कानु जावल्याप्रमाणें द्यावी कलम १.

कनोळी किमतीवर सवाई दिढी सूट देऊन दरशेंकडा रुपये ३ प्रमाणें शिरस्ता

---

after that period, levies would be made according to the rates in force during the Portuguese Administration. New salt pans were subsequently opened by him with the permission of the Subha, and a kowl regarding them was granted by the Peshwa the terms of which were as follows:—

1. The Revenue on the land under the salt pans was fixed at Rs. 23-12.
1. A duty should be paid to Government on the amount realized by

येकूण पात्रणें चोवीस रुपये करार कलम १. मीठ फरोक्त होईल, त्यास माल किमतीवर दररुपयास सरकारी देणें फदे फिंर्गाणी सुमार ३ तीन प्रमाणें दर रुपया २४ फदे चौवीस धरून आकार करून दरशेंकडा रुपये १२॥ साडे बारा रुपये करार केले असेत. कलम १.

केला त्याच वक्तीं फिरंगी त्याचे अमलांत सावकार व रयतेनें गवगवा केला. त्यावरून गलबत पाहून शिरस्ता पेशजी येणेंप्रमाणें रुपये:—

१॥ थोर गलबतास
१ मध्यम गलबतास
॥ लहान गलबतास
।ऽ केवळ लहान महागीर मचवा

३।ऽ

येणेंप्रमाणें चार शिरस्त्यांचे सव्वातीन रुपये दुवल करार केला असे.

येकूण बंदिस्त मिठागर याच्या व महसूल सरकारी निसबत शेती व रयत कलमें दोन व निसबत साहुकार कलमें तीन येकूण पांच कलमें करार केलीं असत. तर जे सालीं जे मिठागर बांधले त्या सालापासून तीन सालें तुम्हांस जकात व खुटव्याचें कलम खेरीज करून चार कलमें माफ केलीं आहेत. तीन सालें भरलीं याऊपर पेस्तर सदरहु चार कलमांचे शिरस्ते-प्रमाणें खेरीज हकदार सरकारांत उगवणी करून सुखरूप राहणें. जाजती उपसर्ग लागणार नाहीं, म्हणोन कौल सादर १. येविशीं रामाजी महादेव नामजाद प्रांत साष्टी यास पत्र १. एकूण २.

(जे) मासे धरण्याचा मक्ता (मच्छीमारी).

[४८१] बाळाजी कृष्ण बापट यास सनद कीं, बंदर देसई प्रांत बेलापूर येथील मासळीची जकात साल गुदस्त सुभ्याकडे होती, ते दूर करून साल मजकुरीं तुम्हांस कमावीस सांगून इस्ताव येणेंप्रमाणें करार सालें बितपसील:—

इ. स. १७५४–५५. खमस खमसेन मया व अलफ. जिल्हेज १.

सन खमस खमसेन मक्ता रुपये.
२८९॥। बरहुकूम गुदस्त.
१११। जाजती चढ.

४०१

सन सीत खमसेन मक्ता बरहुकूम गुदस्त ४०१ रुपया एकूण चारशें एक रुपाया. सन सबा खमसेन मक्ता बरहुकूम गुदस्त

sale of salt, at the rate of 3 Portuguese pices per Rupee (that is taking the Rupee equal to 24 Portuguese pices at Rs. $12\frac{1}{2}$ per cent.)

(481) The right of fishery at the port of Desâi in Prânt Belâpur was farmed to Bâlâji Krishna Bâpat.

1754-55 A. D.

तपशील

१९१ रसद कार्तिक शुद्ध १ प्रतिपदा.

२५० हस्तेबंदी शुद्ध प्रतिपदा.

६३ पौष.	६३ चैत्र.
६२ फाल्गून.	६२ ज्येष्ठ.
१२५	१२५

४०१ एकूण चारशें एक रुपया.

४०१ रुपया एकूण चारशें एक रुपया. सन समान खमसेन मक्ता बरहुकूम गुदस्त ४०१ रुपया एकूण चारशें एक रुपया.

येणेंप्रमाणें चार सालां मक्ता करार केला असे. सदरहुप्रमाणें सालबसाल हस्तेबंदी बरहुकूम ऐवज सरकारांत पावता करून पावलीयाचे जबाब घेत जाणें. तेणेंप्रमाणें मजुरा पडेल. पेशजीप्रमाणें अमल करीत जाणें. वरकड जकातीस व मार्गास या इजाऱ्यामुळें कांहीं अवरोध जाला तरी मामला दूर केला जाईल, म्हणोन सनद. १

(के) वतनें व घरें यांचे विक्रीची नोंद.

[४८२] निसबत संताजी सांवत व देवजी सांवत व जावजी सांवत व राजजी सांवत यांणीं कसबें वाडें तर्फ मजकूर येथील पाटीलकी, निमे हुंडारे, व निमे वाडेकर. त्यापैकीं वाडेकराचे निमे पैकीं निमे पाटीलकी सांवत मजकूर यांणीं रुपये १६०० सोळाशांस विकत घेतली. त्याचें खरेदीखत व महजर मनास आणून हुजूरचीं पत्रें करून दिल्हीं, सबब हरकी करार केल्या. बरहुकूम याद करार रुपये ६०१.

इ. स. १७४८–४९. तिसा अर्बैन. मोहरम ३०.

सदरहूचा वसूल अखेर साल पावेतों झाडा करून द्यावा ऐसा करार केला असे.

[४८३] उदाजी बावळे यांणीं हुजूर येऊन विनंती केली कीं, मौजे रेटवाडी तर्फ खेड प्रांत जुन्नर येथील निमे पाटीलकी बावाजी पाटील टिचके याची आहे. व निमे पाटीलकी पोवळे याची आहे. त्यास बावाजी पाटील टिचके याणें आपले खुश रजावदीनें आपले निमे पाटीलकी पैकीं तीन हिसे पाटीलकी आपणास नवशा रुपयांस विकत दिल्ही आहे. त्यास साहेबीं

इ. स. १७५१–५२. इसन्ने खमसेन मया व अलफ. रजब १७.

---

(482) A fourth share of the Pâtilki watan of Kasaba Wade in Tarf Wade was purchased by Sáwant for Rs. 1600. Letters recognizing the sale were granted by Government and a present of Rs. 601 was levied.

1748–49 A. D.

(483) A sixth share in the Pâtilaki watan being purchased, a present of Rs. 1101 was levied from the purchaser.

1751-52 A D.

सरकारची शेरणी ठराऊन सरकारचें वतनपत्र व गोत महजर सुभ्यास आज्ञा करून करवून देविली पाहिजे म्हणून. त्यावरून मनास आणून उदाजी बावळे यांणीं मौजे मजकूर पैकीं बावाजी टिचके पाटील याची निमी पाटीलकीपैकीं तीन हिसे पाटीलकी खुष रजावदीनें विकत घेतली आहे. त्याज बाबद याच्या माथा शेरणी रुपये ११०१ एक हजार एकशें एक रुपया करार करून सरकारचें वतनपत्र व गोताकडून महजर करून देविला असे. तरी सदरहुप्रमाणें उदाजीमजकुरास सरकारचें वतनपत्र व गोताकडून महजर करवून देवणें. आणि कराराप्रमाणें याजपासून सदरहु रुपये सुभा वसूल घेणें. आणि या पत्राची नकल करून घेऊन हें पत्र उदाजीमजकुराजवळ भोगवटीयास परतोन देणें म्हणोन सुभा प्रांत जुन्नर निसबत चिरंजीव रा० सदाशीव चिमणाजी यास सनद. १.

रसानगी यादी. १.

इ. स. १७५१–५२
इसन्ने खमसेन
रजब १७.

